UNIVERSAL LIBRARY
OU_192549
UNIVERSAL LIBRARY

# संध्यारंग

श्रीपाद शंकर जुन्नरकर

रामकृष्ण प्रकाशन मंडळ

— प्रकाशक —

**कृष्णाजी नारायण सापळे**

रामकृष्ण प्रकाशन मंडळ

ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड

**मुंबई नं. ४.**

**प्रथमावृत्ति, सप्टेंबर १९३८**

या आवृत्तीचे ( चित्रकथेखेरीज ) हक्क प्रकाशकाचे स्वाधीन असून पुढील सर्व प्रकारचे हक्क सौ. सुमती जुन्नरकर यांचेकडे आहेत.

**किंमत १।[illegible] रुपया**

मुद्रकः—

**कृष्णाजी नारायण सापळे**

रामकृष्ण प्रिं. प्रेस

ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड

**मुंबई नं. ४.**

ती. श्रीमती यशोदाबाई जुन्नरकर
यांचे चरणीं—

प्रिय वाचक,

'पाऊलवाटे'च्या प्रवासानंतर मीं एखादी कादंबरी लिहून तुम्हांला सादर करावी, असा तुम्ही माझ्यामागे लकडा लावलेला नव्हता. तरी पण तुम्ही माझ्यामागें न लागल्यास कोणी तरी कोणाच्या मागें लागलेंच पाहिजे असें वाटून ही कादंबरी घेऊन मी तुमच्या मागें लागले आहें. तुम्हांला 'पाऊलवाटे'चा अडीअडचणीचा प्रवास करायला लावतांना, माझ्यासारख्या किरकोळ मुशाफिराला रखरखीत उन्हांतून किती भटकायला लागत असेल याची कल्पना दिलीच आहे. आणि अशा खडतर प्रवासानंतरच 'संध्यारंगा'ची खरी मौज अवलोकितां येते असे वाटल्यावरून हें चित्र तुम्हांला दाखवीत आहे.

पूर्वीच्या प्रवासांत मला आनंदाने सोबत केल्यानंतर हे चित्र तुम्हीं आनंदानें बघावं अशी माझी मनीषा आहे. माझ्या इच्छेला तुम्ही मान दिलांत आणि 'संध्यारंगां'ची छटा पाहून तुम्हांला आनंद झाला, तर त्याचे 'श्रेय' मात्र रा. रा. कृ. ना. सापळे यांच्याकडेच पोंचतें करावें अशी माझी विनंति आहे.

रा. रा. सापळे यांच्याबरोबरच माझे मित्र श्री. व. स. प्रधान यांचाहि उल्लेख मला मुद्दाम करावासा वाटतो.

'संध्यारंगा'चें बहिरंग तुम्हांला आवडल्यास त्याबद्दल द्यायची शाबासकी माझे बंधू श्री. र. शं. जुन्नरकर व श्री. अ. वि. बापट (हंस पिक्चर्स, कोल्हापूर) यांना देण्याची खबरदारी घ्यावी.

पुढील कोणत्याही प्रकाशनाच्या आगाऊ आश्वासनानें तुम्हांला आतांच धास्ती घालीत नाही. पण याच छटेकडे सक्रीय सहानुभूतीनें बघा,

यशोनिवास,
हिंदु कॉलनी, चेंबूर.
ता. १७-८-१९३८

अशी विनंति करणारा,

**श्री. शं. जुन्नरकर**

# संध्यारंग

# संध्यारंग

—१—

ठण्...ठण्...ठण्...

घड्याळांतील ठोक्याबरोबरच कुमुदिनी आरशासमोर उभी राहिली. आपल्या प्रतिबिबाकडे एकतानतेनें बघत तिनें दोन्ही हातांनी आपला अंबाडा सारखा केला. कुंकवाची टिकलीहि आजूबाजूला नाजुक बोट फिरवून रेखीव केल्यासारखी केली आणि आपले पांढरें शुभ्र पातळ एक वेळ हलक्या हातानें झाडल्यासारखें करून ती पलंगाजवळ गेली. त्यावेळी आंखूड हाताचा मलमलचा सदरा घालून आणि अंगावर शाल घेऊन मनोहर झोंपला होता. कुमुद त्याच्याजवळ गेली त्यावेळी त्याचे तोंड भिंतीच्या विरुद्ध दिशेला होतें. त्या दिवशी सकाळीच त्यानें केंस कापलेले असल्यानें, त्याचा चेहरा विशेष मोहक दिसत आहे असें तिला वाटलें. मांसल दंड डोकीखाली घेतलेली त्याची ती मूर्ति डोळ्यापुढून हलूं नये अशी एक कल्पना तिच्या डोक्यांत सहज येऊन गेली. पण त्याबरोबरच आपण बाहेर जाण्यासाठींच आतांपर्यंत केशभूषा आणि वेशभूषा केली आहे आणि आतां आपल्याला निघालेंच पाहिजे या गोष्टीचे तिला स्मरण झालें. आपण एका मैत्रिणीकडे बसायला जाणार असल्याचें तिने सकाळीच त्याच्या कानावर घातलें होते. त्यामुळें त्याला पुन्हां मुद्दाम उठविण्याची जरूर नाहीं असा विचार करून, तिनें एकदां त्याचें पांघरूण सारखें केल्यासारखें केले आणि त्याच वेळीं त्यानें कांहीं तरी हालचाल केल्यासारखी वाटल्यामुळें त्याच्या केंसावरून हात फिरवून ती म्हणाली, "मी जाऊन येते हं जरा."

" हूं ! " तो डोळे मिटल्यामिटल्याच म्हणाला.

तिनें त्याचें पांघरुण पुन्हां एकदां सारखें केल्यासारखें केलें आणि कोंपऱ्यांतील चपला पायांत अडकवून बाहेर पाऊल टाकलें. त्याच सुमारास त्याने आपली कूस बदलली आणि गार वारा सुटल्यामुळे पांघरुण अंगाभोंवती लपेटून घेऊन घोरण्यास सुरवात केली.

कुमुदिनी आपल्या डौलदार गतीनें गॅलरींतून जिन्याच्या बाजूला जात असतांना बाजूबाजूच्या बायका नेहमीच्या संवयीप्रमाणें तिच्याकडे बघून आपापसांत डोळे मिचकावून ' काय ऐटीनें चालली आहे पहा ! ' असाच जणुं अभिप्राय व्यक्त करीत होत्या. कुमुदिनी शिक्षणाच्या बाबतींत आजूबाजूच्या बायकांच्या बरीच पुढें असल्यानें तिला कोणाची कुटाळकी करतांना किंवा रिकामटेकड्या गप्पांत कालापव्यय करतांना कोणीच पाहिलें नव्हतें. त्यामुळें चाळीतील त्या वृत्तीच्या बायकांत ती बरीच अप्रिय होती. याचा परिणाम म्हणूनच कीं काय कुमुदिनी व मनोहर या पतिपत्नीचें प्रेम हा त्यांच्या कौतुकाऐवजी कुटाळकीचा विषय झाला होता. मनोहर दिवसाचा बराच वेळ बाहेर असल्यानें, सहाजिकच त्याचा शेजाऱ्यांशीं संबंध जवळ जवळ येतच नसे. पण कुमुदला मात्र इतर बायकांचा टीकाविषय होण्याची पदोपदीं पाळी आली तर त्यांत नवल नाही. आतांही कुमुद गॅलरीतून जातांच तिच्या टापटीपीच्या वेषभूषेने त्यांच्या कुटाळवृत्ति उचंबळून आल्या. आणि त्या दिवशी त्यांच्या परनिंदावृत्तीला खाद्य मिळण्याचा योग बलवत्तर असावा असें एखाद्या ज्योतिषाने भविष्य वर्तविले असतें तर ते खरेंच ठरलें असतें, अशी एक विस्मयकारक घटना त्या ठिकाणीं घडून आली.

कुमुदिनीचें त्यांच्या मतें फाजील शिक्षण, त्या शिक्षणामुळे त्यांच्या डोळ्यांत येणारी तिच्या वागण्यांतील टापटीप, त्यांच्याशी बोलण्याचा प्रसंग आलाच तर तिच्या तोंडून निघालेला एखादाच मार्मिक शब्द, इत्यादि किती तरी गोष्टी त्या वेळीं त्यांच्या बोलण्यांत निघाल्या; आणि नाटक सिनेमा किंवा क्लब अशासारख्या करमणुकीच्या ठिकाणीं न जातां एखादाच पुरुष चाळींत शिल्लक राहिला असला तर त्याच्या कानावर या जोडप्याविषयीं कांही तरी मजकूर जावा अशाच पद्धतीनें प्रत्येक शब्द बाहेर पडूं लागला. त्यांच्या त्या गप्पा आणखी किती वेळ चालल्या

असत्या कोण जाणे ! पण मध्येंच जिन्यावर कोणाचीशीं पावलें वाजल्यानें त्यांचें बोलणें थांबलें आणि त्या सगळ्याजणी जिन्याकडून येणाऱ्या व्यक्तीची मार्गप्रतीक्षा करीत त्या दिशकडे पाहूं लागल्या. त्यांना मुळींच वाट बघावी लागली नाहीं. कुमुदिनीची मैत्रिण नंदिनी तिच्या खोलीकडे जाण्याकरितां आली. त्या बायांनीं आपल्या टीकेचा मारा केवळ कुमुदिनी किंवा मनोहर यांच्या पुरताच ठेवला नव्हता तर त्यांच्याकडे येणाऱ्या कोणाहि व्यक्तीकडे त्याच कुत्सितदृष्टीनें बघण्याची त्यांना संवय लागली होती. नंदिनी दिसतांच त्यांनीं पूर्ववत् नेत्रसंकेत केले आणि त्या आपापसांत कुजबुजूं लागल्या. कुमुदिनी या वेळीं घरांत नाहीं आणि आतां नंदिनी मनोहरबरोबर त्या खोलींत एकटीच असणार आणि कुमुदिनी गेल्यानंतरच ती आली त्या अर्थी तिचा आणि मनोहरचा कांही तरी संबंध असलाच पाहिजे अशी कल्पना एका तरुण मुलीच्या डोक्यांत आली आणि सहाजिकच तिच्या तोंडून उद्गार निघाले, " तरीच ! "

गोदावरीनें काढलेले ते उद्गार आणि तिची नंदिनीकडे बघणारी चमत्कारिक नजर पाहून इतर स्त्रिया तिच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहूं लागल्या. त्या बघण्यामुळे आपण सर्वांच्या मनाला कसा चटका लावला आहे हे लक्षांत येऊन, गोदावरी मिस्किलपणें हंसत म्हणाली, " अजून बाई तुमच्या कसं लक्षांत येत नाही ? आतांच कसं सांगूं ? "

ते शब्द उच्चारतांना गोदावरीने केलेला अभिनय आणि तिची अजूनही कायम असलेली चमत्कारिक मुद्रा पाहून तिचा अभिप्राय कांहीं स्त्रियांच्या लक्षांत आल्या-वांचून राहिला नाही. आतां सर्व कांहीं प्रकार आपल्या लक्षांत आला हे प्रगट करण्याकरितां त्याही मनोहरच्या खोलीकडे बघूं लागल्या. त्यांच्यांतल्या कांहींनीं आपले हात तोंडावर ठेवून उद्गार काढले, " शर्थ आहे बाई ! "

पण तोपर्यंत गोदावरीच्या डोक्यांत कांहीतरी निराळीच कल्पना आली होती.

नंदिनीने आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें अगदीं हलक्या पावलांनीं आंत प्रवेश केला. रविवारीं ती कुमुदला भेटण्यासाठीं क्वचित्‌च येत असे व आलीच तर तिला मनोहर व कुमुद बोलत बसलेली किंवा कोणी पाहुणे आले असल्यास त्यांच्या सत्कारांत गढलेलीं आढळत. इतर दिवशीं मात्र तिला त्या ठिकाणीं पूर्ण

शांतता दिसत असे. रविवारीं ती आली म्हणजे त्या ठिकाणच्या गडबडींत आणि हास्य विनोदांत तिचें मन सहज रमत असे. आजही ती आली तेव्हां तिनें अशाच गडबडीची अपेक्षा केली होती. पण आंत पाऊल टाकतांच तिला तिथें शांतता आढळली आणि मग तिच्या डोक्यानें असाच तर्क केला कीं, मनोहर आपल्या स्नेह्यांबरोबर कुठे तरी बाहेर गेला असावा आणि कुमुदिनी दुपारच्या झोंपेचें सुख अनुभवीत असावी. कुमुदिनी दार उघडें टाकून झोंपली आहे, तेव्हां आपण तिची गंमत करावी अशी एक कल्पना झरकन् तिच्या खोडकर मनांत आली. मनोहरनें शाल अंगाभोंवती लपेटून घेतली असल्यानें तिच्या कांहीच लक्षांत आलें नाही. तिने इकडे तिकडे पाहिल्यासारखें केलें आणि दार हलकेच आंतल्या बाजूने ओढून घेऊन कडी लावली. निजलेल्या कुमुदिनीची आतां आपण खूपच गंमत करणार या एका कल्पनेखेरीज तिच्या डोक्यांत कोणताच विचार नव्हता.

गोदावरीच्या तर्कटयुक्त उद्गारांनी सर्वांच्याच कल्पनाशक्तीला चालना मिळालेली होती. मनोहर घरांत एकटा असल्याने नंदिनी कांहीं वेळ तिथेंच थांबते कीं बाहेर येते हें अवलोकन करण्याकरितां सर्वजणींचे डोळे त्या खोलीकडे लागले होते. नंदिनीने आजूबाजूला नजर टाकून हलकेच दार बंद करून घेतलेले बघून तर त्यांच्या तर्कटाला बळकटी आली आणि त्या आपापसांत कुजवुजत एकमेकींकडे सांकेतिक नजरेने बघत दाराच्या बाजूला सरकण्याचा प्रयत्न करूं लागल्या. गोदावरीने सगळ्यांकडे साभिप्राय नजरेनें पाहिलें.

नंदिनी हलक्या पावलांनी पलंगाजवळ गेली. काय केले असतां कुमुदची अधिक मौज उडेल याचा तिने क्षण दोन क्षण विचार केला आणि आपल्या अस्तित्वाची चाहूल लागूं न देतां हलकेच गादीवर बसली.

दार बंद होऊन एक दोन मिनिटें झाली तरी आंतील कांहींच चाहूल ऐकूं येत नाही असे दिसतांच, गोदावरी आणि तिच्या मैत्रिणी एकमेकींकडे पाहूं लागल्या. या गोष्टीची माहिती चाळीतल्या इतर बायकांना देतां आली तर अधिक मौज होईल हाच विचार एकाच वेळीं सगळ्यांच्या डोक्यांत आला. कांहीं जणी तर ताबडतोब ती बातमी पसरविण्याच्या इरायानें तिथून निघाल्यासुद्धां. गोदावरीनें एकदां त्यांच्या-

कडे पाहून गॅलरीच्या बाहेर नजर टाकली. समोरचे प्रखर उन्ह, अतिवाऱ्यामु वाटणारी त्याची गोडी, क्वचित् एका झाडावरून दुसऱ्या झाडावर काव काव करी उडून जाणारा कावळा, या पैकीं कोणत्याच गोष्टीकडे तिचें लक्ष नव्हतें. आपल्या ही संधि साधून कुमुदिनीला कसें खाली पहायला लावतां येईल हाच विचार तिच्य डोक्यांत थैमान घालीत होता. त्यामुळे वाऱ्याच्या योगानें झाडांचा सळसळ अर होणारा आवाज तिच्या कानांत शिरत नव्हता. ती एकदां रस्त्याकडे तर एकदां त बंद असलेल्या दाराकडे पहात होती. आज आपण एखाद्या भयंकर चोरीचा शो लावीत आहोंत अशाच ठशाचा छाप तिच्या मुद्रेवर दृग्गोचर होत होता.

कुमुदिनी निजली असतांना मनोहर बाहेरून आला तर तो कोणत्या तऱ्हे तिची थट्टा करील याचा नंदिनीनें स्वतःशीच विचार केला. ती कुमारी असल्या त्याच प्रकारचें गोड दृश्य आपल्याही आयुष्यांत केव्हां तरी दिसेल अशी सुख कल्पना तिच्या मनाला स्पर्श करून गेली. तिने मनोहरच्या अस्तित्वाचा निद्रिस कुमुदिनीला भास उत्पन्न करायचा असा मनाशी बेत केला आणि मनोहर ज पद्धतीनें कुमुदचा हात धरणे शक्य आहे असें तिला वाटले त्याच कल्पित पद्धती तिनें चांचपडत चांचपडत मनोहरचा हात आपल्या हातांत घेतला आणि....

तो हात स्त्रीचा न वाटल्यामुळे ती झटक्याने तिथून उठली.

त्याच वेळी मनोहर आणि नंदिनी यांना एकत्र पकडण्याच्या उद्देशाने गोदावरी दाराला बाहेर कडी लावली. जिन्यावर कोणाची तरी पावले वाजल्यामुळें मग त आपल्या दारासमोर येऊन उभी राहिली.

ज्या वेगानें नंदिनी त्या पलंगावरून उठली त्याच वेगाने अपरिचित कोम हाताचा स्पर्श झाल्यामुळें अर्धवट झोपेंत असलेला मनोहर खडबडून जागा झाल त्यानें आपलें पांघरूण फेंकून दिलें. दोघांच्याही हृदयांत त्या अकल्पित एकांता धडकी भरली. नंदिनीच्या भालप्रदेशावर घर्मबिंदु दिसूं लागले.

" कोण ?—तूं ? " मनोहरच्या तोंडून उद्गार निघाले.

आणि त्या उद्गारांनीं नंदिनीला धीर आला.

दोघांची नजरानजर झाली. त्याच वेळीं...

जिना चढून येणारी व्यक्ति कुमुदिनीच आहे असें गोदावरीच्या नजरेस आलें. तिच्या पाठोपाठ जिन्यावर पुन्हां पावलें वाजूं लागलीं आणि मनोहरचा स्नेही सूर्यकांत वर आला. त्याच्या चालण्याच्या वेगामुळें कुमुद आपल्या खोलीजवळ पोंचण्याच्या वेळीच त्याने तिला गांठले.

आतां आपल्याला नाटकांतहि पहायला न मिळणारा एक देखावा पहायला मिळणार या कल्पनेनें गोदावरीच्या डोळ्यांत आसुरी आनंद चमकूं लागला. आपल्या दारांत उभी राहून ती पुढील दृश्य बघण्यासाठीं अधीर झाली. गोदावरीच्या बरोबर इतर स्त्रियाही आपआपल्या खोल्यांकडे वळल्या होत्या. त्याही चोरून आतां काय होतें तें पाहूं लागल्या.

दाराला बाहेरून कडी बघतांच कुमुद जरा चमकलीच.

" मनोहर घरांत नाही वाटतं ? " सूर्यकांतानें विचारलें.

" मघाशी होते, " कुमुद कडी काढत म्हणाली. " नुसती कडी लावून कसे गेले कुणाला ठाऊक ? "

बाहेर कुमुदिनी आणि सूर्यकांत यांचे आवाज ऐकतांच मनोहर आणि नंदिनी चमकलीं. आपल्याला एकांतांत पाहून त्यांची काय कल्पना होईल, याचा विचार दोघांच्याही मनांत विद्युत्‌गतीने येऊन गेला. दोघेंही गांगरलीं.

" आतां काय करणार ? " असा प्रश्न नंदिनीच्या भीतियुक्त मुद्रेवर उमटला.

" घाबरूं नकोस " कांहींतरी विचार कायम करून मनोहर उद्गारला. " अगोदर दार उघडतो, मग पाहूं. "

दाराची कडी काढतांच ते आंतूनही बंद असल्याचें कुमुदिनीच्या ताबडतोब नजरेस आले. हा काय प्रकार असावा याचा स्वतःशींच विचार करित ती सूर्यकांताकडे पाहूं लागली.

घरांत एखादा चोर शिरला असून त्याला पाहिल्यामुळेंच तर कोणी कडी लावली नसेल ना, अशी शंका सहज तिच्या डोक्यांत येऊन गेली. तोंच सूर्यकांतानें जोरानें दाराला धक्का दिला आणि मनोहरनें आंतून कडी काढल्यामुळें दार उघडलें.

पुढील गैरसमजुतीच्या भीतीनें घाबरलेली नंदिनी आणि गोंधळलेल्या नजरेनें उभा असलेला मनोहर यांना पाहून सूर्यकांत आणि कुमुदिनी यांना विस्मयाचा धक्का बसला.

दार उघडल्यामुळे वारा आणि उन्ह यांचा स्रोत आंत शिरला आणि आपल्याला आज काळीमा लागला ही कल्पना असतांही गुदमरलेल्या नंदिनी आणि मनोहर यांना त्यांतल्या त्यांत बरें वाटले.

बाहेर हास्याचा एक प्रचंड ध्वनि उमटलेला प्रत्येकाला ऐकूं आला.

---

—२—

नंतर नंदिनी थोडा वेळ कुमुदिनीकडे बसली होती. पण त्यावेळी तिच्याशी कांहीं बोलण्याऐवजी तिच्या डोक्यांत निराळेच विचार स्वैर सुटलेल्या वायूप्रमाणें वावरत होते. कुमुदिनीला आपल्या चारित्र्याची शंका तर आली नाहीं ना ?...हा प्रश्न तिला वारंवार भेडसावत होता. तिला आपल्याविषयी नक्की काय वाटत असावे याचा तिनें एक दोन वेळां तिच्याकडे बघून अजमावण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळेला तिचेंच हृदय धडधडूं लागून तिची नजर खाली व्हायची. कुमुदिनी आपली मैत्रीण आहे तेव्हां ती कदाचित् आपली शंका घेणारही नाही, पण आजूबाजूला साक्षीदाराप्रमाणें वावरणारीं मंडळी आपल्याकडे सहानुभूतीने बघतीलच असें तिला वाटेना. ती त्या ठिकाणीं होती तोंपर्यंत कुमुदिनी मात्र तिच्याशी मोकळेपणानें बोलण्याचा प्रयत्न करीत होती.

पण नंदिनीला अधिक भीति वाटत होती ती आपल्या अब्रूची. आणि त्यांतही आपण ज्या स्थितींत मनोहरच्या खोलींत सांपडलों तिचें एखाद्यानें आपल्या रजनीनाथाजवळ आपण त्याच्या मनांतून उतरावें या बेतानें वर्णन केले तर ?...

कदाचित् रजनीनाथ आपला धिक्कार करील...

त्याच्याविषयीं आपण मनोमंदिरांत उभारलेले डोलारे मातीला मिळतील...

मामांच्या कानावर ही हकीकत गेली तर त्यांनाही कदाचित् आपला तिटकारा वाटूं लागेल...

" ही पहा तुझी लेक " ते आपल्या आईकडे उपहासानें बघत म्हणतील, आणि त्यामुळें आईला आपल्याकरितां खालीं पहायला लागेल...

त्यावेळीं कोणताच विचार तिच्या डोक्यांत स्थिर होत नव्हता.

लहानपणीं रजनीनाथ आणि ती शेजारीं रहात होती तेव्हांपासूनचे सारे प्रसंग तिच्या डोळ्यापुढून जात होते. आपल्या तल्लख बुद्धिबद्दल त्यानें केलेली स्तुति, बाबा वारल्यानंतर आपल्या अभ्यासांत त्यानें घातलेलें लक्ष, ज्या ज्या वेळीं आपल्याला यश लाभलें त्या त्या वेळीं त्यानें उत्साहाने केलेले आपले कौतुक आणि वाढत्या वयाबरोबर स्नेहाचें रूपांतर प्रीतींत होऊं लागतांच त्यानें आपल्याविषयीं बाळगलेली एकनिष्ठता, अशा कितीतरी गोष्टी तिच्या डोळ्यापुढे येत होत्या.

एखाद्या परक्या साक्षीदाराने पाहिलेला सारा प्रसंग रजनीनाथ आणि आपले मामा यांच्याजवळ वर्णन केला तर कदाचित् आपण सांगूं त्या हकिकतीवर त्यांचा विश्वासहि बसणार नाही असे वाटल्यामुळे ती फारच अस्वस्थ झाली.

तो प्रसंग पाहिल्यानंतर सूर्यकांताला मात्र विलक्षण आनंद झाला होता. तो आणि मनोहर एकाच खाजगी कंपनींत काम करीत असल्यामुळे दोघांचा वारंवार संबंध येई. पण चारित्र्याची त्याला विशेष किमत वाटत नसल्यामुळे कोणीहि त्याच्याशी वागतांना तिरस्कारपूर्वकच वागत असे. मनोहर सगळ्यांशींच सहानु-भूतीनें वागत आला असल्याने सूर्यकांत त्याच्याकडे वारंवार येत असे. पण त्याच्यापासून सांभाळून वागण्याची किती तरी जणांनी मनोहरला सूचना दिली होती. चारित्र्याचा प्रश्न निघाल्यानंतर त्याची तुलना नेहमीच मनोहरच्या शुद्ध चारित्र्याशी होत असे आणि या प्रकाराची नेहमींच पुनरावृत्ति होत असल्यानें त्याच्या मनांत नकळतच मनोहरविषयीं असूया उत्पन्न झाली होती. मनोहरच्या वागण्याच्या गोड शैलीमुळें कोणावरही सहज पडणारी त्याची छाप आणि सूर्यकांताचा कुठेंही गेल्यानंतर आपली छाप पाडण्याचा प्रयत्न हा तर प्रत्येकाचा बोलण्याचा विषय होऊन बसला होता. मनोहरला नंदिनीसारख्या तरुणीशीं एकांतांत पाहिल्या-नंतर त्याची असूया जागृत झाली आणि, आतां आपल्याला त्याला केव्हां तरी खालीं बघायला लावतां येईल असा त्याला आत्मविश्वास वाटूं लागला.

पण त्याहीपेक्षां त्याला नंदिनीसारखी सौंदर्यसंपन्न तरुणी खेळणें म्हणून उपयोग करायला सांपडेल याचा विशेष आनंद झाला. नंदिनीची आणि त्याची मनोहरकडे मधून मधून गांठ भेट झाली होती आणि त्या त्या प्रत्येक वेळीं त्याने तिच्याशीं अघळपघळ बोलण्याचा प्रयत्न केला होता. एक दोन वेळां त्यानें तिच्या हाताला निरनिराळ्या निमित्तानें स्पर्शहि केला होता आणि त्याबद्दल नंदिनीनें त्याची युक्तीनें निर्भत्सनाहि केली होती. आणि कांही वेळेला तिने त्याला स्त्रियांशी वागतांना पुरुषांनीं जपून वागावं अशा प्रकारचा उपदेशहि केला होता. त्या त्या प्रत्येक वेळीं त्यानें सारें बोलणें थट्टेवारी नेले होतें. आपल्याजवळ नेहमीं दिमाखानें वागणारी ती नंदिनी आज मनोहरशीं एकांतांत सांपडली आहे यांतच दैवाचा आपल्याला हात आहे अशी त्यानें आपली समजूत करून घेतली, आणि मनोहरनें दार उघडलें त्या वेळची नंदिनीची बावरलेली स्थिति बघतांच त्यानें तिच्याकडे अशा कांहीं विलक्षण नजरेनें पाहिलें कीं तिला त्याची भीतीच वाटावी.

नंदिनी परत जाण्यासाठीं निघाली तेव्हां सूर्यकांतहि उठला आणि उजव्या डोळ्यावरची भुंवयी वर करून म्हणाला, “ मी येतों तुम्हांला पोचवायला.”

दुसरा एखादा प्रसंग असता तर ‘ कशाला विनाकारण तसदी घेतां ? मी रोज एकटीच घरांतून बाहेर पडतें आणि एकटीच जातें. शिवाय तुमचीहि एकट्यानें फिरायची चांगली संवय आहे ती मोडायची ’ असें आपण कांहींतरी गंमतीनें म्हटलें असतें, ही नंदिनीची खात्री होती; पण यावेळीं सूर्यकांताला ताबडतोब वाटेला लावण्याचे तिला धैर्य झालें नाहीं. तिची अनुमति गृहीत धरून तो तिच्या बरोबर चालूं लागला.

चालतांना तिची पावलें सरळ पडत नाहींत हें लवकरच त्याच्या लक्षांत आलें आणि मग तो हळुवारपणानें म्हणाला, “ बरं नाहीं वाटत तुम्हांला ? ”

...त्याच्या त्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वीच ती कशाला तरी अडखळून पडली आणि मग त्यानें तिला चलाखीनें हात देऊन उठविलें, आणि तिच्या हातापायाला लागलेली माती साफ केली.

" आपण आतां असंच करूं ! माझं घर इथून जवळच आहे. तिथं जाऊन कांहीं वेळ तुम्ही विश्रांति घ्या. जरा वेळाने बरं वाटलं कीं, मग तुम्हांला घरीं जायला अडचण पडणार नाही."

नंदिनीच्या मनाला ती कल्पना कशीशीच वाटली आणि ती म्हणाली, " जाईन मी हलके हलके घरीं. विशेषसा त्रास होत नाही मला."

" पण तुम्हाला या स्थितीत तसंच जाऊं देणं मला शोभत नाही; उद्यां मनोहरच्या कानीं ही हकीकत गेली तर तो मला दोष देईल."

आणि मग त्यानें तिला जवळजवळ ओढीतच आपल्या घरीं नेलें. दाराचें कुलुप उघडतांना तो म्हणाला, " घरांत मी एकटाच असल्यानें तुम्हांला बरोबर आणतांना मला थोडसं चमत्कारिक वाटलं. पण जगांत मी एकटाच असल्यानें नाइलाज आहे माझा."

त्याने तिला बसायला एक इझीचेअर ओढून दिली, आणि आजूबाजूच्या सगळ्या खिडक्या उघडतांच मंद वायूची झुळुक आंत येऊन तिला किंचित् बरें वाटलें.

" चहा मागवतों मी हं; आज पहिल्यानेच तुम्ही माझ्या खोलींत पायधूळ झाडली आहांत तेव्हां तुम्हाला तसंच जाऊं देऊन चालणार नाही."

प्रत्येक क्षणाला आपल्यावर कांही तरी निराळेंच दडपण पडत आहे असें नंदिनीला वाटत होतें, पण त्याची त्या वेळची सफाईची वागणूक पाहून तिला त्यांतल्या त्यांत बरें वाटलें.

कांहीं वेळ तिला मोकळेपणानें बसूं दिल्यावर तो तिच्यासाठीं एक टॅक्सी घेऊन आला.

रस्त्यांत त्यानें तिला सूचना दिली की, " विनाकारण प्रत्येकाला ती हकीकत सांगत बसूं नका; गैरसमज माजतील. "

आणि ती घरीं पोंचली तेव्हां तर तिला बोलायला सवडही न देतां समोर यशोदाबाई होत्या त्यांना त्यानें सांगितलें, " त्यांची प्रकृति जरा बिघडली आहे. रस्त्यांत घेरी आली होती."

त्यावेळीं नंदिनीला तो आपला उपकारकर्ताच वाटला.

सूर्यकांत परत जायला निघाला त्यावेळीं त्याच्या डोळ्यांत मात्र निराळ्याच आनंदाची चमक खेळत होती.

× × × ×

सूर्यकांत आणि नंदिनी गेल्यावर मनोहर आणि कुमुदिनी आपल्याच विचारांत गर्क होतीं.

त्यांच्या संसाराला सुरवात त्याच जागेत झाली होती. लग्न झाल्यापासून दीड वर्षांचा काळ एकमेकांच्या पूर्ण प्रेमांत भर्रकन् निघून गेला होता. त्या काळांत संसार म्हणजे एक रमणीय काव्य आहे हाच अनुभव त्यांना आलेला होता. पति-पत्नीचे शिक्षण आणि संस्कृति उच्च दर्जाची असल्यानें दोघांनाही प्रेमाची दिव्यता अनुभवायला मिळाली होती. नोकरीधंद्याव्यतिरिक्त मिळणाऱ्या वेळांत दोघांनी मिळून एकत्र वाचन करावे, त्यावर वादविवाद करावा, आणि वादविवादाच्या भरांत दोघांनी एकमेकांच्या विरुद्ध बोलून नंतर त्याबद्दलच हंसत हंसत चर्चा करावी. रविवारसारख्या दिवशी त्यांची स्नेहीमंडळी येत त्यावेळी थट्टा विनोदाला भरपूर रंग चढत असे. अशा तऱ्हेच्या कार्यक्रमांत त्यांचे दीड वर्षांचें वैवाहिक आयुष्य पार पडलें, आणि त्यांच्या घरांत आणखी एक भागीदार लवकरच येणार असें चार लोक बोलूं लागले. मनोहरचें आतांपर्यंतचे आयुष्य एकाकी स्थितीत गेले होते. त्याला मातृपितृसुखाची कल्पना येण्यापूर्वीच तो या जगांत एकटा झाला होता, आणि नोकरीला लागण्याच्या सुमारासच त्याच्या पालनकर्त्यांनी त्याचा निरोप घेतला होता. अशा एकाकी आयुष्यांतच त्याच्या आयुष्यांत कुमुदिनी उगवली होती, आणि आतां तो नवीन माणसाचें स्वागत करायला तयार झाला होता. त्या करितां त्याला पुन्हां कांही काळ एकटें रहावे लागणार होतें, आणि त्याकरितां त्यानें तयारीहि केली होती. आणखी पंधरा दिवसांनीं कुमुदिनीं प्रसूतीकरितां बडोद्यास जाणार होती. त्यामुळें घडलेल्या प्रसंगाचा दोघांच्याही मनावर विलक्षण परिणाम व्हावा यांत नवल नाही.

दाराबाहेर ऐकूं आलेलें तें प्रचंड हास्य त्या दोघांच्याहि कानांत रसरशीत तेला-प्रमाणें भयंकर दाह करूं लागलें. एरवीं कदाचित् कुमुदिनीच्या मनाची कांहींच चल-बिचल झाली नसती, पण दाराबाहेर जमलेल्या त्या कुटाळ स्त्रियांचें हास्य आपल्याला

मनोहरच्या बाबतींत अज्ञानी ठरवीत आहे असे तिला वाटलें. तरी पण थोड्याच वेळांत तिनें शांतपणानें सगळ्या परिस्थितीचा विचार करण्याचा प्रयत्न केला.

आजपर्यंत त्याची वागणूक आपल्याशीं पूर्ण प्रामाणिकपणाचीच होती...

नंदिनीहि कधीं मर्यादा सोडून वागलेली नाहीं...

आज तर आपण बाहेर जाणार हें नंदिनीला माहितहि नव्हतं...

छे ! लोकांनीं कांही तरी वादळ उत्पन्न केले आहे हे...

मनोहरच्या स्त्रीजातीविषयींच्या कोमल भावना तिला ठाऊक होत्या. लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांनी एका कुमारिकेला एका विवाहित माणसानं फसविल्याचं त्यांच्या कानीं आलं होतं. त्या गोष्टीचा व्हायचा तो परिणाम होऊन त्या कुमारिकेवर जीव देण्याची पाळी आली. दोघांच्याहि बोलण्यांमध्ये ही गोष्ट आली तेव्हां मनोहर म्हणाला होता, " निसर्गानं पुरुषांची या बाबतीत नेहमीच सरशी करून ठेवली आहे ! बिचाऱ्या मुली यौवनसुलभ सुखाला बळी पडतात आणि शेवटीं या जगाला नमस्कार ठोकतात."

" त्या मुलीला तर मी केव्हांही दोषी ठरवणार नाही," आपण म्हणालो होतो. " पण या असल्या पशूंबद्दल कांहीं विचार व्हायला नको का ? "

" पाहिजेच की ! पण आपला समाजच अशा दुबळ्या लोकांचा बनलेला आहे की त्या पशूला शासन करतांना आपल्या मुलीची बेअब्रू होईल अशी त्यांना भीति वाटते, आणि त्यामुळें समाजकंटक मोकळे सुटतात."

तो प्रसंग आतां कुमुदिनीच्या मनश्चक्षूंसमोर दिसूं लागला, आणि त्या वेळीं या जिव्हाळ्याच्या विषयावर मनोहर कसा आवेशाने बोलत होता हेही तिला आठवले. तो मनोहर इतक्या लवकर आपल्याशी प्रतारणा करून दुसऱ्या एका कुमारिकेला आयुष्यांतून उठवायला तयार होईल ही गोष्टच तिच्या मनाला पटेना.

पण मग हा प्रकार घडून आला तरी कसा ? या प्रश्नावर येऊन ती अडखळूं लागली.

मनोहरला ताबडतोब त्या विषयीं खुलासा विचारून मोकळे व्हावे असे तिच्या मनांत येऊन गेले. पण तो खरोखरीच अपराधी नसला तर आपण खुलासेवजा एखादा प्रश्न विचारल्यास त्याला वाईट वाटेल, असा विचार करून तिनें आपण त्याला त्या बाबतीत कांहीच विचारायचें नाही असें ठरविलें.

मनोहरच्या मनाची स्थिति तर त्याहूनही केवीलवाणी झाली. कुमुदनें आपल्याला ज्या परिस्थितींत पाहिलें आहे तीवरून तिनें आपल्या चारित्र्याचा संशय घेतला तर आपल्याला आपल्या बाजूनें असे कांहींच सांगतां येणार नाहीं ही जाणीव त्याला त्रास देऊं लागली. आपल्या व्यवसायांत निमग्न असलेल्या माणसाला एखादा मुका मार बसावा आणि त्याला त्याची जाणीवही नसतां त्याच्या प्रकृतीवर झालेला परिणाम पाहून डॉक्टरने नेमका त्या विषयीच प्रश्न करावा आणि त्या रोग्याला कांहीच सांगतां येऊं नये, त्या प्रकारचीच मनोहरची स्थिति झाली.

त्याही पेक्षां त्याला दुःख झाले तें सूर्यकांतानें आपल्याला नंदिनी बरोबर पाहिलें त्याचें. बाहेरच्या चार बायकांनी जे हास्य केलें त्याच अर्थाने सूर्यकांताने आपल्या चारित्र्याबद्दल विचार केला आणि आपल्या स्नेहीमंडळी समोर आपल्यावर शिंतोडे उडविले तर आपल्यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही. प्रत्येकजण आपल्याला समाजांत वागण्याला अपात्र ठरवील आणि वेळी प्रसंगी चार लोक आपल्याकडे उपहासाने बोट दाखवतील, ही कल्पना त्याला असह्य झाली.

आणखी एक विचार त्याला त्रास देत होता तो हाच की कुमुदने या वेळी आपल्या मनावर कांही अनिष्ट परिणाम करून घेतला तर तिची प्रकृति बिघडल्या-वांचून रहाणार नाही.

बराच वेळ विचारांत जाऊं दिल्यानंतर कुमुदिनीच त्याला म्हणाली, " आपण फिरायला जायचं का आतां ? या जागेत बसून आपला कोडमारा अधिक होईल असं मला वाटतं. "

मनोहरनें मानेनेच अनुमति दर्शविली.

समुद्रावर आल्यावर दोघांनाही मोकळे वाटले.

" आपण ही जागा सोडावी आतां, " कुमुदिनी वाळूंत बसल्यावर म्हणाली. " मला तर पंधरा दिवसांनी जायचंच आहे. पण शेजारची माणसं तुम्हाला शांतता लाभूं देणार नाहींत. "

" जागा तर सोडलीच पाहिजे. पण माझ्या डोक्यांत दुसरा एक विचार आला आहे. "

कुमुदिनीनें त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेनें पाहिलें.

" तुला बडोद्याला उद्यांच पोंचवायची ! "

" इतक्या लवकर ? "

" हो, हो ! "

" कां ? "

" तुला माझ्या हेतुविषयीं कांहीं शंका येत नाही ना ? "

" नाहीं. "

" मग झालं तर. इथं राहून तुझ्या मनाला अधिक त्रास होईल असं मला वाटतं. "

तिनें आपल्या हेतुविषयीं कांहीच शंका न घेतलेली पाहून मनोहरला त्यांतल्या-त्यांत बरें वाटलें. तरी पण ती मनापासूनच तसें बोलली की केवळ आपल्याला वाईट वाटूं नये म्हणून तिनें आपल्या बेताला अनुमति दिली हे त्याला ठरवितां येईना.

मावळत्या सूर्यबिंबाकडे पहात दोघंही पुन्हां विचार करू लागली.

मनोहरने कांही वेळ जाऊं दिला आणि मग तो म्हणाला, " कुमुद तुझा माझ्यावर विश्वास बसेल किंवा नाहीं हे मला नाही सांगतां येत. पण तुला खरंच सांगतो की घडलेल्या प्रकारांत मी पूर्ण निर्दोषी आहे."

" पण विनाकारण वाईट कशाला वाटूं देतां ? मी तुमच्याविषयी संशय घेतला असता तरच तुम्ही असं बोलणं शोभून दिसलं असतं. "

" पण माझ्या हृदयाला काय यातना होतात त्या तुला समजणार नाहीत. "

" ही तुमची चुकीची समजूत आहे. "

" चाळींतल्या चार बायकांचं हंसणं तुझ्या लक्षांत नाही आलं ? "

" असल्या बाबतीत आपल्यासारख्या शहाण्या माणसांनी विचारच करू नये मुळीं. "

" हे बोलणं फार सोपं आहे. पण खरं सांगायचं म्हणजे लोकापवाद मला सहन होणार नाहीं. "

त्याच्या हृदयावर त्या गोष्टींचा किती जबर आघात झाला आहे ही गोष्ट कुमुदिनीला त्याच्या उद्गारांनी पटवून दिली; पण त्याबरोबरच त्याला कोणत्या शब्दांनीं समजवतां येईल हें तिला ठरवितां आलें नाही.

आणि इतकें बोलणे होऊनही कुमुदिनीला आपला विश्वास वाटेलच असें मनोहरला वाटलें नाहीं.

## —३—

त्यानंतर दोन तीन दिवसांनी नंदिनी विल्सन कॉलेजांतून निघून खिन्न हृदयाने स्टेशनच्या बाजूला वळणार तोच सूर्यकांत हंसत डोकीवरील हॅट हातांत घेऊन तिला अभिवादन करीत उभा राहिला. त्यानें त्या वेळी आपल्याला गांठलेलें नंदिनीला मुळींच आवडले नाहीं. तरी पण आपली अप्रसन्नता लपवीत तिनें त्याच्याकडे पाहून हंसल्यासारखे केले, आणि रुमालानें कपाळावरील घर्मबिंदू टिपत ती म्हणाली, " आज रजा होती वाटतं ? "

" वाटेल तेव्हां रजा मिळायला ऑफीस म्हणजे कॉलेज थोडंच आहे ? " तिने आपल्या हास्याला उत्तर दिल्यामुळें आनंदून सूर्यकांत म्हणाला, आणि तिच्या बरोबर चालूं लागला.

" ऑफीस म्हणजे कॉलेज नाही हें मीपण कबूल करते; पण कॉलेजपेक्षांही तिथे अधिक मौज असावी यांत संशय नाहीं ! " नंदिनी म्हणाली.

" कशावरून ? "

" आमच्यापेक्षांही ऑफीसं लवकर सुटतात त्यावरून. "

नंदिनीने नर्मविनोदानें त्याला टोमणा मारला तेव्हां तो कदाचित् वरमून अधिक लगट करण्याची यातायात करणार नाहीं अशी तिची कल्पना होती, पण त्याऐवजी आपल्याला नंदिनीबरोबर फिरायला ही चांगली संधि आहे असें ठरवून तो संभाषण वाढविण्याच्या उद्देशानें म्हणाला, " टोमणे मारण्यांत स्त्रिया पुरुषांना हार जात नाहींत हें कबूल केलंच पाहिजे आतां. "

" त्या बाबतींत तुमचा अनुभव काय असेल तो खरा. पण माझा अनुभव एवढं सांगूं शकेल कीं पुरुषांना स्त्रियांकडून नुसतं हार जाणंच आवडतं असं नाहीं, तर स्त्रियांनीं घातलेली जोड्यांची माळही त्यांना फुलांपेक्षां अधिक आवडते. "

ती केवळ विनोदाकरितांच तसें बोलली नसून त्यामध्यें दिसतो त्याहून खोल अर्थ आहे हें न ओळखण्याइतका सूर्यकांत अचतुर नव्हता. नंदिनीनें ते शब्द उच्चारतांच सूर्यकांतानें आपला खालचा ओंठ चावला आणि मग आपल्या गुळगुळीत मिशी प्रांतावरून हात फिरवून तो म्हणाला, " स्त्रियांकडून पुरुष फुलांच्या माळेची नेहमी अपेक्षा करतात. आणि त्याची पूर्वतयारी म्हणजेच जोड्यांची माळ स्वीकारणं ! "

" मला नव्हतं बाई माहित हें माळेचं शास्त्र !" नंदिनी कसेंबसें म्हणाली आणि त्याला दुसऱ्याच रस्त्याला जायचं आहे, आपला रस्ता निराळा अशीच आपली समजूत झाली असल्याचें दर्शवीत झपाझप पाऊले उचलूं लागली. तिच्याबरोबर सूर्यकांतानेही आपला वेग वाढविला. आपण त्याला आपल्याबरोबर चालतांना पाहिलेंहि नाहीं असेंहि दाखविण्याचा तिच्या मनांत विचार येतो न येतो तोंच सूर्यकांत आपण तिच्याबरोबर अजूनहि चालत आहोत हे तिच्या निदर्शनास आणण्याकरितां म्हणाला, " तुम्हांला घाइनं जायचंय् वाटतं कुठे ? "

" हो " नंदिनीनें आपला वेग कायम ठेवून म्हटले. " लक्ष्मीनारायण मंदिराच्या बाजूला माझी एक मैत्रीण आहे तिच्याकडे जायचं होतं. "

यावर सूर्यकांत किंचित् हंसला आणि म्हणाला, " शहराच्या निरनिराळ्या भागांची नांवं माणसंच बदलतात हें मला आज चांगलं पटलं. "

त्याच्या म्हणण्याचा आशय न कळल्यामुळे नंदिनीनें मागें वळून त्याच्याकडे पाहिलें.

ती कांहीच बोलत नाहीं असें पाहून सूर्यकांत मोठ्यानें हंसून म्हणाला, " तुमच्याच उदाहरणावरून मला ते आतां पटलं. तुम्ही रस्ता धरला आहे ग्रॅन्टरोड स्टेशनचा आणि जायचं म्हणतां लक्ष्मीनारायण मंदिरांत. "

तेव्हां कुठें नंदिनीच्या लक्षांत आलें कीं बेसावधपणें आपण पटवितां न येणारं असत्य बोलून गेलों. आणि मग ती स्वतांला सांवरीत म्हणाली, " कुठें तरी चांगला

चहा घ्यायची मला इच्छा होती म्हणूनच मी अगोदर या बाजूला आलें. पलीकडल्या कोंपऱ्यावरचं तें हॉटेल माझ्या आवडीचं आहे. ”

सूर्यकांताने ताबडतोब संधि साधली आणि तो पुन्हां तिच्याबरोबर चालूं लागून म्हणाला, “ अरे, वा ! तुमच्या आणि माझ्या आवडीनिवडी जमतात कीं ! मीहि कधीं या बाजूला आलो म्हणजे त्याच ठिकाणीं चहा घेतों. चला आपण बरोबरच जाऊं.”

त्यानें आपल्याला लवकर न सोडण्याचा निश्चयच केलेला दिसतो असें वाटून नंदिनी बरीच अप्रसन्न झाली, पण “ तुम्ही माझ्याबरोबर येऊं नका ” हे मनांत असूनहि त्याला स्पष्टपणें सांगतां येणार नाही हे लक्षांत येतांच मग ती कपाळाला एकदां आठी घालून म्हणाली, “ मला ही तुमची आवड माहित नव्हती. नाही तर मी तुम्हाला खास आग्रह केला असता.”

“ विनाकारण वाईट वाटून घेण्याची जरूरी नाही. आपण एकमेकांना अशी काय परकीं आहोंत कीं चहा सारख्या गोड पण साध्या गोष्टीकरितां आग्रहाचं पिल्लु पुढें यावं ! ”

कोणत्या ना कोणत्या कारणानें आपल्या बरोबरच चालण्याचा त्याचा निश्चय पाहून ती मग स्वतांवरच चिडली. त्याच वेळी रजनीनाथाची मूर्ति तिच्या डोळ्यापुढें आली, आणि तिला असे किती तरी प्रसंग आठवले की ज्या वेळी तो आपल्याबरोबर नसावा अशी आपली इच्छा होती त्यावेळी त्यानें आपल्याशीं थोडा वेळ मधुर भाषण करून आपल्याला आपल्या रस्त्यानें जाऊं दिली होती, आणि कांही वेळेला केवळ त्याची गंमत करण्याकरितां आपण त्याला एकटे सोडले आणि मग मागाहून त्याचा विरस केल्याबद्दल आपल्याला वाईट वाटलें होतें. रजनीनाथ आणि सूर्यकांत या दोघांचे आपल्याशीं निराळ्याच प्रकारचे संबंध आहेत हें लक्षांत असूनही तिच्या मनाला त्या तरुणांची तुलना केल्यावांचून राहवलें नाहीं.

दोघांनी मिळून नंदिनीनें दाखविलेल्या हॉटेलांतील चहा घेतला आणि मग पैसे देण्याची पाळी आली तेव्हां सूर्यकांत तिला म्हणाला, “ तुम्हाला पैसे देतां येणार नाहींत. तुम्ही पैसे दिल्यानें आपल्यामधील परकेपणा सिद्ध होईल. ”

" तुम्ही आतां कुठें जाणार आहांत ?" त्याला चुकविण्याच्या उद्देशानें नंदिनी म्हणाली.

" तुम्ही चला कीं तुमच्या मैत्रिणीकडे. माझी कांही हरकत नाहीं तुमच्या बरोबर यायला. तिथून मग आपण बरोबरच निघून दादरला उतरलों की, माझ्या खोलीवर जाऊं."

" विनाकारण तुमची खोटी कां करतां ?" ती भुंवया वक्र करून म्हणाली, " आम्ही मैत्रिणी एकदां बोलायला लागलो की आम्हांला भान उरणार नाहीं आणि तुमचा वेळ मात्र थांबून फुकट जाईल. त्यानंतर आज तरी तुमच्या खोलीवर यायला मिळेल कीं नाहीं याची शंकाच आहे."

" मग तर मी अवश्य बरोबर पाहिजे !" तो म्हणाला, " माझ्या घरीं आज नाही उद्यां याल तुम्ही. पण घरी जाण्याचं भान तर राहिलं पाहिजे तुम्हांला !"

यावर नंदिनीचा नाइलाज झाला.

त्या दिवशी सूर्यकांताला नंदिनीच्या बरोबर पाहून चंचलबेनला आश्चर्यच वाटलें, आणि ती ज्या वेळीं परत जायला निघाली तेव्हां तिची थट्टा करण्याचा मोह अनावर होऊन ती हलकेंच नंदिनीच्या कानांत म्हणाली, " वा ग ! बरीच लबाड आहेस कीं तूं ! आतांपर्यंत हें रहस्य आम्हांला कळूं दिलं नाहीस कुठें ?"

तिचा कोणत्या प्रकारचा गैरसमज झाला आहे हें नंदिनीच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. पण त्या बरोबरच आपण या वेळी तिला कांहीहि सांगितले तरी तिचा आपल्यावर विश्वास बसणार नाही असें तिला वाटले आणि मग ती गंभीर चेहरा करून तिला म्हणाली, " जाते मी आतां !"

उद्यां ही अवखळ मुलगी कॉलेजमधें काय गोंधळ उडवील याची कल्पना येऊन नंदिनी बावरल्यासारखी झाली. त्यामुळे तिनें सूर्यकांताकडे एकदां रागानें पाहिलें आणि मग तो आपल्याबरोबर चालत आहे हे लक्षांत असूनहि त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून ती चालूं लागली.

त्यांच्या कानगोष्टींचा अंदाज सूर्यकांतानें बांधलाच आणि त्याला त्यामुळें मनस्वी आनंद झाला. तो पटकन् तिला म्हणाला " आज स्त्री जातीच्या चातुर्याचे प्रयोग

मला किती लवकर बघायला मिळालें. ज्याला आपण दैवी निर्णय म्हणतों तो हाच नाहीं ? ”

पण त्यावर नंदिनीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

“ माझ्याकडून मी तुम्हांला एवढं आश्वासन देतों कीं, मी तुम्हांला कधींहि दगा देणार नाहीं ! ” तो कांहीं वेळानें म्हणाला.

त्यानें ते शब्द खोल अर्थानेंच वापरले आहेत हें नंदिनीच्या लक्षांत यायला वेळ लागला नाही. त्यानें आपलें रहस्य कोणालाहि सांगूं नये आणि त्याप्रमाणें एकदां तरी सुचवावे अशी तिची इच्छा होती. आपल्याला त्याच्या आश्वासनाबद्दल किती तरी आनंद झाला आहे हें एकदां आपल्या नजरेनें दाखवून ती त्याच्या बरोबर चालूं लागली.

ग्रॅन्टरोड स्टेशनवर आपण रजनीनाथाला गाडीत पाहिलें असावे असे तिला वाटलें, आणि आपल्याला या माणसाबरोबर पाहून त्याच्या मनांत कांहीं किल्मिष तर येणार नाही ना अशी तिला शंका आल्यावांचून राहिली नाही. पण आतां येतील त्या प्रसंगांना तोंड दिलेच पाहिजे असा स्वतःशीच विचार करून ती एक दीर्घश्वास सोडून गाडींत बसली.

* * * *

त्या नंतर तीन चार दिवसांतच असा एक प्रसंग उद्भवला की, त्या वेळी हा सूर्यकांत आहे तरी कोण असा प्रश्न रजनीनाथाच्या मनांत निर्माण झाल्यावांचून राहिला नाही.

त्या दिवशी थंड पाण्यानें स्नान उरकून कपाळावरून पाणी निथळत असतांनाच रजनीनाथ स्नानगृहाच्या बाहेर पडला. त्या वेळेस मावळत्या रविराजाचे किरण त्याच्या डोळ्यावर पडले. रविकिरणांनी आपल्या डोळ्याशीं चालविलेला खेळ पाहून त्याला फार गंमत वाटली, आणि आरशांत आपल्या प्रतिबिंबाकडे पाहून केंसावरून सहजगत्या कंगवा फिरवीत असतांना त्याच्या तोंडून ‘ हर्षनिर्भरें स्वीकाराया तुजला मी सजलों ’ या कुठें तरी ऐकलेल्या कवितेचा चरण बाहेर पडूं लागला. तो चरण म्हणत असतांनाच तो स्वतःशीच खुदकन् हंसला, आणि पुन्हां घोळून तीच कविता पुढें गुणगुणूं लागला. आज नंदिनी प्रथमच आपल्याकडे येणार,

त्यानंतर तिला घेऊन आपण शूटिंग पहायला जाणार, ती समोर असतांना आपल्या दिग्दर्शनाचें सारें कौशल्य आपण तिच्यापुढें प्रगट करणार, आणि मग ' तुला सिनेमांत काम करावसं वाटतं का ? पहा बरं विचार करून. आपल्या कौशल्याच्या जोरावर पैसा आणि कीर्ति दोन्ही सहज प्राप्त करून घेतां येतात ' असं म्हणून तिची थट्टा करणार, या प्रकारचे किती तरी गोड विचार त्याच्या मनांत मंदवायुलहरींप्रमाणें येत जात होते. नंदिनी आणि दिनकरमामा नक्की येणार कीं नाहीं याची खात्री करून घेण्याकरितां त्याने दुपारींच त्यांना टेलिफोन केला होता. या वेळींहि त्याला टेलिफोनवरील संवाद अक्षरशः आठवला,.आणि दिनकरमामासारखा माणूस आपल्या नंदिनीचा पालक आहे या कल्पनेनें त्याला मनस्वी आनंद झाला.

" कोण दिनकरमामा ? " आपण प्रश्न केला होता.

" मीच तो ! इतक्यांत ओळख विसरलां कीं काय ? ".मामा मिस्किलपणानें म्हणाले होते.

" टेलिफोनवर आवाजाची एकदम ओळख पटत नाही."

" तें नावडत्या माणसांच्या बाबतीत म्हणतां येईल. विशेषतः पुरुषांच्या ! तरुणांना स्त्रियांच्या आवाजाची ओळख कुठूनहि पटते."

" हे तुमचे सिद्धांत ऐकण्याकरितां मी टेलिफोन केला नाही कांहीं."

" मग ?"

" तुम्हाला आजची आठवण देण्याकरितां."

" मला आठवण आहे कीं."

" कसली ?"

" वार, तारीख आणि तिथि यांची."

" घसरलांत."

" मग ? "

" आज आमचं शूटिंग पहायला जायचं आहे त्याची. "

" ती आहेच कीं ! "

" मग वेळेवर याल ना ? "

" अहो एकट्याचं जाणं येणं. वेळेवर न यायला काय झालं ? "

" एकट्याचं कसं ? नंदिनी येणार होती ना ? " हे शब्द त्याच्या अगदीं ओठावर आले होते. पण मामांच्या थट्टेखोर स्वभावाची पुरी कल्पना असल्यानें आपल्याला ते उच्चारायला संकोच वाटला, आणि ' अच्छा ' एवढेच म्हणून आपण रिसीव्हर खाली ठेवला होता.

मामांच्या थट्टेखोर स्वभावावरून त्याला नंदिनीच्या खोडकर स्वभावाची आठवण झाली. आठच दिवसांपूर्वी तो तिच्याकडे गेला होता त्या वेळच्या संवादाचें चित्र त्यानें आपल्या मनश्चक्षूंसमोर उभे केले.

" तूं आलं पाहिजेस हं माझ्याकडे !" आपण तिला म्हणाले होतों.

" महाराज आपल्याला जायचं आहे तुमचं शूटिंग पहायला. तुमच्याकडे येण्याची काय जरूरी ? " खालचा ओठ हलकेच दांतांत धरून ती म्हणाली होती.

" तुझी विशेष हरकत नाहीं ना ? "

" आहेच मुळी. "

" कोणती ?

" वांद्याला जायचं म्हणजे मला संकट वाटतं. "

" कां ? "

" तिथली माणसं गांवाच्या नांवाप्रमाणें असतील असं वाटतं. "

" तुझा हा शेरा मलाहि लागू पडेल बरं कां. "

" मला काय त्याचं ? "

" पण तूं येशील ना खरंच ? "

" मी नाहीच येणार. "

तिची त्या वेळची खोडकर नजर आतांहि त्याच्या नजरेंत मिसळूं लागली, आणि त्या भरांत गोड शिरशिरीनें तो गुणगुणूं लागला, ' हर्षनिर्भरें स्वीकाराया तुजला मी सजलें. '

प्रत्येक क्षणाला आपले कपडे चढवीत असतांना कोणी आलें आहे कीं काय हें पहाण्याचा त्याला चाळाच लागला. शर्टचीं बटनें मनाजोगतीं लावून त्यानें पुन्हां केंसावरून हात फिरविला, आणि खिडकीबाहेर नजर टाकून हांक मारली ' बाळू ! '

बाळू मागच्या बाजूला चिलमीचीच मनधरणी करण्यांत गुंग झाला होता. त्याच्या कानीं आपल्या मालकाची हांक पडली नाही.

बाळू जितक्या संथपणाने चिलमीची आराधना करीत होता, तितक्याच अधीरतेने रजनीनाथ त्याला हांका मारीत होता, " बाळ्या ऽ ए बाळोबा ऽ ऽ बाळू ऽ ऽ ऽ–! "

एकावर एक कानीं आलेल्या हांका ऐकून बाळूला आपल्या चिलमीचा मोह बाजूला सारावा लागला, आणि तो फडक्याने तोंड पुसून बाहेर आला.

" गध्या ! "

" साहेब ! " बाळोबा शांतपणानें म्हणाला.

त्या क्षणी बाळोबाची ती ओबडधोबड मूर्ति पाहून रजनीनाथाला हंसू आवरलें नाही. तेलाचा स्पर्श न झालेले केस, एखाद्या पोरक्या पोराप्रमाणे मालकाच्या मानेपर्यंत लोळणारी शेंडी, खुंटासारखी वाढलेली दाढी, कैक दिवसांत साबू न लावलेलें भलेभक्कम जानवे, आणि त्याचा लांडा पंचा या सगळ्याच अवताराकडे पाहून तो हंसू लागला.

त्याच्या त्या बावळट प्रतिमेचे मिस्किलपणानें निरीक्षण केल्यानंतर रजनीनाथ म्हणाला, " एखाद्या म्हशीचा प्राणनाथ व्हायला खरोखरीच लायक आहेस तूं."

बाळोबा कांहीच न बोलतां मालकाच्या आज्ञेची वाट पहात उभा राहिला.

" चहा फराळाची सगळी तयारी झाली ? "

" झाली."

" अच्छा ! जाव तुम. "

त्याला गेलेला पाहिल्यानंतर रजनीनाथाला वाटले कीं, आज आपली सारी काळजी या बाळोबाला घ्यावी लागते. आणखी थोड्या दिवसांनीं नंदिनी या घराची स्वामिनी म्हणून आली म्हणजे बाळोबाची तेवढ्यापुरती तरी सुटका होईल.

नंदिनीची एकदां स्पष्ट शब्दांत संमति घेऊन मग दिनकरमामांजवळ तिच्याबद्दल रीतसर मागणी घालायची, आणि मग आयुष्यांतील उद्यानांत मनसोक्त विहार करायचा, असें त्यानें कैक दिवसांपासून योजून ठेवलें होतें. पण नंदिनीनें बी. ए. झाल्याशिवाय लग्नाचा विचार करूं नये असें यशोदाबाईंचेंच म्हणणें असल्यानें अजूनपर्यंत तो प्रश्न कोणीच उघडपणें काढला नव्हता.

पण नंदिनीच्या प्रेमाचे आपणच भागीदार आहोंत या कल्पनेनें तो त्या विवक्षित क्षणाची उत्सुकतेनें वाट बघत होता.

पोषाखाचें बस्तान मनाप्रमाणें बसल्यावर एका ताज्या सिनेमाविषयक इंग्रजी मासिकाचा अंक घेऊन तो इझीचेअरवर पडला.

त्याचे वाचनाकडे लक्ष होतें की नाहीं कुणास ठाऊक? पण दारावर टक्टक् आवाज ऐकूं येतांच तो अधीरतेनें खुर्चीवरून उठला आणि दार उघडतांनाच ओरडला, " थांबा महाराज, स्त्रिया बरोबर असतांना तरी इतकं अवखळ पोराप्रमाणें दार वाजवूं नये. "

" पण मलाही तुमचं म्हणणं कुठें नाकबूल आहे ? " असें म्हणतच दिनकर-मामा आंत आले.

" किती वेळ केलांत हो यायला ? " मामांच्या पलीकडे नजर टाकून रजनी-नाथ म्हणाला.

" असले भलते सलते आरोप मी ऐकून घेणार नाही हं ! " मामा घड्याळाकडे पहात जवळची खुर्ची ओढून घेत म्हणाले.

" तुमचं घड्याळ बरोबर चालत नसावं; किंवा कलकत्त्याच्या लोकांप्रमाणें तुमचा मुंबई टाईमचा अभिमान जागृत झाला असावा."

बोलतां बोलतां रजनीनाथाने पुन्हां एकदां बाहेर डोकावून पाहिले, पण नंदिनी त्याला कुठेंच आढळली नाहीं.

" मामा आज मी तुम्हांला एकट्यालाच आमंत्रण दिलं नव्हतं. कां मोठ्या माणसांप्रमाणे तुम्हालाही आपल्या बरोबर येणारांचं विस्मरण झालं ? "

" अरे पण गृहस्था, मला धड बसूं देशील कीं नाही ? एकदम प्रश्नांचा मारा केलास तर मला जिवानिशीं पळ काढावा लागेल. "

" त्याबद्दल मी मुद्दाम खबरदारी घेईन. पण नंदिनीला कोणतं कोल्हं आडवं आलं तें सांगा अगोदर."

मामांशीं तो अशाप्रकारें विनोद करण्याचा प्रयत्न करीत असला, तरी नंदिनी न दिसल्यामुळें त्याचा बराच हिरमोड झाल्याचें त्याच्या चेहऱ्यावरून कुणाच्याहि लक्षांत आलें असतें. त्या दिवशीं आपण येणार नाही असें नंदिनी थट्टेनें म्हणाल्याचें

त्याला पूर्ण स्मरत होतें. पण थट्टेंतले बोल ती हरिश्चंद्रानें स्वप्नांत दिलेल्या वचना-प्रमाणें अक्षरशः पाळील अशी त्याला मुळींच कल्पना नव्हती.

" तुम्ही तरुण मंडळी भारी उतावीळ बुवा ! " मामा टेबलावरचा अंक घेऊन म्हणाले, " नाही आली नंदिनी म्हणून तुमचं शूटिंग थोडंच अडून राहणार आहे ? नंदिनीचं येणं म्हणजे कार्यापूर्वीचं गणेशपूजन खास नव्हे."

" तुम्ही तरी मुद्दा सोडून फारच चांगलं वक्तृत्व गाजवतां. नंदिनी न आल्यामुळें माझं काम अडून राहील अशांतला भाग नाही मामा. ती तुमच्याबरोबर येणार होती ती कां नाही आली एवढाच माझा प्रश्न आहे."

" अच्छा ! आम्ही तुमची जास्त कसोटी पाहूं इच्छित नाहीं. तुम्ही कसोटीला उतरला नाहीं हें उगीच एका माणसाला कळायला नको. नंदिनीनं दिलेलं पत्रच तुम्हांला वाचायला देतों म्हणजे झालं."

आपण येत नसल्याबद्दल नंदिनीने लिहिलेलें पत्र वाचण्यानें त्याचा विरस कमी होणार होता अशांतला भाग नाही. पण वल्लभेने प्रियकराला लिहिलेलें तें पत्र असल्यानें एका अमर्याद आनंदाच्या लहरीबरोबर, तें वाचण्याची त्याच्या मनांत उत्कंठा उत्पन्न झाली, आणि मामांच्या हातून तें अधीरतेनें हिसकावून घेऊनच त्यानें तें फोडले. आंतील नोटपेपरची घडी मोडत असतांना झालेला कड्कड् आवाज त्याला कठोर वाटण्याऐवजीं नाद मधुरच वाटला.

नंदिनीने लिहिलें होतें..." रजनीनाथ, त्या दिवशी मी येणार नाही असं थट्टेनंच म्हणालें होतें. पण आज माझी मनःस्थितीच अशी झाली आहे की, मला कुठेंहि जायला उत्साहच वाटत नाहीं. मला शक्य असतं तर खरं कारण तुम्हाला लिहिलं असतं हो. मी हात जोडून सांगते की तुम्ही त्या कारणाचा शोध लावण्याचा प्रयत्न करूं नका. मी सुखासुखी तुमच्याकडे येण्याचं टाळीन का ? मला या वेळीं भेटायचाही प्रयत्न करूं नका..."

नंदिनीनें प्रत्येक शब्द हृदय पिळवटून लिहिला असल्याचें त्याच्या प्रत्ययास येत होतें. तो प्रत्येक शब्द वाचतांना त्याच्या मुद्रेवरहि निरनिराळ्या सूक्ष्म लहरींच्या छटा स्पष्ट दृग्गोचर होत होत्या. पण मुद्रेवर विलसणाऱ्या किंचित् गांभीर्याच्या छटेपेक्षां खोडकरपणाच प्रत्ययाला येत असतांना आजच इतकें आर्जवून लिहिण्या-

सारखा कोणता प्रसंग नंदिनीवर आला असावा, हेंच त्याला कळेना. विशेष कांहीं प्रकार असता तर मामा बोलल्यावांचून राहिले नसते या बद्दल त्याची पूर्ण खात्री होती. पण आल्यापासून मामांच्या नेहमीच्या थट्टा विनोदांत यत्किंचितही खंड पडलेला नाही हे अवलोकिल्यामुळें त्यांना तिच्या दुःखाची माहिती नसावी असेंच त्याला वाटले.

" तिची प्रकृति बरी नाही की काय ? " पत्राची घडी करीत मामांकडे पहात त्यानें विचारले.

" आपल्या प्रश्नाचं उत्तर देईन मी. पण त्यापूर्वी पहिल्यासारखे हंसा बुवा एकदां ! " मामा मिस्किलपणाने म्हणाले, " तरुणांनी इतका गंभीर चेहरा करणं बरं नाही. "

" मामा तुमची गणना अजून कोणीच म्हाताऱ्यांत करणार नाहीं " हे शब्द त्याच्या अगदीं ओठावर आले होते. पण त्यावेळी मुद्रा विशेष हंसरी करणेंही त्याला साधलें नाहीं. " तुम्ही कराल ती थट्टा मला सहन केलीच पाहिजे " येवढेंच तो म्हणाला.

त्या वेळेपर्यंत सूर्यकिरणांनी केव्हांच पोबारा केला, होता आणि आकाशमार्गावर पसरलेली उदासीनता घालविण्याकरितांच की काय पृथ्वीवर विजेचे दिवे लागले होते. एरवी संधि साधून सृष्टीला हंसविणारा रजनीनाथ कुठे लपला होता कुणास ठाऊक ? एखाद्यानें सूक्ष्म अवलोकन केले असते तर त्याला नभोमंडलावर उदासीनतेच्या छायेपेक्षां संध्यारंगाची प्रसन्न छटाच आपल्याला सुखवीत आहे असें वाटले असतें. पण विरसलेल्या रजनीनाथाची त्या दृश्यामुळे अप्रसन्नताच अधिक वाढली.

" विशेष कांहीं नाहीं ना ?" त्याने रुद्ध कंठानें विचारलें.

" छे, हो ! दोन चार दिवसांपासून डोकं बिकं दुखतं आहे एवढंच. पण तरुण मंडळींना पराचा कावळा करायची संवयच जडली आहे, त्याला कोण काय करणार ?"

" मग हरकत नाहीं !" हें रजनीनाथ म्हणाला खरा पण त्याच्या मनांत आलें, ' नंदिनीचं हें दुःख खरोखरच कोणाला सांगण्यासारखं नसेल. कदाचित् मोठीं माणसं काळजी करतील म्हणूनच तिनं ते सांगितलं नसावं !'

मग तो नंदिनीच्या पत्राविषयींच तर्क लढविण्यांत गुंग झाल्यामुळें मधून मधून एखाद दुसरा शब्द बोलण्यापलीकडे संभाषण वाढविण्याच्या भानगडींत पडला

नाहीं. मामा मात्र आज शूटींग कोणतं आहे, त्या त्या पात्रांना दिग्दर्शकाने दिलेल्या सूचना आकलन करतां येतात की नाहीं, प्रत्येक नट हौशीनेंच या धंद्यांत पडला कीं काय, या प्रकारचे किती तरी प्रश्न विचारून आपला चवकसपणा प्रगट करीत होते.

मध्यें एकदां बाळोबानें आणलेल्या फराळाचा दोघांनीही यथाशक्ति समाचार घेतला.

" आपण असं करायचं ?" मध्येंच कांहीं तरी विचार डोक्यांत येऊन रजनीनाथ म्हणाला, " जातां जातां आपण तुमच्याकडे एक फेरी मारून तिच्या प्रकृतीची चवकशी करूं, आणि मग पुढें जाऊं."

रजनीनाथाच्या सूचनेला मामांनी मुळीच हरकत घेतली नाही.

पण ते दोघेही दादरला मामांच्या राहत्या घरी येऊन पहातात तो नंदिनी घरांत नव्हती.

चवकशी अंती नुक्ताच सूर्यकांत आला होता त्याच्या बरोबर ती फिरायला गेल्याचे समजले.

" सूर्यकांत कोण ? " रजनीनाथाने कपाळावरील धर्मबिंदु टिपत विचारले.

" मला वाटतं तो आपल्या मनोहरच्याच फर्ममध्ये आहे. " मामा म्हणाले.

" पण त्याला मी कधी तुमच्याकडे पाहिल्याचं आठवत नाही. "

" त्याची ओळखच मुळी रविवारी झाली. तिला त्या दिवशीं रस्त्यामध्येंच घेरी आली वाटतं. त्या वेळेस तो जवळच होता. त्यानंच तर तिला टॅक्सी करून घरीं आणली. "

कां कोण जाणें पण ही हकिकत ऐकतांच रजनीनाथ किंचित् अप्रसन्न झाला.

आपण त्या दिवशी गाडीतून नंदिनीबरोबर जो इसम पाहिला तोच तर हा नाहीं ना...

हा आपला प्रतिस्पर्धी तर ठरणार नाहीं ना...

ती शंका सृष्टीवर हलकेंच पाऊल टाकणाऱ्या रजनीप्रमाणे त्याच्या हृदयांत डोकावून गेली आणि तीमुळे त्याचें हृदय थोडेसें कंपायमान झाले.

पण घेरी आली असतांना सूर्यकांतानें तिला घरी आणून आपल्यावर उपकारच केले आहेत हें लक्षांत येतांच त्यानें आपल्या शंकेचें समाधान करण्याचा प्रयत्न केला.

मग तो आणि मामा विशेष कांहींच न बोलतां घरांतून बाहेर पडले.

## —४—

नंदिनी सूर्यकांताबरोबर फिरायला गेली होती ही गोष्ट कांही खोटी नव्हती. ती जसजशी त्याला टाळण्याचा प्रयत्न करीत होती, तसतसा तो तिच्या अधिकच मागें लागत चाललेला होता, आणि हलके हलके त्यानें तिच्या चारित्र्याविषयी शंका प्रगट करीत तिच्यासमोर एक विलक्षण मागणी मांडली होती. त्याच्या म्हणण्याला अनुमति द्यावी तर रजनीनाथाचा त्याग करावा लागणार, आणि त्याला झिडकारून वाटेला लावावें तर तो आपली अब्रू चव्हाट्यावर मांडून आपल्या आयुष्याचें मातेरें करणार, ही गोष्ट तिला स्पष्ट दिसत होती; आणि त्यामुळें ती त्या दिवशी फिरून आली ती विलक्षण मनःस्थितीतच. तिला आपली स्थिति विहीरीच्या कांठावरून तोल जाऊन पडणाऱ्या माणसाप्रमाणें वाटली. तोल जाऊन पडणाऱ्या माणसाला कसला तरी आधार हवा असतोच. त्या विवक्षित मनःस्थितींत सूर्यकांतानें पुढें केलेला आधाराचा हात वादळांत एखादी नौका सांपडते न सांपडते तोंच पाण्यांतून कुठे तरी एखादें बेट वर येऊन त्या नौकेला आधार मिळावा तसा तिला वाटला. त्यामुळें सूर्यकांताने केव्हांही तिला ' फिरायला येतेस का ' म्हणून विचारतांच नाहीं म्हणण्याचें तिला धाडस होत नव्हतें. मनाच्या विस्कळीत स्थितीमुळें आपण रजनीनाथाकडे पहिल्यानेंच जाण्याची संधि दवडली, आणि दोनच दिवसांपूर्वी विशेष परिचय झालेल्या सूर्यकांताबरोबर जात आहोंत याबद्दल

तिच्या मनाला असह्य यातना झाल्या होत्या. आपण फुलवीत असलेल्या प्रेमाच्या उद्यानांत प्रतारणेचें बीज पेरत आहोंत ही गोष्ट तिच्या मनांत एकसारखी येऊं लागली.

ती फिरून परत येऊन अभ्यासाच्या खोलींत कॉटवर अंग टाकते न टाकते तोंच यशोदाबाई तिच्याजवळ येऊन बसल्या. त्यांच्या पांढऱ्या फटफटीत भाल-प्रदेशाकडे तिची नजर गेली. मुद्रेचा फिक्कट गोरेपणा, त्यावर नेहमीच तळ देऊन राहिलेली उदासवृत्ति, नजरेतील प्रेमळपणा, आणि देहयष्टिचा कृशपणा या सर्व गोष्टींनी त्या वेळी तिच्या मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम केला की आईकडे पहातांच तिला भडभडून आलें. तिने उजवा हात आपल्या डोळ्यावर घेतला आणि स्वस्थ पडून राहिली.

यशोदाबाईनी कांही वेळ तिच्याकडे पाहिलें, एक जडश्वास सोडला आणि मग त्या तिच्या पाठीवरून हात फिरवूं लागल्या. त्यामुळे तिला अधिकच भडभडून आले. ज्या आईजवळ आपण आतांपर्यंतच्या आयुष्यांत कोणतीही गोष्ट सांगतांना आडपडदा ठेवला नव्हता तिच्याजवळ न सांगण्यासारखें एक रहस्य आपल्याजवळ निर्माण झाले आहे या गोष्टीमुळें ती अत्यंत अस्वस्थ झाली.

" अजून डोकं दुखतंय् ? " यशोदाबाईनी तिचे कपाळ चांचपत प्रश्न केला. आईने विनाकारण काळजी करूं नये म्हणून डोळ्यावरचा हात काढून बळेच हंस-ण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली, " छे, ग ! तूं विनाकारण काळजी करतेस आई. आतां मी फिरून नाही का आले चांगली ? "

" मग अशी बाजूला कां येऊन बसलीस ? " तिच्या केसावरून हात फिरवीत यशोदाबाई म्हणाल्या.

" सहज ! यंदाचं हे शेवटचं वर्ष आहे. एकदां निसटून गेलें म्हणजे बरं वाटेल. '

" पण परीक्षेला किती तरी वेळ आहे अजून. आणि इतक्यांतच तूं काळजी करायला लागलीस ? "

" अग नापास होणारांची संख्या पाहिली म्हणजे उगीचच मन उदास होतं. "

" वेडीच आहेस तूं ! बी. ए. ला आलेल्या पहिल्या मुलीकडे आपण नजर ठेवावी. "

या नंतर मायलेकी कांहीं वेळ स्तब्ध बसल्या होत्या. पहातां पहातां आपण आईला फसवलें, पण या गोष्टीला आपला कांहीं इलाज नाहीं या विचारानें अस्वस्थ होऊन आतां या प्रेमळ जीवांना आपल्याला किती फसवायला लागणार आहे कोण जाणे असा विचार तिला भेडसावूं लागला.

तोंच कांही तरी आठवल्यासारखें करून यशोदाबाई म्हणाल्या, " तूं गेल्यावर रजनीनाथ येऊन गेलें मामांबरोबर. "

" खरंच ? "

तिच्या त्या उद्गारांतच, रजनीनाथानें निक्षून येऊं नका असें लिहील्यावरहि येऊन प्रगट केलेल्या प्रेमाबद्दल आनंद, तो घरी आला असतां त्यावेळी आपल्याला हजर राहतां आले नाहीं याबद्दल वाटणारे दुःख, आणि आपल्याला कुठेंच जायला उत्साह वाटत नाहीं असें लिहील्यानंतर सूर्यकांताबरोबर बाहेर गेल्यामुळें पदरीं खोटेपणा येऊन त्यामुळें वाटणारी भीती, या सगळ्या अवस्था एकवटल्या होत्या. आपल्या मनाची अस्वस्थता लपविण्याचा शक्य तों प्रयत्न करीत ती म्हणाली, " मग मी घरांत नाही असं पाहून काय म्हणाले ते ? "

" काय म्हणणार ? नोकरीवर हजर राहायला पाहिजे म्हणून गेले परत मामांना घेऊन. "

" आतां पुढल्या वेळेला मलाच आपणहून गेलं पाहिजे. "

" तरी हरकत नाही. "

पुन्हां कांही वेळ मायलेकी आपापल्या विचारांत गर्क होत्या. नंदिनीच्या मुद्रेवर वारंवार होणाऱ्या फेरफारांवरून अंतर्यामीं तिला कसलें तरी दुःख होत आहे आणि ते तिला आपल्याला बोलून दाखवितां येत नाहीं...कदाचित् आपल्याला काळजी करावी लागेल म्हणून ती आपल्याला तें सांगत नाही...असा तर्क करून यशोदाबाई हलक्या हातांनी तिचें डोकें थापटूं लागल्या.

आतां रजनीनाथाची आपल्याला शक्य तों लवकर भेट घेऊन त्याला राग आला असल्यास तो घालविला पाहिजे या एकाच विचारांत नंदिनी गुरफटली होती. मधून मधून नुक्तीच झालेली सूर्यकांताची भेट तिला भेडसावीत होती. एकदोन प्रसंगांतच सूर्यकांताला टाळण्याची इच्छा असूनहि त्याच्याशी आपल्याला

तोडून वागतां येणार नाहीं या गोष्टीची तिला पूर्ण जाणीव झाली होती, आणि त्यामुळें ती फार अस्वस्थ होई. आपली आई आणि आपला रजनीनाथ या दोन माणसांना एकदां ती गोष्ट मोकळेपणाने सांगावी, आणि मग त्यांच्या सल्ल्याप्रमाणें सूर्यकांताशी वागावे असे ती ठरवी. पण या गोष्टी आपल्या प्रिय माणसांना सांगणे आपल्याला वाटते तितकें सोपें नाहीं हेंही ताबडतोब तिच्या ध्यानांत येई.

" तीनचार दिवसांत मी शिकवणीला गेले नाही खरं ना ? " कांहींतरी विचार डोक्यांत येऊन आईकडे पहाण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली.

" जाशील बरं वाटलं की, त्यांत काय मोठंसं ? "

" वा ! माझ्या अभ्यासाची जशी मला काळजी घेतली पाहिजे तशी विद्यार्थिनींच्या अभ्यासाबद्दलही मी दक्षता बाळगली पाहिजे. त्या फीच्या जोरावर तर मला मामांना थोडाफार हातभार लावतां येतो आहे ना ? "

" पण मामा तुला कांहीं बोलत नाहीत ना ? "

" ते खरं ग ! पण आपल्याकडून आपण शिक्षणाचा थोडासा तरी खर्च बाहेर काढला पाहिजे. "

" तशी स्वावलंबीच आहेस तूं. "

आईच्या तोडचे ते उद्गार ऐकतांच तिला गहिवरून आले आणि तिनें आईचे दोन्ही हात धरून आपल्या गालावर ठेवले.

* * * * *

सकाळी उठतांच नंदिनी स्नान आटोपून शिकवणीला जातें म्हणून बाहेर पडली आणि रात्री ठरविल्याप्रमाणें वांद्र्याच्या रस्त्यानें चालूं लागली. ती सकाळची आल्हाददायक वेळ असली तरी दिवसाच्या सुरवातीलाच सूर्याचा ताप असह्य होत होता. उद्योगधंद्याला जाणाऱ्या लोकांची एकच गर्दी उडाली होती. वर्तमानपत्रे विकणारे छोकरे जमेल ती धांवपळ करून जगांत घडलेल्या वृत्तांताच्या आवृत्ति साऱ्या जगभर पसरीत होते. नंदिनी मात्र चालतांना आपल्याच विचारांत गर्क होती. नाही तर सारें जीवन कसे धांवपळीचें आहे याचा नमुना अवलोकून ठेवण्याची संधि तिनें वायां दवडली नसती.

मूनलाइट ब्लॉक्सच्या पायऱ्या चढतांना तिच्या डोक्यांत किती तरी निरनिराळ्या विचारांनीं थैमान घातलें होतें. आपल्या वल्लभाच्या घरीं आपण पहिल्यानेंच एकटी जात आहोंत या गोष्टीचा आनंद, भेटीच्या परिणामाविषयीं वाटणारी साशंकता, आणि शक्य तों लवकर त्याला भेटून त्याच्या मनांत आपल्याविषयीं कांहीं किल्मिष आले असल्यास तें घालविण्याची उत्सुकता, यामध्यें सरशी कोणाची आहे तें सांगणें तिलाहि कठीणच झाले असतें.

रजनीनाथाच्या दारासमोर उभी राहतांच तिनें इकडे तिकडे पाहून टिक् टिक् आवाज केला. आपल्या बारीकशा टिचकीनें त्याची उशीरा सुरू केलेली झोंप तरी पुरी होईल की नाहीं कोण जाणे, असें तिच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाही. पण या बाबतीत तिनें कोणत्याहि प्रकारची संशयरत्नमाला गुंफण्यापूर्वीच आंतून पडल्या पडल्याच रजनीनाथानें केलेला ‘ कोण आहे ’ हा प्रश्न तिच्या कानी आला.

तिनें कांही वेळ वाट पाहिली पण कोणीहि येऊन दार उघडलें नाही. जिन्याच्या बाजूच्या दोन ब्लॉक्सची दारें बंद असल्यानें त्या ठिकाणी तिन्हीसांजाच्या वेळेप्रमाणें ठाणें देऊन राहिलेल्या अंधुक प्रकाशांत उभी राहण्याची तिला भीति वाटली. या वेळीं कोणी आपल्याला इथे उभी राहिलेली पाहिली तर पहाणारा कांहीं तरीच तर्कट उभारल्यावांचून राहणार नाहीं हा विचार तिच्या डोक्यांत येऊन गेला. तिनें पुन्हां टिक् टिक् आवाज केला.

“ अरे कोण आहे ?”

या वेळीं आंतून आलेला प्रश्न त्रासिकपणें विचारलेला होता ही गोष्ट तिला कळून आली. त्या बरोबरच ‘ बाळोबा, बघ बाहेर कोण आहे ते आणि मी घरांत नाहीं असं सांग त्यांना. ’ हा हुकूमही तिला ऐकूं आला.

मग मात्र नंदिनीच्या अप्रसन्न मुद्रेवर स्मित चमकूं लागलें, आणि त्या ठिकाणी ऊनपावसाचा खेळ सुरू झाला. तिच्या खोडकर मनाला आपल्या वल्लभाची कांहीं तरी गंमत करायचीच या कल्पनेनें जो आनंद झाला तो ऊन जमिनीवर थोडेसे सिंचन झाल्याप्रमाणें होता.

बाळोबा येऊन दार उघडीपर्यंत खालचा अधर दांतांत धरून तिनें टिक्टिक् करण्याचा तडाखा लावला, आणि बाळोबानें दार उघडतांच त्याच्या तोंडून माल-

काचा हुकूम ऐकण्यापूर्वीच ती घरांत शिरून रजनीनाथाचा शोध घेऊं लागली. अबला म्हणविणारी पण आपल्याला धटिंगणाप्रमाणें बाजूला सारून पटकन् आंत घुसणारी, ही या घरांत येणारी पहिली स्त्री कोण आहे या बद्दलच आश्चर्य करीत बाळोबा तिच्याकडे पाहूं लागला.

नंदिनी आंत शिरली त्या वेळेस रजनीनाथाची दाराकडे पाठ असून तो एका इझीचेअरवर डोळे मिटून पडला होता. वाचण्याकरितां म्हणून उघडलेलें 'स्वप्न सृष्टि' या नांवाचें इंग्रजी मासिक त्याच्या छातीवर पडलें होतें, आणि त्याची मुद्रा बरीच अप्रसन्न दिसत होती. नंदिनी त्याच्या समोरची एक खुर्ची फर्रकन् ओढून घेत म्हणाली, "अहो महाराज, तुम्ही अजूनहि जुने रीतीरिवाज फार पाळतां."

त्याला नेहमींच आनंददायक वाटणारा तो आवाज ऐकतांच त्याने हलकेच डोळे उघडून तिच्याकडे न्याहाळून पाहिलें, आणि मग तो चटकन् हंसून म्हणाला, "आणि तुला तरी कांही शिष्टाचार माहित आहेत कीं नाहीत? मी घरांत नाही असं कळूनही बेधडक आंत घुसतेस, याला काय म्हणावं?"

त्याच्या मुद्रेवर प्रगट झालेली टवटवी आणि उद्गारांतील विनोद लक्षांत येतांच, त्याला आपल्या आगमनामुळें कसा अवर्णनीय आनंद झाला आहे हे नंदिनीच्या लक्षांत आले.

"मी त्याबद्दलच बोलत होते. नवी रीत पाळायची म्हणजे आपणच दार उघडायला समोर यायचं, आणि पाहुण्याला सांगायचं की आपल्याला घालवून द्यायला आमचा गडी नाही जाग्यावर." नंदिनी म्हणाली.

आणि यावर दोघेही मनमुराद हंसली. दोघांनाही एकमेकांच्या भेटीनें होणारा निर्भेळ आनंद त्यांच्या मुद्रेवर प्रतीत होत होता.

"याच्यापेक्षां तूं काल अमलांत आणलेली पद्धत बरी आहे कीं!" रजनीनाथ म्हणाला. "आपल्याला येतां येत नाही असं खुशाल कळवावं आणि मागाहून आपण फिरायला निघून जावं."

"असं काय बोलतां हो?" नंदिनी गोरीमोरी होऊन म्हणाली; "अचानक जायला लागलं त्याला माझा तरी काय इलाज?"

"माझं कुठं काय म्हणणं आहे? अशा वेळेला अचानकच जायला लागतं."

" तुम्ही असं टोंचून बोलणार असाल तर मी जाईन हं. "

" किती मुद्देसूद बोललीस आतां तूं ! "

" म्हणजे मी जावं असंच तुमचं म्हणणं आहे की काय ? "

" अजून मी दरवाजा बंद करून तुला अडवली नाहीं."

" मग जातेंच मीं. "

पण बोलल्याप्रमाणें नंदिनीनें जाण्याचा अभिनयहि न केलेला पाहून रजनीनाथाला खूपच हंसूं कोसळले, आणि मग मात्र तिचें दोन्ही हात आपल्या हातांत धरून तो तिच्याकडे पाहूं लागला.

आपले हात त्याच्या हातांतून सोडवून घेण्याचा तिनें मुळींच प्रयत्न केला नाही, पण त्या पहिल्या हस्तस्पर्शाच्या आनंदानें अंगावर शिरशिरी येण्याच्या मनःस्थितींतहि ती नव्हती. प्रसन्न हृदयाला मंद वायूची झुळूक खुलविल्यावांचून राहत नाहीं पण अप्रसन्न मनाला वायूनें आपल्याशीं चालविलेल्या खेळाची दादहि नसते असाच प्रकार नंदिनीच्या बाबतींत झाला. ज्या हातांत आपला हात जावा अशी तिनें आकांक्षा बाळगली होती त्याच हातांत आपला हात असतांना आपले रहस्य त्याला कळलें तर हें स्वप्न खरे ठरणार कीं नाहीं, या कल्पनेनेंच ती साशंक झाली. तिच्या न कळतच तिच्या उरोजाची जडता दर्शविणारी हालचाल झाली.

" तुझी प्रकृति बरी नाही का ? " त्यानें कांहीं वेळानें गंभीर होऊन विचारलें.

" असं झालंय् खरं. "

" मग आपण एखाद्या डॉक्टरकडे जायचं का ? "

" नको ! एखाद्या वेळी डोकं बिकं दुखतं त्याबद्दल काय इतकी काळजी करायची ?"

" अच्छा ! मग डोकं दाबून धरूं मी ? "

आणि असें म्हणून तिच्या संमतीचीहि वाट न बघतां त्यानें तिचें डोकें खरो-खरच दोन्हीं हातांत दाबून धरलें. आतांपर्यंत कधींहि न अनुभवलेल्या आनंदाच्या लहरी जोरांत उसळल्यामुळें तिची देहयष्टि किंचित् थरथरत होती, हृदय धडधडत होतें; आणि कां कोण जाणें पण डोळे जमिनीकडेच बघत होते. तिच्या भाल-प्रदेशावर दिसूं लागलेले घर्मबिंदु त्याला हरिततृणावर पडलेले दंवबिंदु वाटले. तो अनिमिष नेत्रांनी तिच्याकडे पाहूं लागला. तोंच त्याची नजर समोरच टांगलेल्या

एका पौर्णिमेच्या देखाव्याकडे गेली. आणि त्या वेळीं दंवबिंदूची कल्पना अगदी न कळत त्याच्या डोक्यांतून नाहींशी होऊन तिच्या भालप्रदेशावरील कुंकुमतिलक आणि भोंवताली विलसणारें धर्मबिंदु त्याला त्याच चित्रांतील नक्षत्रवलयांकित सुधाकराप्रमाणें वाटूं लागले.

" इश्श ! कोणी पाहिलं तर ? " हे उद्गार तिच्याजवळ ओठांतच राहिले.

तोंच इकडून तिकडे झेप टाकून उडून जाणाऱ्या कोणत्या तरी पांखराच्या पंखांचा फडफडाट ऐकूं आल्यामुळें तो दचकला, आणि तिच्यापासून खुर्ची किंचित् दूर सरकवून बसला. पण त्या फडफडाटानें नंदिनीच्या हृदयाचा मात्र खरोखरीच फडफडाट झाला. तिनें आपला पदर सारखा केल्यासारखें केलें, व खुर्चीवरून उठत ती म्हणाली, " मी जातें आतां. "

" इतक्या लवकर ? "

" आणखी पांच मिनीटं बसते हवी तर."

" आज तूं पहिल्याने माझ्याकडे आली आहेस; थोडासा पाहुणचार तर घेशील कीं नाहीं ? "

" चाल तें घेईन पण त्याला पाहुणचार म्हणूं नका. "

" आणि जेऊन गेलीस तर ? "

" नको उगीच! शिकवणीला जायच्या निमित्तांनें मीं बाहेर पडलें. घरीं जाऊनच जेऊन कॉलेजांत जाईन."

" अच्छा !"

थोड्याच वेळांत ती आनंदित हृदयानें घरीं जाण्यास निघाली.

ती आपल्याच विचारांत गर्क होती तो रस्त्यांत कुणी तरी मुद्दाम थांबून विचारलेलें तिला ऐकूं आलें, " या वेळीं कुठें ? "

तिनें चमकून पाहिलें तों सूर्यकांत आपल्याकडे पाहून हंसत आहे असें तिला आढळून आलें.

" शिकवणीला गेलें होतें मीं ! "

" असं, असं !"

" तुम्हीं ? "

" फिरायला गेलों होतो. "

" बरं आहे; जाऊं या आतां ! "

" मी येतों संध्याकाळीं फिरायला जायला."

" आज का ? " नंदिनी पटकन् विचार केल्यासारखें करून म्हणाली, " मला बाहेर जायचंय् जरा."

" उद्यां ?"

" उद्यांही काम आहे थोडसं."

" तुम्हाला अवघड वाटत असेल तर मी येणार नाही तुमच्या घरीं ! " सूर्यकांत केसावरून हात फिरवीत तिच्याकडे स्मितपूर्वक पहात म्हणाला, " तुम्हीच येत चला माझ्याकडे; तेंच अधिक बरं. "

झटपट त्याच्या पुढून निघून जातांना किंचित् मुक्ततेचा नंदिनीला भास झाला. पण होत आहे ही गोष्ट थराला तरी कोणत्या जाणार हें मनांत येऊन ती अस्वस्थ झाली. पुन्हां सूर्यकांतानें हांक मारूं नये म्हणून तिने आपला चालण्याचा वेग वाढविला.

ती जाणून बुजून आपल्याला टाळण्याचा प्रयत्न करीत आहे हे लक्षांत आल्या-मुळे, सूर्यकांताला तिला आपल्याकडे खेचून आणण्याची कांहीं तरी योजना केली पाहिजे असे वाटलें, आणि या वेळीं तरी तिनें आपल्याला अवमानित केलें आहे या गोष्टीची चीड येऊन तो चालूं लागला. कोणाचेंही त्याच्याकडे लक्ष गेलें असतें तर दंश धरणारा सर्पच फुत्कार टाकीत चालला आहे अशी पहाणाराची खात्री झाली असती.

## ५—

नंदिनीला आपल्या मदतीची किती जरुरी आहे हे तिला पटवून देण्याचा निश्चय करून, सूर्यकांतानें लवकरच एक बिनसहीचे पत्र माधवराव सबनीस यांच्या नांवावर रवाना केलें. आणि त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्याला पाहिजे असलेला प्रसंग घडून आला.

त्या दिवशी पहाटें उठून, पांखरांच्या किलबिलाटांत सृष्टिसुंदरीच्या बिछान्या-भोंवतीं लोंबकळत असलेला मच्छरदाणीचा पडदा बाजूला सरून ती बाहेर निघेल त्या वेळचा आल्हाददायक देखावा पहाण्याकरितां नंदिनी किती तरी गोड कल्पनांचे मनोरे उभारीत होती. कोमल सूर्यकिरणांनीं स्वच्छंदानें बागडायला सुरवात केली म्हणजे आपण सबनीसांच्या घरीं जाऊन छोट्या विमलनें काल वक्तृत्व समारंभांत मिळविलेल्या यशाबद्दल तिचें अभिनंदन करायचे, नंतर तिथून निघून कॉलेजांतील एका निबंधाबद्दल प्रोफेसरांनीं आपली कशी प्रशंसा केली तें सांगण्याकरितां मुद्दाम रजनीनाथाकडे जायचें, आणि त्यानंतर दुपारीं कॉलेज सुटल्यावर आईला आणि मामींना घेऊन एखाद्या सिनेमाचा शो गांठायचा...कालच्या दिवसांत आपण आणि आपल्या विद्यार्थिनीनें मिळविलेल्या यशाबद्दल आजचा दिवस पूर्ण आनंदांतच घालवायचा असा तिनें निश्चय केला होता.

थंड पाण्याचें स्नान उरकतांच तिने एक पांढरे शुभ्र पातळ परिधान केलें, डोकींत बटमोगऱ्याचें एक फूल ऐटीने खोवले आणि पायांत चपला अडकवीत ती यशोदाबाईना हांक मारून म्हणाली, " आई मी जाऊन येते ग ! "

" इतक्या लवकर ? " यशोदाबाईनी प्रेमभराने तिच्या प्रसन्न मुद्रेकडे पाहून विचारलें.

" आज मीं पुष्कळ कामं उरकणार आहे; आणि संध्याकाळी आपण मग सिनेमाला जाऊं बरं का ! मामींना म्हणावं परवानगी घेऊन ठेवा मामांची. "

" म्हणजे आम्हाला न्यायचा बेत नाही वाटतं ? " दिनकरमामा तिची थट्टा करण्याच्या हेतूने म्हणाले.

" अंऽहं ! "

" पहा बुवा; मग आपण कांहीं परवानगी देणार नाही तुझ्या मामीला."

" अहो परवानगी नांवाला विचारायची एवढंच. नाहीं तर आम्ही कुठें विचारतों तुम्हाला ? "

आणि आपण मामांची कशी गंमत केली याचा मनाशी सहज चाळा करीत ती निघाली.

ती सबनीसांच्या घरांत शिरली त्या वेळेस धाकटी बेबी ' विमलच्या बाई आल्या, विमलच्या बाई आल्या ' म्हणून ओरडूं लागली, आणि पहातां पहातां आजूबाजूची किती तरी मुले तिथें जमून तिला गराडा घालून उभी राहिलीं. नंदिनीनें आळीपाळीनें प्रत्येकाला पाठीवर थोपटले, कोणाच्या गालावर ' अरे लबाड' म्हणून टिचकी मारली आणि कांहीचे प्रेमभराने मुके घेतले. नंतर तिनें विमलला हाताशी धरून तिचे दोनचार मुके घेतले, आणि मग ती म्हणाली, " एका माणसा-कडून आम्हाला पेढे पाहिजेत हं."

" पेढे तुम्ही द्यायचे बरं का ! " माधवराव सबनीस त्या ठिकाणीं येऊन म्हणाले.

तोंच ' माधवराव सबनीस ' असें नांव पुकारून पोस्टमननें एक पत्र आणून त्यांच्या हातांत दिलें.

" कोणाचं आहे पत्र ? " असे विचारीत माधवरावांची पत्नी त्या ठिकाणीं आली.

नंदिनीनें सहज त्या वेळीं त्यांच्या मुद्रेकडे पाहिले. ती नेहमीपेक्षां तिला अधिक गंभीर वाटली.

" कांहीं समजत नाहीं ! पत्रावर सही तर कोणचीच नाहीं ! आणि आंतला मजकूर..."

पण त्याच वेळीं त्यांनी एकदां नंदिनीकडे पाहिले, आणि किंचित् विचारमग्न होऊन ते बोलायचे थांबले.

" सांगण्यासारखं नाहीं ? " विमलच्या आईने विचारले.

" तसं नाही...पण...मग वाचलं तर नाही का चालणार ? "

माधवरावांनी पत्राची घडी करून ते टेबलावर ठेवले, आणि नंतर कांही वेळ विचार करून म्हणाले, " तुमचं शिकवणं जरा लवकर आटोपा हं. मला तुमच्याशीं कांही खाजगी बोलायचंय्."

नंदिनी आणि विमलची आई दोघींनांही माधवरावांची ती विनंती नेहमीपेक्षां वेगळी वाटली. त्या पत्राचाच या बोलण्याशीं कांही संबंध नाही ना अशी शंका दोघींच्याही हृदयांत एकाच वेळी डोकावून गेली, आणि नंतर विमलची आई नंदिनीकडे एकदां चमत्कारिक नजरेने पहात आंत निघून गेली.

त्या नजरेनेंच नंदिनीच्या हृदयाचा विलक्षण थरकांप झाला. जी गोष्ट आपण चोरून ठेवण्याचा प्रयत्न करीत होतों, तीच कोणीतरी आपल्याला या घरांतून घालविण्याकरितां माधरावांना मुद्दाम कळविलेली दिसते असे नंदिनीला वाटलें आणि मग ती अस्वस्थ झाली. आपली शंका खरीच ठरली, तर असली हीन चारित्र्याची बाई आपल्या मुलीला शिकवायला उपयोगी नाही असा विचार करून घरांतली सारीं मंडळी आपली निर्भत्सनापूर्वक बोळवण करणार त्या पूर्वीच आपण या घराचा निरोप घ्यावा असे तिला वाटूं लागले. विमलला शिकवितांना प्रत्येक क्षणाला तेच तेच विचार तिला भेडसावूं लागले, आणि कोणाचाही हंसण्या खिदळण्याचा आवाज कानावर येतांच ती दचकूं लागली.

मध्येंच एकदां विमलनें कांही तरी शंका डोक्यांत येऊन " बाई या गणितां-तली पुण्याला जाणारी गाडी रूळावरून घसरली तर आपलं उत्तर बरोबर कसं

येईल " असा प्रश्न केला, आणि त्यावर ' बाळबोध पुस्तक काढून बघ ' असें कांहीं तरी नंदिनी पुटपुटली.

बाईनीं आपल्याला प्रश्नाचें उत्तर देण्याऐवजीं बाळबोध पुस्तक पहायला कां सांगितलें हें लक्षांत न आल्यामुळें विमल नंदिनीच्या तोंडाकडे पाहूं लागली.

त्याच वेळी माधवरावांना काय वाटलें कोण जाणे ! त्यांनीं आपल्या तोंडावरील वर्तमानपत्र बाजूला सारून तिच्याकडे रोखून पहात म्हटलें, " विमलची सारी जबाबदारी तुमच्यावर आहे हो."

त्या उद्गारांतील जबाबदारी या शब्दानें नंदिनी फारच दचकली.

मध्येंच विमलच्या आईला तें पत्र वाचल्यावांचून न राहवल्यामुळे ती बाहेर आली, आणि माधरावांना कळूं न देतां ते हलकेंच आंत घेऊन गेली. नंदिनीचें त्यांच्याकडे लक्ष होतेंच. आणि आजपर्यंतच्या अनुभवावरून ती याच बाईच्या उपहासाला अधिक घाबरत होती.

तिची विचार मालिका चालू होती.

या ठिकाणीं अधिक वेळ राहिलें तर आतांच या घरांतील माणसांच्या निर्भर्त्सनेला आपल्याला बळी पडावं लागेल...

मोठ्या माणसांनी आपली निर्भर्त्सना करतांच घरांतलीं मुलंबाळंहि ' या आमच्या विमलच्या बाई बरं का ' असं टोचून बोलूं लागतील...

आजूबाजूला घरांत काम करणारा गडी वावरत असला तर तो सुद्धां पानानें रंगलेले दांत दाखवून आपल्याकडे पाहून कुचेष्टेने हंसणार...

या ठिकाणी कसें वागावें हें न कळल्यामुळें तिनें असहाय्य नजरेनें एकदां खिडकीबाहेर पहाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं कांही कावळे एका झाडाच्या फांदीवर बसून ' काव काव ' करीत होते, एक चिमणी असहाय्यतेनें त्यांच्या तडाख्यांतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती, आणि जवळच्याच चाळीत वावरणारा एक बोका त्या चिमणीवर झडप घालण्यासाठी टपून बसलेला दिसत होता.

ताबडतोब उठून चालूं लागण्याचा विचार तिच्या डोक्यांत आला. पण त्या बरोबरच माधवरावांना कबूल केल्याप्रमाणें त्यांचे म्हणणे ऐकल्यावरच आपल्याला जातां येईल हें तिच्या ध्यानांत आलें. यानंतर आपल्याला विमलला सोडून जावें

लागणार ही कल्पना तिच्या डोक्यांत आली आणि त्याबद्दल ती अधिकच उदास झाली.

" आतां आपण आज शिकवणं बंद करूं हं ! " कांहीं वेळानें ती म्हणाली.

" झालं ? " माधवरावांनी प्रश्न केला.

" हो; शिवाय आज कॉलेजांत लवकर जायचंय्."

आपल्याला तिच्याशी जें बोलायचें आहे ते बोलायला सुरवात कशी करावी याचा माधवराव स्वतांशीं विचार करीत होते, तोंच विमलची आई तें पत्र घेऊन बाहेर आली. तिच्या मुद्रेकडे नजर जातांच आपण ज्याला भीत होतो तेंच संकट आतां आपल्यापुढें उभें आहे ही नंदिनीची खात्री झाली.

विमलची आई सरळ तिच्याजवळ आली आणि म्हणाली, " बाई उद्यांपासून तुम्ही येऊं नका विमलला शिकवायला. माझी मुलगी बाजारबसवी बनूं नये अशी माझी इच्छा आहे. तुमचा आजच्या दिवसांपर्यंतचा पगार घेऊन चला."

आपल्या पत्नीनें एकदमच या प्रकारची सुरवात केलेली पाहून माधवराव तिच्या तोंडाकडे पाहूं लागले.

" असं माणसाला तोडून बोलणं बरं नव्हे ! " ते म्हणाले.

" त्याचा विचार मी मग करीन." एवढें म्हणून ती नंदिनीकडे पाहूं लागली.

विमलच्या आईचा स्वभाव विशेष माहित असूनही ती ज्या पद्धतीने बोलली तीबद्दल नंदिनीला आश्चर्य वाटल्यावाचून राहिलें नाही.

विमलही आश्चर्यानें तिच्याकडे पाहूं लागली.

एकाएकीं नभोमंडळात विजेचा कडकडाट व्हावा आणि पांखरादिकांनीं भयभीत होऊन बसावें त्याप्रमाणें त्या ठिकाणी कांही काळ स्तब्ध झालें.

मग नंदिनीनें विचार केला की आपण कांहींच न बोलतां परत निघणेंच श्रेयस्कर आहे...

तिनें प्रेमभरानें विमलच्या मुखावरून हात फिरविला, आणि जड हृदयानें ती बाहेर पडली.

रस्त्यांतून चालतांना मात्र तिला हलकें हलकें परिस्थितीची जाणीव होऊं लागली. या एकाच अपमानानें या पुढें आपली कशी विटंबना होणार आहे याची तिला

कल्पना येऊं लागून ती हताश झाली. आपल्याला आतां रजनीनाथाकडे जायचे आहे या गोष्टीची तिला आठवण होती. या वेळीं त्याच्याकडे जाऊन त्यानें आपल्या अप्रसन्नतेचें कारण विचारल्यास तें आपल्याला सांगतां येणार नाही असें वाटल्या-वरून तिने तो बेत रहित केला.

पण आपली एक शिकवणी आज बंद झाली आणि कदाचित् पुढें मागें याचा परिणाम इतर शिकवण्यावरही होईल आणि त्या प्रमाणांत आपल्या खर्चाचा बोजा मामांवर अधिक पडेल, आईला किंवा मामांना तर त्यांचीं कारणे सांगतां येणार नाहीत आणि शिकवण्या सुटल्याची हकिकत तर त्यांना सांगावी लागणार या विचारांनीं ती गोंधळली.

आणखी थोडा मार्ग आक्रमण केल्यानंतर आपण रजनीनाथाकडे जाण्याचें मुद्दामच टाळीत आहोंत ही गोष्ट तिच्या हृदयाला बोंचू लागली. त्याच्यावर आपण आजपर्यंत प्रीतीचा वर्षाव करीत आलों, त्यानेंही तितक्याच तत्परतेनें ती लता वाढवायला पाणी घातले, आणि त्या लतेची फळें आपल्याला दिसूं लागण्यापूर्वीच त्याच्याशी आपण लपंडाव खेळायला लागावं...

चांगली आहे का ही गोष्ट ?...

ही प्रतारणा तर होणार नाहीं ?...

का सगळी हकिकत त्याच्या कानावर घालावी आणि...

पण आपल्या प्रत्येक शब्दावर त्याचा विश्वास बसला तरच ज्या परमोच्च सुखाकरितां आपण धडपडत आहोंत त्याचा लाभ होणार...

आपल्याला स्पष्टपणें विचार करतां येत नाही हे तिच्या प्रत्ययास येऊं लागले होतें. पण ज्या प्रश्नाचा आपल्या जीवीताशीं दुर्दैवानें निगडीत संबंध आला आहे त्या विषयी आपल्याला विचार केल्यावांचून गत्यंतर नाही हेंही तिला नाकारतां येत नव्हतें.

आपण आपल्याकडून रजनीनाथाची खात्री पटविण्याचा शक्य तों प्रयत्न करूं पण आजच्यासारखेंच दुसरें एखादें पत्र त्याच्या नांवावर रवाना झाले आणि मग त्यानं आपला त्याग केला...

‘ माझ्या प्रीतीची अशी विटंबना केलीस ? ’ तो या वेळीच आपल्याला संतापानें तो प्रश्न विचारीत आहे असा तिला भास झाला.

‘ माझ्यावर विश्वास नाही तुमचा ? ’ आपण साश्रुनयनांनीं विचारलें.

पण अश्रू जमीनीवर पडून कांही वेळाने वाळून गेले आणि हेटाळणीनें आपल्याकडे पहात असलेला रजनीनाथ फक्त त्या ठिकाणी तसाच राहिला.

किंचित् भानावर येतांच तिने नभोमंडलाकडे नजर टाकली. आपल्याला या दुःखापासून मुक्त करणारा कोणी नाहीच की काय असा प्रश्न तिच्या दृष्टींत पूर्णत्वाने उमटला होता.

मग हा दुष्टावा कोणी साधला असावा या विषयीं तिच्या डोक्यांत विचार येऊं लागले.

त्या चाळीतील स्त्रियांचें हास्य तिच्या कानांत अजूनही घुमत होते. पण त्यापैकीं कोणालाही आपली हेटाळणी करण्यापलीकडे कांहींच साधण्याची जरूरी नाही. ज्या व्यक्तीला आपल्यापासून कांही तरी ताप झाला असेल किंवा आपण न कळत तिचा अपमान केला असेल अशीच एखादी व्यक्ति या संधीचा चतुरपणें फायदा घेणार ही गोष्ट स्पष्ट होती.

आणि यावेळी न कळत तिच्या मनाने ‘ हें कृत्य सूर्यकांताचें असावें असें तुला वाटत नाही का ? ’ असा प्रश्न तिला हलकेच विचारला.

सूर्यकांताने आपल्याला अभय देण्याचे कबूल केलें आहे असें तिला वाटत होतें, पण त्याबरोबरच त्यानें ‘ तुम्हीच येत चला माझ्याकडे ’ हे दटावणीच्या स्वरांत उच्चारलेले शब्दही तिला आठवत होते.

आपल्याला अभय देणारा सूर्यकांत खरा की...

मागच्या प्रसंगांचा जों जो ती अधिक स्पष्टपणे विचार करूं लागली तो तों आपल्या भवितव्याची खरी सूत्रें त्याच्याच हातीं आहेत ही गोष्ट तिला समजूं लागली.

मग आपण यावेळी कसे वागावें हें दाखविणारा तोच कीं काय ?–तिनें स्वतःशीच प्रश्न केला.

आणि त्या दिवशीं मनोहरकडून आपण घरीं आलों त्या वेळेस त्याच्याच चतुरपणामुळे घडलेली हकिकत बाहेर फुटली नाही ही गोष्ट तिला आठवली.

पण तें कृत्य त्याचेंच आहे हें मनांत आल्यानंतर या पुढें तरी त्यानें आजच्याच मार्गाचें अवलंबन करून आपल्याला खोल गर्तेत लोटूं नये असे तिला वाटलें, आणि त्या दृष्टीनें या वेळीच त्याला भेटून अभय मागण्याचा तिनें विचार केला.

तिला लांबून येतांना पाहून सूर्यकांत दारांतच तिचे स्वागत करायला उभा होता. ती जवळ येतांच किंचित् मान लवविल्यासारखें करून स्मितयुक्त मुद्रेनें तो म्हणाला, " हॅलो ! तुम्हीं यावेळीं याल असं वाटलं नव्हतं मला. परवां रस्त्यांत कबूल करूनही तुम्हीं आला नाहीं तेव्हां म्हटलं मला गुंगारा देतां की काय ? "

त्या क्षणीं, या सर्वस्वी परक्या पुरुषाच्या मुठीत आपल्या पुढील सुखदुःखाचीं सूत्रें देऊन यावेळीं त्याच्याकडे असहाय्यतेनें आपल्या दुःखाची कहाणी सांगायला आलों आहोंत, या कल्पनेनें नंदिनीला आपल्या स्वाभिमानाला जबरदस्त धक्का बसत आहे याची पूर्ण जाणीव झाली. आपण आल्या पावलीच परतलों तर याच्या एका उपकाराचा बोजा तरी आपल्यावर पडणार नाहीं असे वाटून तिनें निघण्याचा निश्चयही केला. पण निघायला पायच उचलत नसल्यानें निदान याच्यासमोर दीनवाणी तरी उभी राहूं नये असें वाटून तिनें आपली मुद्रा शक्य तो हंसरी करण्याचा प्रयत्न केला. तथापि तिचा तो प्रयत्न दाट ढगाआडून हंसतमुखानें सृष्टीकडे बघण्याचा फोल प्रयत्न करणाऱ्या चंद्रबिंबाप्रमाणे होता.

त्याला आपल्या मनःस्थितीविषयी तर्ककुतर्क करायला सवड मिळूं नये म्हणून ती पटकन् म्हणाली, " नव्हतेच येणार मी ! पण म्हटलं तुम्हाला रागवायला तेवढंच निमित्त पुरें व्हायचं."

तिच्या तोंडून ते शब्द निघेपर्यंत तिला आंत घेऊन त्याने सहजगत्या म्हणून दार बंद करून टाकलें होतें.

तिच्याकडे आसक्तीच्या नजरेनें बघतच त्याने तिच्या गालावर एक टिचकी मारली आणि तो कोमल स्वरांत म्हणाला, " माझ्या रागालोभाची पर्वा आहे म्हणायची."

अधिक सलगी दाखवितांना त्यानें आपल्या गालाला स्पर्श केलेला पाहून तिच्या शरीरांतले सारें रक्त सळसळून डोक्याच्या बाजूला धांवूं लागलें. रागानें तिचें ओंठ थरथरूं लागले आणि भालप्रदेशावर घर्मबिंदु चमकूं लागले.

" सूर्यकांत ! " ती रागानें म्हणाली.

पण तितक्याच शांतपणानें त्याने तिला ओढून आपल्या बाहुपाशांत घट्ट पकडली व म्हटले, " लाज वाटली तुला ? कां कोणाची भीति वाटते ? "

त्याच्याया अतिक्रमणामुळें तर तिचा संताप अनावर होऊन तिनें त्याच्या मुस्कटींत थाडकन् एक प्रहार केला, आणि त्याच्या मिठीतून आपली सुटका करून घेऊन ती म्हणाली, " नीच ! पापी ! "

तरीहि पण सूर्यकांत पूर्वीइतकाच शांत होता. त्याने तिचें दोन्ही हात आपल्या हातांत धरले आणि तिला ओढीत तो म्हणाला, " कसलं पाप घेऊन बसली आहेस ? वेडी कुठली. "

" सूर्यकांत ! तुमचं डोकं ठिकाणावर नाही आज; मला भीति वाटते तुमची; जाऊं द्या ना मला. "

आपल्या संतापाचें परावर्तन इतक्या लवकर भीतींत होईल याची तिला कल्पना नव्हती. आपण भलतेच शब्द बोलून त्याला आपल्याशी सलगी करायलाच अधिक प्रवृत्त केले आहे हें ध्यानांत येतांच ती अधिक गांगरली. तिची असहाय्यता तिच्या मुद्रेवरून त्याला स्पष्टपणे प्रतीत होत होती.

" वेडे ! या वेळी घाबरतेस ? " तो तिचे दोन्ही हात तसेच आपल्या हातांत ठेवून म्हणाला.

तिच्या जोराने चाललेल्या उष्ण श्वासोच्छ्वासाबरोबरच नजरेची भीतीयुक्त चाळवा-चाळव चालली होती.

" सूर्यकांत. तुमची माझ्याविषयी काय समजूत आहे ? "

" त्याचा मी कुठे विचार केलाय् ? तूं माझी झाल्यावर बघतां येईल. "

अंगावर कोणी तरी तापलेल्या पाण्याचा वर्षाव करावा त्याप्रमाणें त्याचे ते शब्द ऐकतांच तिला भास झाला.

" तुम्ही हें भलतंच बोलण्याचं धाडस केलंत !" काय बोलावें हें न समजल्या-मुळें ती भीत म्हणाली.

" धाडस तुला वाटतंयू. मला नाही. "

" पण तुमचं माझं लग्न होणं शक्य नाहीं. "

" लग्नच कर असा माझा तरी कुठें आग्रह आहे ? "

" म्हणजे ? "

" समजलं नसेल तर स्पष्ट सांगतो ! जगांत किती तरी स्त्री–पुरुषांचे लग्नविरहित संबंध आहेतच की नाहीत. "

" मीं तुमच्या पाया पडतें; जाऊं द्या ना मला. "

" माझ्या इच्छेप्रमाणें झाल्याशिवाय जाऊं देणार नाहीं. "

" माझं तुझ्यावर प्रेम नसतांना ? "

" प्रेम आड येतं असं सांगितलं कोणी तुला ? "

त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर तिचा संताप तीव्रतेनें वाढूं लागला आणि सारें धैर्य एकवटून दार उघडण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली, " माझ्या देहावर तूं सत्ता गाजविणार ? काय अधिकार आहे तुला ? "

" दार उघडूं नकोस; आतां गेलीस तरी परत यावं लागेल तुला; तुझा मनोहरशीं असलेला संबंध माहित आहे मला. हिमत असेल तर चालती हो आतां आणि तुझ्या अब्रूचे धिंडवडे कसे निघतात तें पहा !"

त्याच्या त्या तीक्ष्ण उद्गारांचा प्रहार सहन न होऊन ती मटूकन खाली बसली.

" माझी बदनामी होऊं नये म्हणून तुम्ही इतकं जबर मोल घेणार ? "

" नांवावर जग चाललं आहे. "

" इतके निर्दय कां होता ? मीं मनानं दुसऱ्या पुरुषाला वरलं आहे. "

" तें माहित आहे मला; त्याचं नांव रजनीनाथ आहे हेंहि मीं जाणतों वाटल्यास नकार दे त्याला. "

" नकार ? "

पण ते उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडण्यापूर्वीच त्यानें तिला आणखी एकवेळ आपल्याजवळ ओढली होती. शीलावर होऊं घातलेला आघात तिला सहन न होऊन तिचे हृदय बधिर झालें.

*　　*　　*　　*

सूर्यकांताच्या घरांतून नंदिनी बाहेर पडली त्या वेळेस अब्रूच्या रक्षणाकरितां आपण शीलाचें मोल देऊन बाहेर पडत आहोंत या विचारानें ती विषण्ण झाली होती. घरी जायला सुद्धां तिची पावले उत्सुक नव्हतीं. पण आईने तरी विनाकारण काळजी करूं नये म्हणून आपल्याला घरीं पोंचलंच पाहिजे हे ती जाणून होती. हृदयाला आलेल्या बधीरतेमुळें सूर्यकांतानें हंसत मुखाने " मधून मधून येत जा हं. " म्हणून म्हटलेलें तिला पुरें ऐकूंसुद्धां आले नाही.

या पुढें रजनीनाथाशी विवाहबद्ध होणें इष्ट नाहीं तेव्हां त्याला स्पष्टपणे नकार द्यायचा आणि मग पुढल्या मार्गाचा विचार करायचा असा ती निश्चय करूं लागली.

पण तो निश्चय करतांना तिला असह्य यातना होऊं लागल्या.

त्यांतच घरी पोंचतांना आपण प्रसन्न दिसलें पाहिजे म्हणूनहि तिला आटोकाट प्रयत्न करावा लागत होता.

---

## —६—

नंदिनी सूर्यकांताकडून निघून घरीं पोंचली त्या वेळी तिची शिकवणीहून यायची वेळ टळून गेली होती. घरी गेल्याबरोबर आपल्याला पूर्ण एकांत मिळावा आणि मनसोक्त रडून हृदयावरील भार हलका करावा असें तिला वाटत होते. पण कॉलेजांत जाण्याचें टाळून आपण घरीं राहिलों तर त्याबद्दल आई आणि मामी प्रश्न विचारून आपल्याला भंडावून सोडतील म्हणून तिने ताबडतोब जेऊन कॉलेजांत जाण्याचा विचार केला. शक्य तो या वेळी कोणालाहि आपल्याला प्रश्न विचारण्याची संधि मिळूं नये अशी तिची इच्छा होती. आणि त्या बेतानेच ती एक एक कार्यक्रम उरकीत होती.

पण त्या बाबतींत नंदिनीची निराशा झाली.

ती जेवायला बसली तोंच त्या ठिकाणी यशोदाबाई आल्या आणि म्हणाल्या, " आज उशीरसा केलास यायला ? आतां त्यामुळें तुलाच घाई होईल. "

" तें खरं ग ! " नंदिनी कृत्रिम हंसून म्हणाली, " पण खरं सांगायचं म्हणजे मला वेळाचं भानच उरलं नाहीं आज. "

पण त्या बरोबरच इतक्या बिघडलेल्या मनःस्थितींत आपण सफाईनं खोटं तरी कसं बोलूं शकलों याचें तिला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाही.

मातृदेवतेला इतक्या तत्परतेने फसविल्याबद्दल तिला असह्य यातना झाल्या.

त्यामुळें ती आई व मामी यांचें अस्तित्त्व पार विसरली, आणि आपल्याच विचारांत गर्क झाली.

तिच्या डोळ्यापुढून त्या वेळीं किती तरी चित्रें विद्युत्‌गतीनें सरकून गेलीं.

रजनीनाथाला आपल्या शीलभ्रष्टतेचा सुगावा लागला असून तो क्रोधातिशयानें आपल्याकडे रोखून बघत आहे, मामा आणि आई पोरीनं आपल्याला काळीमा लावला म्हणून मुद्रा काळवंडून खाली पहात आहेत, कॉलेजांतील सहाध्यायी दांत विचकून आपल्याकडे बघत आहेत....

आईने आपल्याला पोटाशी कवटाळून धरावें म्हणून आपण असहाय्यतेनें तिच्याकडे पहात आहोत...

आपल्या अंगाला दरदरून घाम सुटला आहे...

पण मामींनी " आज कॉलेजांत जायचा विचार आहे कीं नाही ? जेवण किती सावकाशीनं चाललं आहे ?" असें चवथून विचारतांच तिची विचारशृंखला तुटली, आणि भानावर येतांच आपल्याला खरोखरच घाम सुटला आहे असें तिच्या प्रत्ययास आलें.

" काय म्हणालांत तुम्ही ? " असें गोंधळलेल्या मुद्रेने तिनें मामींकडे पाहून विचारले.

" इश्श ! विचारांत जगाला इतकं विसरायचं हा काय नादिष्टपणा ? " मामी हंसत हंसत पण कौतुकानें तिच्याकडे पाहून म्हणाल्या.

" नादिष्टपणा नाही तर काय ?" असें प्रेमभराने तिच्याकडे पाहून यशोदाबाईंनी उद्गार काढले.

" आतां पुरें झालं बाई जेवण ! " नंदिनी तशीच पानावरून उठून म्हणाली.

एकाएकी ती पानावरून उठल्याबद्दल यशोदाबाई आणि मामी तिच्याकडे पहात होत्या. तोंच हात धुवून पाटाला पाणी लावीत ती दोघींकडे पाहून म्हणाली, " ए आई, दुपारी मी येईपर्यंत तुम्ही तयार रहा हं; आजची पॅथेला लागलेली फिल्म मोठी छान आहे. आणि दुपारचा कार्यक्रम तर सोयीस्करच आहे. "

" बरं, बरं ! " यशोदाबाई तिच्या मागोमाग स्वैयंपाकघरांतून बाहेर येऊन म्हणाल्या, " तूंच लवकर ये म्हणजे झालं. "

" मी कशाला कुठे रेंगाळत बसते " असें म्हणून ती घराबाहेर पडण्याच्या तयारीत होती तोंच पोस्टमननें तिच्या नांवाचें पत्र आणून दिले.

" कुणाचं ग ? " असें यशोदाबाईनीं विचारतांच पत्रावर नजर टाकून " कुमुदचं अक्षर दिसतंय्. " एवढेंच ती कसेंबसें म्हणाली, आणि पाकीट तसेंच पुस्तकांत कोंबून लगबगीनें चालूं लागली.

कुमुदिनीने या पत्रांत आपली निर्भर्त्सनाच केली असणार असे वाटून तिला जगांतला आपला आणखी एक आधार नाहींसा होत आहे असें वाटलें, आणि त्या पत्रांत तिनें आपल्यावर घाणेरडा आरोप केला असावा अशा कल्पनेनें तिचें हृदय धडधडूं लागलें.

कुमुदिनीचें पत्र वाचायची तिला भीति वाटत असली तरी त्याविषयीं तिला कमी उत्सुकता वाटत होती असें मुळीच नाहीं. पत्रावरचा बडोद्याचा छाप पाहिल्यानंतर कुमुदिनी माहेरी गेली असावी हें चटकन् तिनें ओळखले आणि ती जाण्यापूर्वी आपण तिला किंवा तिने आपल्याला एकदां तरी भेटायला पाहिजे होते असे तिच्या मनांत आलें आणि आपली त्याप्रमाणे भेट झाली नाही याबद्दल तिच्या मनाला रुखरुखही लागून राहिली. आणि यापुढे निर्माण होणाऱ्या परिस्थितीने कदाचित् आपली भेट कायमची होणारही नाही हे जाणवल्यामुळेच तर ती फारच कष्टी झाली.

कॉलेजमधला पहिला इंग्रजीचा तास तिनें अत्यंत अस्वस्थ मनःस्थितीत घालविला आणि तासाची घंटा होऊन पंधरा मिनीटाची सुट्टी होतांच ती लगबगीनें लायब्ररीत गेली. तिची तास चालूं असतांना चाललेली चूळबूळ, आणि नंतर लायब्ररीत जाऊन. एकांत साधण्यासाठीं झालेली धडपड पाहून किती तरी मैत्रीणींनी तिची चेष्टा केली, आणि " आहे ब्बुवा " करणाऱ्या विद्यार्थीवर्गात " कांही विशेष आहे " म्हणून कोण खळबळ उडाली. पण नंदिनीला त्यावेळी आजूबाजूच्या परिस्थितीचें मुळींच भान नव्हतें.

लायब्ररींत एक मनाजोगा कोपरा दृष्टीस पडतांच ती तिथें जाऊन बसली आणि तिनें पत्र वाचायला सुरवात केली.

"...नंदिनी, मीं एकाएकीं इकडे निघून आलेली पाहून तुला आश्चर्य वाटलं असेल नाहीं ? पण मी अशी वेड्यासारखी काय लिहितें ? त्यादिवशी घडलेल्या

हकीकतीनंतर तूं आमच्याकडे गेलीच नसशील. स्त्रीचं हृदय स्त्रीच ओळखूं शकते. तुला वाटलं असेल, आमच्या चाळींतल्या चार चटोर बायकाप्रमाणें मी देखील तुझा संशय घेतला असेल. पण मी मनापासून तुला सांगतें की तसं कांहींच माझ्या मनांत आलं नाही. तुझ्याविषयीं संशय घ्यायचा मग मनोहर विषयीं तरी मी संशय कां घेऊं नये ? उलट पहिली पत्नी जिवंत असतांना दुसरीबरोबर पुरुष संसार थाटत आहेत आणि स्त्रियांना सवत साहत नाहीं ही कल्पना खोटी ठरून शिकलेल्या मुली सवतीवर आनंदानं जायाला तयार होत आहेत, अशी जगरहाटी पाहिली म्हणजे क्षणभर तरी मी तुम्हां दोघांविषयीं संशय घेतला असेल असंच कोणालाही वाटेल. खोटं कशाला बोलूं ? कांही क्षण माझंही मन चळलं. पण ताबडतोब स्पष्टपणे विचार करूं लागतांच माझं मलाच समजलं की या शंकेंत कांहींच तथ्य नाहीं.

मनोहरची तर परवांपर्यंत जबर खात्री होती की मी त्याच्याकडे संशयित नजरेनें बघत आहें. त्यामुळे तो माझ्याशी मोकळेपणाने मुळीच बोलत नव्हता. यालाही थोडीशी जबाबदार मी आहे. त्याला इत्थंभूत हकिकत विचारावी असं हजारदां माझ्या मनांत येऊन गेलं असेल; पण त्याला कांहीं विचारलं आणि त्यामुळे त्याच्या सरळ मनाला लागलं तर भलताच परिणाम व्हायचा असं वाटून मी किती तरीवेळा बोलणं टाळलं. परवां इथून निघण्यापूर्वी त्यानंच हा मुद्दा काढला तेव्हांच आमचं मोकळेपणानं बोलणं झालं.

"कुमुद खरं सांग हं. तुला माझा आणि नंदिनीचा कांही संशय येतो का ?" असं जेव्हां त्यान मला कळवळून विचारल तेव्हां मला किती भडभडून आलं म्हणून सांगूं ?

नंदिनी खरंच सांगतें. मनोहरच्या मनाला ती गोष्ट फार लागून राहिली आहे. ऑफीसांत कदाचित् बदनामी होईल असं वाटल्यामुळें त्यानं इथूनच नोकरीचा राजीनामा धाडून दिला आहे. त्याचं जेवण तर केव्हांच तुटलं आहे, आणि मन तर इतकं अस्वस्थ झालं आहे कीं त्याला वेड लागलंय् असाच कोणाचाही समज व्हावा. मला आतां त्याची भारी काळजी लागली आहे. त्यांतच तो हेक्यानं पुन्हां मुंबईला आला आहे.

तुझं दुःख तर त्याच्याहूनही मोठं आहे हें मीं जाणतें. पण तरीही तुझ्यावर एक कामगिरी सोंपवूं का ?

मी परत येईपर्यंत माझ्या मनोहरची प्राणापलीकडे काळजी घे.

तुझी परिस्थिति मीं जाणतें. त्या बाबतींत मीं तुला एवढंच आश्वासन देऊन ठेवतें की सारी दुनिया तुझ्यावर उलटली तरी मीं तुला अंतर देणार नाहीं.

आणखी एक विचारायचं राहिलं. तुझ्या कल्याणाच्या दृष्टीनं तूं त्या प्रसंगांत कशी सांपडलीस हे मला कळवशील का ?

मी तिकडे परत येऊन तुझी माझी भेट केव्हां होईल असं मला झालं आहे.

पत्राचं उत्तर जरूर पाठव हं..."

पत्र वाचून त्याची कड कड करीत घडी करतांना विद्युल्लतेच्या कडकडाटानें एखाद्यानें भयभीत व्हावें, पण भीतिऐवजीं किर्रर काळोखांत त्या प्रकाशामध्यें पुढील मार्गच क्षणभर दिसावा, तशीच नंदिनीच्या मनाची स्थिति झाली. मग ती कितीतरी वेळ त्या पत्राचा प्रत्येक शब्दन् शब्द आठवायचा प्रयत्न करीत खिडकीबाहेर पहात होती.

कांही वेळाने कुमुदिनीनें तरी आपला संशय घेतला नाहीं या आनंदांत तिनें सुटकेचा निश्वास सोडला आणि ती पुढल्या तासाकरितां वर्गांत जाऊन बसली.

* * * *

कुमुदिनीच्या पत्राने नंदिनीला किंचित् धीर आला असला तरी सूर्यकांतानें तिची बदनामी न करण्याच्या अटीवर तिच्या शीलावर चढविलेल्या हल्ल्याबद्दलच्या दुःखाची तीव्रता मुळींच कमी झाली नव्हती. त्याच्याविषयी तिच्या मनांत उत्पन्न झालेला तिरस्कार अमर्याद होता, पण यापुढे त्याला दुखवून मुळीच निभाव लागणार नाही हे मनांत आलें म्हणजे असहाय्य होऊन निसर्गानेच स्त्रीला पेचांत धरल्या-बद्दल तिला अधिक वाईट वाटे. कधीकाळी समाजाच्या नीतीच्या कल्पना बदलल्या तरी निसर्गाची शक्ति कायम असेंपर्यंत स्त्रियांची या जाचांतून सुटका होणार नाही हें त्रिकालाबाधित सत्य तिला पटत होतें.

वारंवार तिच्या मनांत या गोष्टी उभ्या राहिल्या म्हणजे तिच्या डोळ्यासमोर मूर्ति उभी राही ती रजनीनाथाची. अनिच्छेनें का होईना पण आपलें शील भ्रष्ट

झाल्यानंतर रजनीनाथाला आशेवर झुलत ठेवणें तिला श्रेयस्कर न वाटून तो केव्हांही भेटला तरी प्रथम त्याला आपला नकार कळवायचा असा ती निश्चय करीत होती. त्याच्या त्यागाची कल्पनाच तिच्या हृदयाला अगणित आंदोलनें देत होती; पण मग तिच्या मनांत येई की यापुढे जगांतिल प्रिय माणसांना दूरावण्याच्या एकाहून एक कठीण दुःखांना आपण आतां तयार राहिलंच पाहिजे.

आणि हा विचार मनांत आला म्हणजे ती स्वतःशीच म्हणे, ' एकदां तो प्रसंग येण्यापूर्वी त्याच्याशीं हंसून खेळून वागलं पाहिजे. '

कॉलेज मधून घरी जातांच ती सकाळी कबूल केल्याप्रमाणें आई आणि मामी यांना घेऊन पॅथे सिनेमांत आली.

सिनेमाच्या थिएटरमध्यें शिरल्यानंतर तरी आपल्याला पूर्ण स्वस्थता मिळेल, आणि मग आपण काळोखांत आपल्या भावनांना पूर्ण मोकळीक देऊन रडूं, या विचारानें आजूबाजूला कोणी ओळखीचे दिसत असल्यास त्याला टाळतां यावें म्हणून ती सभोंवार नजर टाकीत होती. तिने पाहिले तो किती तरी युरोपियन स्त्री पुरुष एकमेकांच्या हातांत हात घालून सिनेमाच्या आवारांत हिंडत होते, किती तरी श्रीमंतांच्या मोटारी आपल्या मालकांना त्या आवारांत सोडून फर्रकन् निघून जात होत्या, किती तरी तरुण पुरुष भिंतीला लावलेले सुस्वरूप नटींचे चेहरे न्याहाळीत होते, ते सगळेच आनंदी आहेत असें तिला वाटले. आणि कित्येकांच्या आनंदाची प्रतीकें म्हणूनच कीं काय त्यांच्या कपड्यावर शिंपडलेल्या सेंटचा सुगंध सगळीकडे दरवळत होता. त्या आवारांत फिरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा चेहरा न्याहाळून आपल्याप्रमाणें एखादी तरी दुःखी व्यक्ति या समूहांत आहे कीं काय हें ठरवितांना तिच्या मनाला निराळाच आनंद होत होता.

निरनिराळ्या व्यक्तींकडे कुतुहलानें पहात असतांनाच तिची नजर चित्रपटांतील कांहीं दृश्यें न्याहाळणाऱ्या एका व्यक्तीवर गेली आणि ती एकदम चमकली. योगा-योग असा कीं, त्या व्यक्तीचीही नजर सहजगत्या नंदिनीकडे वळली. दोघांच्याही मनांत त्यामुळें कसला तरी गोंधळ निर्माण झाला आणि आपण एकमेकांशीं बोलावें कीं काय या विचारानें त्यांना दृष्टि दुसरीकडे वळवावी लागली. त्याच वेळीं

यशोदाबाई आणि मामी यांची नजरही त्या व्यक्तीकडे गेली आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले, " तुमचा पत्ता काय मनोहर ? किती तरी दिवसांत आला नाहीत आमच्याकडे ? "

प्रसंगावधान न राहून मनोहर चटकन् म्हणाला, " नाहीं आलों झालं ! "

त्या एकाच उदासीनतेनें दिलेल्या उत्तरांत अलीकडे त्याची मनःस्थिति कशी विस्कळित झाली आहे हें नंदिनीच्या प्रत्ययास आलें, आणि त्यांतच जगांत आपल्या-बरोबर एक तरी समदुःखी आहे या कल्पनेनें तिला किंचित् समाधान वाटलें, पण या वेळेस आपण संभाषणाला कौशल्याने निराळें वळण दिले नाही तर आतांच होऊं नये ती गोष्ट उघड होईल असें वाटून, हंसवत नव्हते तरी हंसण्याचा बळेच प्रयत्न करून ती म्हणाली, " आई, आपल्याकडे यायला ते इकडे होतेच कुठें ? "

" म्हणजे ? आणि तूं बोलली नाहींस कुठे ? "

" मलाच मुळी आज समजलं; आज सकाळीच कुमुदचं पत्र नाही आलं ? त्यांत तिनं लिहीलं आहे की आपण बडोद्याला आलोंत आणि ही स्वारी नुक्तीच तिला पोंचवून आली. "

" अरे, वा ! माणसं अगदी गुपचूप कामं उरकतात हं. "

"म्हणून काय आपले पेढे थोडेच बुडणार आहेत ? पहिले पेढे माझे हं मनोहर." आणि असें म्हणून ती खूपच मोठ्याने हंसली.

" मग तुम्हीं जेवायची काय व्यवस्था केलीत ? "

" निश्चित कांहीच नाही ! " मनोहर कसेंबसें म्हणाला.

" बरं, बरं ! पण आतां तुम्हांला आजपासून आमच्याकडेच यायला पाहिजे. आतां निघतांनाच मुळी आमच्याबरोबर चला म्हणजे झालं."

" बघूं या ! " असें कांहीं तरी मनोहर म्हणाला, आणि त्यावर " मी तुम्हांला घरीं जाऊं देणार नाहीं." असें यशोदाबाई म्हणत असतांच सारी मंडळी आंत गेली.

आणि थिएटरांत काळोख होऊन सिनेमा सुरू होतांच मात्र आतां आपण रजनीनाथाला शक्य तों लवकर नकार दिला पाहिजे, त्याला आशेवर गुंतवून ठेवण्यांत अर्थ नाही, पुढें साऱ्या हकिकती बाहेर आल्या तर त्याच्या मनाला धक्का बसून वाईट परिणाम होईल, या विचारांनी ती ग्रस्त झाली. तिला या दुर्दैवी

घटनेचा संताप आला, पण रूळावरून घसरून कोलमंडून पडलेली गाडी परत मार्गावर येणे किती कठीण आहे हें तिला दृष्टिआड करतां येत नव्हतें.

आपल्याप्रमाणेंच मनोहरचेही चित्रपटाकडे लक्ष नाहीं असें थोड्याच वेळांत त्याच्या चुळबुळीवरून तिच्या प्रत्ययास आले, आणि मग ती त्याला म्हणाली, " बाहेर यायचंय् जरासं ? "

" हं ! "

" आई, आम्ही जरा बाहेर बसतों हं." असें म्हणून ती उठली.

बाहेर आल्यावर कांही वेळ दोघेंही गप्प बसली होतीं.

" तुला त्या दिवसापासून कांहींच त्रास होत नाही ? " आजूबाजूला कोणी नाहीं असे पाहून मनोहरनें प्रश्न केला.

त्याच्या त्या एका प्रश्नानेंच आतांपर्यंत प्रत्यक्ष आईपासूनही लपवून ठेवलेलें दुःख तिला त्याच्यापासून लपवितां आले नाही. तिचे डोळे पाण्यानें डबडबून आले. पण त्याबरोबर या निष्पाप पुरुषालाही केवढा मनस्ताप सहन करावा लागत आहे याची कल्पना येऊन धीराने ती म्हणाली, " त्रास सहन करायलाच पाहिजे आतां."

" मी केव्हांही तुझ्या पाठीशी आहे " असें कांहीसें तो म्हणाला खरा, पण आपले शब्द तोंडावाटे बाहेर पडले की नाही याची त्याला जबर शंका होती. " तुला एक प्रश्न विचारूं का ? "

" सारी हकिकत कशी घडली, हेंच कीं नाहीं ? "

" हं. "

" सांगेन तुम्हाला मी. "

दोघांचींही प्रश्नोत्तरें त्रोटक होत असली तरी प्रत्येक क्षणाला त्यांना एकमेकांबद्दल वाढती सहानुभूति वाटूं लागली होती.

आंत परत जाऊन बसल्यानंतर नंदिनीच्या मनाला सूर्यकांत आणि मनोहर यांची तुलना केल्यावांचून राहवलें नाहीं. अभावितपणें कां होईना पण आपण मनोहर-बरोबर एकांतांत सांपडलों तेव्हां मनोहरनं आपल्याला आदबीनं वागवलं आणि सूर्यकांतानें त्याचा उलट फायदा घेतला. एक आपल्या पाठीशीं असल्याची ग्वाही देत आहे, तर दुसरा आपल्या अब्रूवर वाटेल त्या वेळीं निखारे ठेवायला तयार

झाला आहे. एक आपल्याकरितां वाटेल तें दुःख सहन करायला तयार झाला आहे आणि दुसऱ्याला आपल्यावरील संकट पर्वणीप्रमाणें वाटत आहे....

सिनेमा संपल्यावर सारीं मनोहरसह घरीं आलीं त्या वेळीं दिनकरमामा आणि रजनीनाथ अघळपघळ गप्पा मारीत बसले होते.

त्या क्षणीं रजनीनाथाला मामांच्या जवळ बोलत बसलेला पाहून नंदिनी दचकल्यावांचून राहिली नाहीं. आतांपर्यंत आपण एकमेकांच्या अस्फुट प्रेमांत आनंदानें दिवस घालविले, आणि ज्या वेळीं त्यानें आपल्याला औपचारिकपणें मागणी घालायची त्यापूर्वीच आपल्याला त्याचा त्याग करावा लागणार ही कल्पना मनांत आल्यामुळें तिला न कळत तिच्या मुद्रेवर निराशेनें ठाणें दिलें. पण आपल्या शीलभ्रष्टतेची हकिकत त्याच्या कानावर जाऊन त्याला ऐनवेळीं जबर धक्का बसणार त्यापूर्वीच त्याला स्पष्ट नकार देणें हें आपलें कर्तव्यच ठरतें हे लक्षांत येतांच तिच्या मुद्रेवरचे भाव पालटायला वेळ लागला नाहीं.

मनोहर फार दिवसांत न भेटल्याबद्दल मामा त्याचा आपल्या विनोदप्रचुर भाषेंत समाचार घेत असतांनाच रजनीनाथ नंदिनीकडे पाहून म्हणाला, " स्त्रियांना पुरुषांच्या बेतांची किंमत वाटत नाहीं, हेंच खरं ! "

एरवी त्यानें डोळे मिचकावून काढलेल्या उद्गारांबद्दल आपण गंमतीचें उत्तर दिलें असतें, पण आज आपल्याला कांहीच उत्तर सुचत नाही हें नंदिनीला जाणवलें. तिनें बळेंच हंसण्याचा प्रयत्न केला.

" मी तुला फिरायला नेण्यासाठीं आलों होतों."

" मग जाऊं या ना आपण."

नंदिनीच्या त्या शब्दांत मुळींच जीव नव्हता. पण आज फार दिवसांनीं आपल्याला तिच्याबरोबर फिरायला जायला मिळत आहे या कल्पनेनें आनंदल्यामुळें रजनीनाथाला तिची विषण्णता जाणवली नाहीं.

" कुठें जायचं ? " निघतां निघतां त्यानें सहज प्रश्न केला.

" कुठेंही."

" तूं म्हणशील तिथें जाऊं आपण. "

" तुम्ही न्याल तिकडे यायला माझी तयारी आहे ! " असें कांहींशा विनोदानें आणि कांहींशा दुःखानें नंदिनी म्हणाली खरी, पण मागाहून तिलाच वाटलें कीं, आपण असं बोलायला नको होतं...

विनोद न साधल्यामुळें केवळ त्राग्यानेंच काढलेल्या त्या उद्गारांनीं रजनीनाथाचा गैरसमज तर होणार नाही ना...

आतां त्याला आपला स्पष्ट नकार कळवून जन्माचं दुखवायचं आहे; मग थोड्या वेळासाठी त्याला आनंदित करणं आपलं कर्तव्यच नाहीं का...

रजनीनाथाला मात्र तिच्या मनांतील गोंधळाची मुळींच कल्पना आली नाहीं. उलट तो हंसून म्हणाला, " आजच्या स्त्रीनं तरी असं बोलतां उपयोगी नाहीं. पुरुषांच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याचं कबूल करण्यांत विसाव्या शतकांतील स्त्रीचं परावलंबित्वच प्रगट होतं."

पण नंदिनीला यावर कांहींच उत्तर सुचलें नाहीं. तिने आवंढा गिळून हलकेच त्याच्याकडे पहाण्याचा प्रयत्न केला आणि एक दीर्घ श्वास सोडला.

" अच्छा; अँटाप हिललाच जाऊं आपण ! " असें कांही वेळाने रजनीनाथ म्हणाला, आणि दोघांचीं पावलें झपाझप उचलूं लागली.

त्या बारीकशा टेकडीवर चढतांना नंदिनीच्या मनांत किती तरी विचार विद्युत्-गतीनें येऊन गेले. आणि त्यामुळे आपण फार वेळ सारखे चढतच आहोत असें तिला वाटल्यावांचून राहिलें नाही.

ती टेकडी म्हणजे रजनीनाथाचे एक आवडतें ठिकाण असल्यामुळे तो आजू-बाजूची शोभा पहाण्यांत गर्क झाला. मागच्या बाजूला रावळीची टेकडी आणि त्या ठिकाणीं दूर राहणाऱ्या तपस्व्याप्रमाणें तळ देऊन राहिलेली झाडी, टेकडीच्या पायथ्याशी दिसणारी जुनाट मशीद, आणि सभोंवताली पुरलेल्या प्रेतांचीं थडगीं, पश्चिमेच्या बाजूला खाली दिसणारी मिठागरे, त्या पलीकडे पोर्टट्रस्टची माती नेणारी गाडी, आणि दूरवर क्षितिजावरून साऱ्या जगाचा विसाव्यासाठीं निरोप घेण्यास उत्सुक असलेलें सूर्यबिंब, टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या मारुतीच्या देवळांत होणारा घंटानाद, जवळच ऐकूं येणारें बकरीचें ओरडणें, पूर्वेच्या बाजूने एक मोटार नुक्तीच गेल्यामुळें उडालेला धुरळा, या सगळ्यांत कसला तरी चैतन्यदायक संदेश प्रतीत

होत आहे अशी कल्पना रजनीनाथाच्या डोक्यांत घोळत होती, तर हा साराच देखावा आपल्या नकाराकरितां साजरा झाला आहे असें नंदिनीला वाटत होतें.

तांबूस सूर्यकिरणांचें मनसोक्त अवलोकन करीत असतांनाच रजनीनाथानें नंदिनीचा हात प्रेमभराने धरला आणि तो तिच्याकडे हंसत पाहूं लागला.

पण नंदिनीच्या नेत्रांतून अश्रु ओघळत आहेत असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें.

तिनें आपला हात सोडवायचा मुळीच प्रयत्न केला नाही. पण रजनीनाथाला त्या स्पर्शांत तारुण्यसुलभ उन्माद मात्र मुळीच भासला नाही.

न कळत त्याच्या हृदयांत एक दुःखदायक शंका डोकावली.

" नंदिनी ! " तो सद्गदीत कंठानें म्हणाला.

नंदिनी कांहीं बोलली नाहीं.

" तुला त्रास होतो का माझ्यापासून ? "

वाऱ्यानें भुरभुरणाऱ्या केंसावरून हात फिरवीत तिनें मानेनेच नकार दर्शविला.

" मग ? "

त्याला काय उत्तर द्यावें हें तिला सुचेना. या वेळेलाच नकार देऊन मोकळी हो असें तिचें मन तिला सांगत होतें, पण त्या बरोबरच बोलण्याच्या नुसत्या कल्पनेनें तिचें हृदय धडधडत होते.

कांहीं वेळ तसाच जाऊं दिल्यावर तिनें बोलण्याचा निश्चय करून आपला हात हलकेंच त्याच्या हातांतून काढून घेतला, नाक साफ केलें, आणि खालच्या मानेनें तिनें तोंड उघडण्याचा प्रयत्न केला.

" रजनीनाथ !" ती कसेंबसें म्हणाली.

" काय ? "

" तुमचं माझ्यावर खरंच प्रेम आहे ? "

" तुला संशय वाटतो ? "

" नाहीं. "

" मग ? "

तिनें पुन्हां एकदां स्पष्ट बोलण्याचा निश्चय केला आणि मग ती म्हणाली, " माझा नाद सोडाल का ? "

" म्हणजे ? "

" या जन्मी आपण एकमेकांवर प्रेम करणं इष्ट नाही. "

" माझ्यापासून तुला दुःख होईल असं वाटतं का ? "

" माझ्यापासून तुम्हांला सुख मिळणार नाही. "

तिच्या प्रत्येक शब्दाबरोबर त्याला आतांपर्यंत उभारलेले मनोरे धडाधड खालीं कोसळल्याचा भास होत होता. " मला तुझ्या सहवासांत आनंदच वाटेल " असें म्हणण्याचें त्याच्या ओठावर आले होते, पण तिच्या उद्गारांनीं झालेल्या निराशेमुळें त्याच्या तोंडांतून शब्द निघाले नाहीत.

दोघेंही व्यथित हृदयानें परत निघाली.

## —७—

एखाद्या माणसावर आपलें अमर्याद प्रेम असावें आणि केवळ त्याच्या सुखा करितां आपण त्याचा त्याग करायचा निश्चय करावा. कांहीं वेळपर्यंत त्या निश्चयानें मनाला आणलेल्या गुंगीमुळें त्यागाच्या वेळीं माणूस शून्य हृदयानेंच वर्तन करतो. पण ती व्यक्ति आणि तो क्षण निघून जाऊन निश्चयाची गुंगी उतरूं लागली म्हणजे मग मात्र हृदयांत खळबळ उडून ज्या यातना अनुभवायला लागतात त्या असह्य असतात. मनाच्या या विशिष्ट स्थितीला उपमाच द्यायची झाली तर ती ऑपरेशननंतर क्लोरोफॉर्मच्या गुंगींतून सावध झाल्यावर रोग्याला होणाऱ्या यातनांची देतां येईल. रजनीनाथाला नकार देऊन घरी परत आल्यानंतर नंदिनीलाही याच प्रकारच्या यातना भोगाव्या लागल्या.

त्या दिवशी तिला तिच्या घराजवळ सोडतांना रजनीनाथालाही त्या यातनांचा अनुभव येऊं लागला होता. नंदिनीच्या नकाराच्या वेळीं अनपेक्षितपणे होणाऱ्या आघातानें निर्माण झालेल्या बधिरपणामुळें त्याला त्या दुःखाची तीव्रता जाणवली नाहीं. पण तिला तिच्या दाराशीं सोडतांना ही आपली शेवटची भेट ठरत आहे या कल्पनेनें त्याचें हृदय जड झालें. त्यामुळें ' तूं कुठेंही असलीस तरी सुखी रहा,' ही इच्छा व्यक्त करण्याचें त्याला स्मरण राहिलें नाहीं, आणि घरीं येतांच त्याला ही जाणीव झाली त्यावेळीं आतां तिला परत भेटून दुखवावें असें त्याला वाटलें नाहीं.

तिचं आपल्यावर प्रेमच नव्हतं कीं काय ?...

तिनं त्याशिवाय नकार दिलाच नसता...

पण छे...

आपण भलतांच संशय घेतला त्या देवतेविषयीं...

नकार देतांना किती यातना झाल्या तिच्या अंतःकरणाला...

या प्रकारें दोघांच्या अनुरक्तिविषयीं कांहीं तरी प्रश्न निर्माण करून त्यांचीं स्वतांच उत्तरे देण्याचा त्याच्या मनाला चाळाच लागला.

आपल्या प्रीतीतल्या माणसांचा आपल्याला सहवास घडूं नये असा त्रिकालाबाधित संकेतच ठरून गेला आहे की काय कुणास ठाऊक ?

पण त्या विवक्षित मनःस्थितींत नंदिनीविषयी विचार करतांना तो याच कोड्या पर्यंत येऊन अडखळूं लागला.

नंदिनीने आपल्यावरील प्रेम केव्हांच उघड बोलून दाखविलें नव्हते हें त्यालाहि पटत होतें.

पण प्रेमाची माधुरीसुद्धां अर्धस्फुटतेंतच नाही का ?...

पूर्वींचे एक दोन प्रसंग तर त्याला या वेळीं स्पष्ट आठवत होते.

त्या दिवशी कांहीं कारणामुळें तो फारच अस्वस्थ झाला होता. कुठेंही जाण्याची त्याच्या मनाची तयारी नव्हती. ज्या जगांत जिकडे तिकडे दुष्टावा, निष्कारण शत्रुत्व आणि स्वार्थपरायणतेमुळें जन्माला आलेली दुसऱ्याविषयी तिरस्कार बुद्धि वावरत आहेत त्या जगापासून दोन पावलं दूरच रहावं या विचारानें त्यानें खरोखरीच एकलकोंडेपणाने दिवस घालवायचा निश्चय केला होता. पण त्याच्या त्या निश्चयाचा पत्ता लागूनच कीं काय जगांत निरपेक्ष प्रेम करणारे मित्रही आहेत हें जणूं त्याला पटवून देण्यासाठीच दिनकरमामा त्याच्याकडे आले होते, आणि नंदिनी त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे असें सांगून त्याला घरी घेऊन गेले होते.

विस्कळित मनःस्थितीमुळें तो नेहमीप्रमाणे बोलत नव्हता...

नंदिनीनें चतुरपणानें त्याची मनःस्थिति हेरली आणि मग तो परत जाण्याला निघाला त्या वेळीं ती एकटीच त्याला दारापर्यंत पोचवायला येऊन म्हणाली होती "आज तुम्हाला बरं वाटत नाही ?"

" कशावरून ? " त्यानें त्या वेळेस चपापून विचारलें होतें.

" आज तुम्ही दररोजच्यासारखें मोकळे बोलला नाहीत."

तिच्या त्या प्रेमळ शब्दांनीं त्या वेळेंस त्याचे हृदय भरून आलें होतें, आणि दुःखाचा तात्पुरता विसर पडून तो घरी गेल्यानंतर तिचे तेच शब्द पुनः पुन्हां आठवून पुनःप्रत्ययाचा आनंद घेत होता.

दुसऱ्या एका वेळीं तो आणि नंदिनी एकमेकांची थट्टा करीत होतीं. बोलतां बोलतां नंदिनी त्याला टोंचण्यासारखे कांहीं तरी बोलून गेली. मागाहून ती गोष्ट त्याच्या लक्षांतही राहिली नव्हती; पण दुसऱ्या दिवशी तो तिला भेटायला गेला तेव्हां आजूबाजूला कोणी नाहीसें पाहून ती त्याला म्हणाली होती, " मला क्षमा मागायची आहे तुमची."

" कशाबद्दल ? "

" काल मी तुम्हाला लागेलसं बोलून गेलें त्या बद्दल; तुम्हांला दुखवायचा माझा मुळींच उद्देश नव्हता हो."

" पण मला दुःख झालं असं तूं कशावरून म्हणतेस ? "

" माझ्या समजुतीखातर तुम्ही लाख नाहीं म्हणाल. पण मला कळतं ना मी तुम्हाला काय म्हणालें तें !"

" वेडी आहेस झालं ! कालची वेळ काल नाही का निघून गेली ? आतां काय त्याचं ? "

" मला वाईट वाटतं त्याबद्दल. तुम्ही क्षमा केली असं म्हणाल्याशिवाय मला चैनच पडायच नाहीं. "

त्या दुसऱ्या प्रसंगाच्या स्मृतीमुळें तर रजनीनाथाला फारच गहिवरून आलें. थट्टेंतसुद्धां आपल्याला दुखविल्याबद्दल जिला वाईट वाटलें तीच नंदिनी आपल्याला स्पष्ट नकार द्यायला तयार झालेली पाहून त्याला आश्चर्य तर वाटलेंच पण त्या बरोबर तो नकार देतांना तिलाही असह्य यातना झाल्या असतील असें त्याला वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

माझ्यापासून तुम्हांला सुख होणार नाहीं असंच तिनं आपल्याला सांगितलं होतं...

याच्या मुळाशीं कांहीं जबरदस्त कारणं तर नसतील?...

आपण तिला विचारायला पाहिजे होतं...

चुकलंच आपलं तें...

तिच्या इच्छेविरुद्ध आपण तिच्याशी विवाहबद्ध होत नाहीं हें खास...पण तिचं दुःख समजून घेऊन करतां आल्यास त्याचं योग्य निवारण करणं हें आपलं कर्तव्य नाही का?...

आणि हा शेवटचा विचार डोक्यांत येतांच कर्तव्याला चुकल्याबद्दल त्यानें स्वतःचाच धिक्कार केला.

पण आतां मागाहून तिला भेटल्यास आपण आपलं अस्तित्व तिच्यावर बळेच लादत आहोंत असे होईल आणि त्यामुळें तिचे दुःख अधिकच वाढीस लागेल, हा विचार डोक्यांत येतांच त्याला तो बेत रहित करावा लागला.

आणि गंमत अशी कीं तिच्या इच्छेविरुद्ध तिला भेटायचं नाहीं असा स्वतःशीच विचार करून तो मोकळा होतो न होतो तोच त्याच्या त्या निश्चयापासून त्याला परावृत्त करणारा एक प्रसंग त्याच वेळी उद्भवला आणि कांही वेळ तरी तिच्या दर्शनसुखाचा लाभ घेण्याकरतां आपण आलेल्या संधीचा उपयोग करून घ्यावा अशी जबरदस्त लालसा त्याच्या मनांत निर्माण झाल्यावांचून राहिली नाही.

यापुढें हे दुर्दैवी एकाकी जीवन कसें व्यतीत करावे याचा तो स्वतःशीच विचार करीत असतांना दिनकरमामा आणि मनोहर त्या ठिकाणी आले, आणि त्याला फिरायला येण्याचा आग्रह करूं लागले.

"मी खरं सांगू का दिनकरमामा तुम्हाला?" तो काकुळतीला येऊन म्हणाला.

"आतांपर्यंत तुमचा नकार खोटाच होता की काय?" दिनकरमामा सातमजली हंसून म्हणाले, "मला वाटलं होतं की बायकानांच आढेवेढे घेण्याचा चाळा असेल."

"तसं नाही हो." मनोहरलाही थोडीशी गंमत करावीशी वाटून तो म्हणाला, "कंपनीत यांना इतरांना अभिनय शिकवावा लागतो ना? आज असाच एखादा अभिनय शिकवावयाचा असेल म्हणून तो आतां यांनीं आपल्याला करून दाखवला."

"मला आज फिरायला जाण्याचाच कंटाळा आलाय् मुळीं." रजनीनाथ अंगाला आळोखेपिळोखे देत म्हणाला.

" आतां मात्र तुम्ही चांगलेच चकलांत बरं कां." दिनकरमामा म्हणाले.

यावर कांहीच न बोलतां आपल्याला त्यांच्या बोलण्याचा अर्थच कळला नाहीं असे दर्शवीत रजनीनाथ त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागला.

दिनकरमामांनीं त्याच्याकडून उत्तराची मुळींच अपेक्षा केली नव्हती. तेच पुढें म्हणाले, " फिरायला जाण्याचा कंटाळा आला आहे असं म्हणतां ? यावरून तुम्ही आपलं तारुण्य नाकबूल करीत असावेत, कां आमच्याबरोबर यायचं नाहीं म्हणून खोटं बोलतां ?"

" तुम्ही वकिलीची परीक्षा दिली असती तर नांव कमावलं असतं मामा." रजनीनाथ बळेंच हंसून म्हणाला, " उगीच कारकुनीत दिवस घालवतां."

" वकिलीची तयारी मला पेन्शन घेईपर्यंत करतां येईल. पण तोंवर तुमची फिरायला जाण्याची तयारी होऊं शकेल की नाहीं याची शंकाच आहे मला."

" मामा माफ करानां."

" छे, छे. मी तुम्हाला बाहेर काढण्याकरितांच आलों तों तसाच जाऊं कीं काय ? "

" वा ! हा आग्रह चांगला तुमचा. पण मी आलों नाही तर काय कराल ? "

" दुसरं काय करणार ? आतां तुम्हांला उचलून तर नेईनच मी, पण फिरणं झाल्यावर घरीं घेऊन जाऊन जेवायला घालीन."

मामांच्या या आग्रहांत त्यांचा नेहमीचा गाढ स्नेहच प्रतीत झाल्याचे पाहून रजनीनाथाचे हृदय आनंदानें पुलकित झालें. पण त्या बरोबरच आपण जाण्यानें नंदिनीच्या भावना दुखविण्याचा कसा संभव आहे हें लक्षांत आल्यामुळे तो तितकाच व्याकुळही झाला.

नंदिनीला भेटण्याची त्याला उत्सुकता नव्हती असे नाही. पण तिनें विवाहाच्या बाबतींत नकार दिल्यानंतर आपण तिची भेट घेतल्यास तिला दुःख होईल असें त्याला वाटलें.

कां जावंच ?...

हलकेंच त्याच्या हृदयांत प्रश्न डोकावला.

नाहीं तरी आपल्याला शेवटची सदिच्छा व्यक्त करायचीच आहे...आणि तिनं आपल्याला भेटायला कुठें बंदी केली आहे ?...

तिच्या नकाराच्या दुःखापेक्षां तिच्या दर्शनसुखाचीच त्याला अधिक ओढ लागल्यानें त्यानें मामांच्याबरोबर निघण्याचे ठरविले आणि तो म्हणाला, " इतकी छानशी शिक्षा देणार असलां तर आपण यायला तयार आहोंत."

" अस असं होय ? मग चलाच तर. आपण घरींच जाऊन गप्पा मारूं आतां; रात्री जेवा आणि मग सावकाश स्टुडिओंत जा."

" अच्छा. " रजनीनाथ कपडे घालीत म्हणाला.

फिरायला जाण्याचा बेत रहित झाल्यामुळें नंदिनीची भेट ताबडतोब होणार या आनंदांत तो मामांच्याबरोबर बाहेर पडला.

पण अपेक्षेप्रमाणे नंदिनीची भेट न झाल्यामुळे रजनीनाथावर निराशच होण्याची पाळी आली.

कारण जिन्याच्या पायऱ्या चढतांना मामा त्याला म्हणाले, " आज तुम्हांला तुमच्या आवडत्या हातांचा पाहुणचार घडणार नाही. कशी गंमत केली तुमची ? "

" म्हणजे ? "

" अहो नंदिनी गेली आहे आज सकाळीच तिच्या मावशीकडे."

रजनीनाथ निराशेनें दिनकरमामांच्या तोंडाकडे पाहूं लागला.

" सकाळीच ती आली आणि घेऊन गेली तिला आपल्याबरोबर...दोन तीन दिवसांपासून तिची प्रकृतीही नाहा बरोबर... "

निराशेमुळें रजनीनाथ पुढील हकिकत ऐकण्याच्या मनःस्थितींत नव्हता.

एकदां नकार दिल्यानंतर पुन्हां आपण तिची भेट घेण्याचा प्रयत्न करूं या कल्पनेनें ती गेली नसेलना अशी शंका त्याला आल्यावांचून राहिली नाहीं.

पण नंदिनीचा नकार ऐकल्यानंतर ज्याप्रमाणे रजनीनाथाला तिला शेवटचीच म्हणून भेटून तिच्या भवितव्याबद्दल सदिच्छा प्रगट करण्याची इच्छा होती, त्याप्रमाणेंच निश्चयाने त्याला नकार दिला असला तरी पुन्हां एकदां त्याला भेटून त्यानें आपल्याविषयीं कोणत्याही प्रकारचा गैरसमज करून घेऊं नये असें सांगण्यास नंदिनीही तितकीच उत्सुक होती.

आपण अपकिर्ती टाळण्यासाठीच शीलाचें मोल दिल्यानंतर रजनीनाथाला विवाहाच्या गोत्यांत आणूं नये असें तिचे प्रामाणिक मन तिला सांगत होते, आणि त्यासाठीच तिनें वर्षानुवर्ष जोपासलेल्या आपल्या इच्छेला कायमची तिलांजली दिली होती.

पण ज्या धैर्यानें तिने रजनीनाथाला नकार दिला होता तें तिला नंतर सोडून गेले, आणि मग यापुढें त्याच्यावांचून हें जीवीत घालवायचें तरी कसे या विचाराने ती अस्वस्थ झाली. रात्री एकांत मिळतांच ती मनसोक्त रडली. यापुढील निष्प्रेम आयुष्य कसेबसें घालविण्यापेक्षां जीवीताचा शेवट केलेला काय वाईट असाही भीषण विचार तिच्या मनांत येऊन गेला, आणि मग ती असहाय्यतेने बिछान्यावर तळमळत पडली.

मामांना रजनीनाथाच्या मनःस्थितीविषयी मुळींच कल्पना नसल्याने त्यांनी मग त्याची भरपूर थट्टा केली. ते म्हणाले, " काय आजचीं तरुण माणसं तरी ! त्यांच्या आवडत्या पोरी बाळी जरा नजरेसमोरून बाजूला सरल्या कीं त्यांचे जीव ताबडतोब कासावीस व्हायला लागतात. आजच्या तरुणपिढीच्या पुढें केवढी जबाबदारीची कामं पडली आहेत. पण तीं आपलं कर्तव्य न ओळखतां उगीचच हवालदिल होऊन बसतात."

मामांचा त्यावेळचा अभिनय पाहून रजनीनाथालाही हंसल्यावांचून राहवले नाही. दुसरी एखादी वेळ असती तर आपण त्यांना म्हणालो असतो की, " मामा तुम्हांला आमच्या कंपनीत ठेवून घ्यायला मालकांना शिफारस केली पाहिजे; तरुण मंडळीची सुखदुःखं समजून घ्यायची आतां तुमची पात्रता नसली तरी तुम्ही सिनेमांत काम करण्याला अगदी लायक आहांत."...पण मामांच्या अवखळ विनोदानें त्याच्या हृदयाला गुदगुल्या होण्याऐवजी त्याची विषण्णताच वाढूं लागली.

जेवण कसेबसें उरकून तो कंपनींत गेला.

नेहमींप्रमाणें तो आपल्या कामाला सुरवात करणार तोंच कंपनीचे मालक त्याच्याकडे आले आणि म्हणाले, " मला आज तुमचं अभिनंदन केलं पाहिजे. अर्थात् त्यांत तुम्हांला सोडण्याचा प्रश्न असल्यामुळे मला वाईट वाटत आहे. पण तुमच्या उत्कर्षाच्या आड मीं येऊं इच्छित नाही."

आपल्याला बोलायला अवसर न देतां एकसारखें बोलत राहायची मालकांची खोड त्याला माहित होती. त्याबद्दल त्याने किती तरी वेळा त्यांची चेष्टाही केली होती, आणि त्यामुळें अधिकच खूष होऊन, “ करा बाबा आमची चेष्टा ! पण आमचा स्वभावच तसा आहे याला काय करणार ? ” असे मालकही त्यावर म्हणाले होते. त्याप्रमाणेंच नेहमींप्रमाणें मालकांची मेलगाडी सुटलेली पाहून त्याला थोडेसे हंसूही आलें. पण अगोदरच झालेल्या निराशेमुळे आपण ‘ चटकन् सगळं सांगून टाकायला काय घ्याल ’ असे त्यांना उपरोधिकपणे विचारून मोकळे व्हावें असे त्याच्या मनांत येऊन गेले. पण त्यांच्या पाल्हाळिक बोलण्याचा आपल्याला आतां कंटाळा आला आहे असे कपाळावरील एका आठीने दर्शवून तो त्यांच्याकडे पाहूं लागला.

“ हे माझ्यावरोबर गृहस्थ आले आहेत ना ? ” मालक आपल्या बरोबरच्या गृहस्थाकडे बोट दाखवून म्हणाले, ‘‘ हे तुम्हांला कलकत्त्याला न्यायला आले आहेत. पगार तर आमच्याकडच्यापेक्षां चांगला मिळेलच पण चांगल्या चांगल्या डायरेक्टरांचा सहवास घडेल. ”

ती बातमी ऐकतांच रजनीनाथाला आनंद झाला नाही असे नाहीं. पण त्यांत त्याचा नेहमीचा उल्हास नव्हता. आपल्या आयुष्यांतील अनेक महत्वाकांक्षांपैकी एक तरी फलद्रूप होण्याचा प्रसंग आला असतांना, जिच्या सहवासांत आपण त्या यशाचा आनंद उपभोगणार होतो ती नंदिनी यापुढे आपली होणें शक्य नाही ही कल्पना त्याला या वेळी इतक्या तीव्रतेनें दुःख देऊं लागली कीं त्याला कशाला आपण हा हव्यास धरला आहे असे वाटल्यावांचून राहिले नाही.

त्यानें एक दीर्घ सुस्कारा सोडला आणि, “ आभारी आहे मी आपला.” एवढेंच कायसेसें पुटपुटला.

“ पण मी तुम्हांला कायमचा तिकडे राहूं देणार नाही बरं का.” मालक म्हणाले, “ तुम्ही कलकत्त्याहून आलांत कीं मग पुढें मागें हॉलीवुडला जायचा बेत आहे माझा. केव्हां जमेल तेव्हां खरं. पण जायचं आपण दोघांनी हं ! ”

“ पाहूं या काय होईल तें !” कांहीं तरी बोललेंच पाहिजे या जाणीवेनें रजनीनाथ म्हणाला.

त्याच्या बोलण्यांत नेहमीचा उत्साह न दिसल्यामुळें मालकांना आश्चर्य वाटल्यावांचून राहिले नाही. पण त्याची प्रकृति बरी नसावी किंवा त्याचें चित्त चित्राच्या कामानें व्यग्र झालें असावें असे वाटून तेच पुढें म्हणाले, “ आपलं शूटींग दोनच दिवसांचं आहे नाही ? ते संपवून तुम्ही येत्या शनिवारीं चालूं लागा यांच्याबरोबर.”

रात्रीं स्टुडिओमधील काम संपवून घरीं निघतांना मात्र त्याला चालून आलेल्या संधिबद्दल दुःखपूर्ण आनंदच वाटला. कोणत्याही कारणानें नंदिनीला आपल्या सुखदुःखाची भागीदारीण होतां येत नाही तर या ठिकाणीं राहून तिच्यावर आपलें अस्तित्व लादण्यापेक्षां, तिला किंवा दिनकर मामांनाही न कळवितां कलकत्त्यासारख्या दूरच्या प्रांतांत गेलेलं काय वाईट ? आणि हा विचार मनांत येतांच कोणीहि आपली चवकशी करायला आलं तर आपला पत्ता त्याला कळवूं नये अशी त्यानें मालकांना गळ घातली.

जाण्यापूर्वीं नंदिनीला एकदां तरी भेटून आपली सदिच्छा व्यक्त करावी असें त्याच्या अनेक वेळां मनांत येऊन गेलें. पण कांही वेळां आपण आतां तिच्या आयुष्यांत तिला नकळत सोडण्यांतच तिला सुख होईल असे वाटून, तर कांहीं वेळां तिला भेटण्याची इच्छा अनिवार होऊनही कामाच्या अतिव्याप्तिमुळे त्याला जातां आले नाही.

आणि मग शनिवारी संध्याकाळी सहाच्या कलकत्ता मेलने मुंबई शहर सोडतांना त्याला जें दुःख झाले ते अनिवारच.

आयुष्यांतील यापुढील भागांत मुंबई शहरांत न येणेच बरें हे त्यानें स्वतांशींच ठरवून ठेवले असल्यानें आपण हृदय मोकळे करून नंदिनीचा निरोप घेतला नाहीं, ही दुःखपूर्ण जाणीव त्याला प्रयत्न करूनही विसरतां येईना.

---

## —८—

दिनकरमामांच्या प्रेमळ सहवासांत मनोहरचा काळ मोठ्या आनंदांत चालला होता. कुमुदिनीच्या प्रेमळ आणि स्नेहपूर्ण पत्रांनी ती आपल्याविषयी मुळींच संशय घेत नाही हे कळल्यामुळे त्याच्या हृदयावरील दडपण कमी झाले होतें, आणि नंदिनीही आपल्या दुःखाची त्याला जाणीव न देतां त्याच्याशी अत्यंत आपुलकीच्या भावनेने वागत होती. ज्या काळांत आपला सगळ्यांकडून धिक्कार होईल असे त्याला वाटत होतें त्याच काळांत त्याला सहानुभूतीचा ओलावा लाभत होता. त्यामुळें आपोआपच त्याची वृत्ति निर्भय होत चालली, आणि मग त्यालाच प्रश्न पडला की केवळ ऑफिसांत सूर्यकांताकडून आपली नाचक्की होईल या काल्पनीक भयाने आपण राजीनामा देण्यांत खरोखरच चूक केली, की अब्रूसाठी नोकरीची जबरदस्त किमत देणे जरूर होते ?...

आपली स्थिति नोकरीवांचून पोट भरण्यासारखी असती तर आपण दुसरे उत्तर ताबडतोब देऊन मोकळें झालो असतो, हे त्या वेळीं तर त्याचे त्यालाच पटल्यावांचून राहिलें नाही. त्यांतच त्याच्या समजुतीप्रमाणे तरी जगांत निर्भयपणे वावरणाऱ्या नंदिनीचें उदाहरण त्याच्या समोर होते. ती स्त्री असूनही जगांत धैर्यानें वागूं शकते तर आपल्यालाच एवढे भिऊन वागण्याचें काय कारण होते ?...

निरनिराळ्या प्रकारें स्वतःची समजूत घालून आपण नोकरी सोडण्यांत खरोखरच चूक केली असें उत्तर तो काढूं पहात होता. आज आपण एकटे वाटेल त्या प्रका-

रानें दिवस काढूं शकूं, पण उद्यां कुमुदिनी प्रसूतीनंतर परत येईल तेव्हां तिच्या बरोबर येणाऱ्या चिमण्या जिवासह आपण नोकरीवांचून चरितार्थ कसा चालविणार हे त्याला सुचेना.

लाडक्या कुमुदिनीला आणि चिमण्या बाळाला माणसासारखं जगूं द्यायचं असेल तर आपण आतांपासूनच नोकरीच्या शोधांत असायला पाहिजे हे त्याला पटूं लागलें.

पण सगळीकडे बेकारीचा वणवा भडकलेला असतांना आपल्याला नोकरी कोण देणार हे त्याला समजेना. पूर्वी नोकरी धरतांना त्याला त्रास पडला नसल्यानें आज आपण खटपट कोणत्या मार्गाने करावी या प्रश्नाचे उत्तर देण्यास तो असमर्थ ठरला.

बडोद्याहून आल्यापासून त्याने या प्रश्नाचा विचारच केलेला नसल्यानें, पुढील जबाबदारींची जाणीव होतांच त्याने गांगरून जावे यांत नवल नाही.

मग तो किती तरी वेळ नोकरीचा प्रयत्न कसा करावा याचा विचार करीत बसला होता.

आपण या प्रकारे विचार करीत किती वेळ बसलों आहोत याचे त्याला भानही नव्हते. पण त्याच वेळी तारेचा शिपाई त्याच्या नांवाचा पुकारा करीत आला, आणि मग मात्र तो दचकून त्याच्याकडे पाहूं लागला.

आपल्याला तार कोणाची येणार या विषयी तो विचार करू लागतो न लागतो तोंच या पाकिटांत कुमुदिनीविषयीं तर कांही बातमी नसेल ना, या शंकेने तो व्याकुळ झाला.

त्याने तारेचे पाकीट फोडले आणि कुमुदिनी प्रसूत होऊन पुत्ररत्न झाल्याची बातमी अधीरतेनें वाचली.

त्या बातमीच्या आनंदांतच या दोन जीवांच्या पालनपोषणाकरितां आपण कोणत्या मार्गाचे अवलंबन करावें याचा तो उत्साहाने विचार करूं लागला.

आपल्या आनंदाला कोणी तरी वांटेकरी असावा या इच्छेनें तो मग दिनकर-मामांकडे जाण्यास निघाला.

एखादा माणूस घरी आला म्हणजे ताबडतोब बोलायला सुरवात कशी करावी हें ठरविण्यांत मामा मोठे चतुर होते. मनोहरला आंत शिरलेला पहातांच ते म्हणाले, " तुम्ही कांही तरी बातमी आणलेली दिसते आज; खरं कीं नाही ? "

" कशावरून ? " त्यांच्या एकदम सुरवात करण्याच्या पद्धतीची गंमत वाटून मनोहर म्हणाला.

" तुमची मुद्राच सांगते आहे महाराज ! वाटल्यास तुमच्या बातमीचं स्वरूप सांगण्याचीही मी हमी घेतो."

" आणि चुकलांत तर ? "

" सांगाल तें देईन."

" अच्छा ! सांगाच तर; तुमचं तर्कज्ञान कसं आहे त्याची तरी परीक्षा होईल."

" बरोबर सांगितलं तर तुम्ही काय द्याल ? "

" पेढे !"

" मग तर काम फार सोपं आहे. तुमची बातमीच पेढ्यांची असावी. सांगा पाहूं तुम्हाला मुलगा झाल्याची बातमी आहे की नाहीं ? "

" बरं चला; म्हणतो झालं तसं तुमच्याकरतां."

" आमच्याकरतां होय ? अच्छा; मोठ्या आनंदाची बातमी आणलीत तुम्ही."

आणि मग मामांनी नंदिनीला हांक मारून आज्ञा दिली, " अग चहा ठेव पाहूं आधी. यांना मुलगा झाल्याची बातमी आणली आहे यांनी; यावेळी यांचं तोंड गोड केलंच पाहिजे मला."

मामांच्या निष्कपटी आनंदाने मनोहरचा आनंद द्विगुणित झाला.

पण त्या बरोबरच आपल्याला नोकरी नाहीं ही बातमी आपण मामांच्या कानावर घातली नाहीं ती आतां तरी घालावी, आणि त्यांच्याकडून कांहीं सूचना मिळाली तर तीही फायदा पदरांत पाडून घ्यावा या विचारानें तो म्हणाला, " आतांपर्यंत तुमच्यापासून मी एक गोष्ट लपवून ठेवली होती तीही सांगून टाकतों."

नंदिनी जवळच उभी होती. मनोहरचे ते उद्गार ऐकतांच ती चमकली आणि आनंदाच्या भरांत आपण आतांपर्यंत लपवून ठेवलेले रहस्य तर तो सांगणार नाहीं ना, या शंकेनें ती थोडीशी चमकली. पण मनोहर असा आपला विश्वासघात करणार नाही, उलट वेळ आल्यास तो आपल्याला धीरच देईल असें त्याच्या मुद्रेवरून ठरवून ती त्याचें काय म्हणणें आहे तें लक्षपूर्वक ऐकूं लागली.

" तुम्हांला लपवालपवी करण्याची संवय आहे तर !" मामा निर्हेतुकपणें हंसून म्हणाले.

" खरं सांगू तुम्हांला ? हल्लीं मला नोकरी नाहीं."

" म्हणजे ? "

" मध्यंतरी मी राजिनामा दिला."

" कां ? "

तो एकाक्षरी प्रश्न विचारतांना मामांची नजर मनोहरच्या भेसूर हास्याकडे गेली, आणि तो आपली चेष्टा तरी करीत नाही या बद्दल त्यांची खात्री झाली. पण या आनंदाच्या वेळी आजपर्यंत आपल्यापासून लपवून ठेवलेली बातमी भेसूरतेने हंसत सांगत असलेल्या या माणसाला वेड तर लागलं नाही ना, अशी त्यांना शंका आल्या-वांचून राहिली नाहीं, आणि मग त्याच्यावरच्या जबाबदारीची आणि त्याने आपल्याला माहित नसलेल्या कारणांकरितां स्वतःवर ओढवून घेतलेल्या संकटाची कल्पना येऊन; त्यांना मनोहर आणि कुमुदिनी या जोडप्याविषयी सहानुभूती वाटूं लागली.

" राजिनामा देण्यांत माझ्याकडून अविचार झाला हें खरं आहे !" मनोहर खाली मान घालून म्हणाला.

" असा वेडेपणा कसा बरं करून बसलांत ? "

मामांच्या त्या जड प्रश्नांत आपल्याविषयी गाढ सहानुभूतीच प्रगट होत आहे असें मनोहरला वाटलें.

" वेडेपणा तर खराच; पण त्याची कारणं मला मात्र विचारूं नका. यांतून मार्ग कसा काढायचा तेवढंच सांगा. "

त्यानें कळवळ्यानें केलेल्या विनंतीमुळे मामांना त्याच्या अविचारी कृत्याविषयी वाटणारी तीव्र जिज्ञासा दाबून ठेवणें भागच होते. पण आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव असूनही या तरुणानें कोणालाही विलोभनीय वाटणारी नोकरी सोडली याला कांहीं तरी जबर कारणें घडलीं असावीत, याबद्दल त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली आणि त्याला आपल्या दुखाःची तीव्रता जाणवूं न देतां, आपण मार्गदर्शक झालें पाहिजे हें त्यांनीं आपल्या मनाशीं ठरविलें.

" मी अधिक चवकशी करीत नाहीं. " कांही वेळ विचार करून मामा म्हणाले, " देतां येईल तेवढी माहिती द्यायला तुमची कांहीं हरकत नाहीं ना ? "

मनोहरानें मानेनेंच अनुमति दर्शविली.

" हरकत नाहीं ! आतां एवढंच सांगा कीं नोकरी सोडण्याचीं तुमचीं कारणं अगदीं खाजगी होती ना ? ऑफीसच्या कोणत्याही कारणाबाबत कोणाशीं भांडण-तंटा होऊन तुम्ही राजीनामा दिलेला नाहीं ना ? "

" नाहीं ! "

" छान ! आतां तुमचे आणि साहेबाचे संबंध कसे काय होते हें सांगाल ? "

" साहेबासहित सगळ्यांशीं माझे पूर्ण मित्रत्वाचे संबंध होते."

" तुम्ही राजीनामा दिल्याला दिवस किती झाले ?"

मनोहर त्या प्रश्नावर अडखळला. आपण कुमुदिनीला पोंचवायला बडोद्यास गेलों त्याचवेळीं आपण राजीनामा पाठवून दिला एवढेच त्याला आठवत होतें. पण त्यानंतर आपण किती दिवस फुकट घालविले हे त्याला तावडतोब आठवेना.

" दीड महिना झाला असावा ! "

मग मामांना कांही वेळ विचारांत घालवावा लागला.

मनोहरला नोकरीचा राजीनामा द्यायला कारण आपण केलेला थट्टेचा प्रयत्नच आहे याची जाणीव असल्यामुळे, त्याविषयी चाललेली त्याची आणि मामांची प्रश्नोत्तरे ऐकतांना तिला भडभडून आलें. मस्करी करण्याच्या प्रयत्नांत आपण आपल्या जीवीताचा तर सत्यानाश करून घेतलाच आहे, पण त्याबरोबरच एका जिवलग मैत्रीणीच्या संसाराचा खेळखंडोबा केला आहे ही जाणीव तिला अत्यंत जाचक वाटली. त्यामुळें मामा यावर काय तोड काढतात हे कळण्यास ती विशेष उत्सुक होती.

प्रत्येकजण आपापल्या विचारांत गर्क असल्याने त्या ठिकाणीं भेसूर शांतता पसरली होती. चाळीच्या नळावर ऐकूं येणारा बादल्यांचा खडखडाट आणि पाण्यावरून भांडत असलेल्या स्त्रियांचा गडगडाट, यांनीं शांतताभंग होत असेल तेवढाच.

" प्रश्न बिकट आहे खरा !" मामा कांहीं वेळानें म्हणाले, " पण यांतूनही मार्ग काढलाच पाहिजे. मला वाटतं तुमच्याविषयी साहेबाचं मत चांगलं असलं तर तो

तुम्हांला कांही तरी मदत करूं शकेल. कदाचित् त्यानं कांही दिवस तरी तुमची वाट पहायचं ठरविलं असेल. आपल्याप्रमाणे आजच्या बिकट परिस्थितीची त्या लोकांनाही जाणीव असतेच. अर्थात् इथं बसल्या बसल्या नक्की कांहीच सांगतां येणार नाही. पण दुसरीकडे खटपट करण्यापूर्वी त्याला भेटून यावं एवढंच माझं म्हणणं."

मामांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द ऐकतांना मनोहरच्या खुरटलेल्या आशा-वेलीला नवीन टवटवी येत होती. साहेबाचा आणि आपला पूर्वीचा स्नेह लक्षांत घेता त्याची आपल्याला पुष्कळच मदत होईल असे त्याला वाटूं लागले. त्यानें आपल्याकरितां जागा राखूनच ठेवली असेल अशी कल्पना करण्याचा वेडेपणा त्यानें मुळीच केला नाही. पण त्या बरोबरच ही कल्पना आपल्या डोक्यांत कशी आली नाही या गोष्टीचे त्याला आश्चर्यही वाटल्यावांचून राहिले नाही. एखादा कूट प्रश्न सोडविण्यांत गर्क झालेल्या माणसाला एकाएकी अतिशय सोपी किल्ली सापडून कूट सुटत चालले म्हणजे जसा आनंद होतो, त्याच प्रकारच्या आनंदाचा अनुभव मनोहरला येऊं लागला; आणि मग तो कितीतरी वेळ त्या दृष्टीनें आपल्या भवितव्या-विषयी विचार करूं लागला.

मामांना फार वेळ विचार करीत गप्प बसवले नाही. एखादा गंभीर प्रश्न समोर आल्यानंतर त्याचा गंभीरपणेच विचार करायला पाहिजे हे त्यांनाही मान्य असलें तरी तासन् तास सगळयांनी सुतकी चेहरे करून बसलें पाहिजे हे त्यांना केव्हांही पसंत नव्हतें. त्यामुळे मनोहर आपल्याला आनंदाची बातमी सांगायला आला असतांना त्याच्या नोकरीच्या प्रश्नाने हवालदील होऊन आपण एकसारखं गंभीर रहावें हे त्यांना रुचलें नाही आणि मग ते म्हणाले, " तुमचा मुलगा पायगुणाचा आहे यांत संशय नाही. नाही तर आतांपर्यंत लपवून ठेवलेली हकिकत सांगण्याची तुम्हांला या वेळी बुद्धीच झाली नसती. बेटा मत डरो! छोकरेके नामसे तुमारा काम हो जायगा!"

आणि मग वातावरणांत पुन्हां प्रसन्नता भरण्याच्या प्रयत्नांत आपल्याला पूर्ण यश येत आहे याबद्दल त्यांची खात्री झाली. त्यांनी केलेल्या विनोदामुळें मनोहरची

मुद्राही खुलूं लागली होती. नंदिनीही आनंदित होत चालली होती, आणि आंतल्या दाराजवळ उभ्या असलेल्या यशोबाईही हंसू लागल्या होत्या.

चहा आल्यानंतर मामा म्हणाले, “ आतां आपण असं करायचं...आपण जाऊं रजनीनाथाकडे. वाटेत पेढे खरेदी करूं आणि त्या स्वारीच्या हातांत ते देऊन या तीन चार दिवसांत न आल्याबद्दल त्यांची हजेरी घेऊं. मला वाटतं नंदिनीलाही घ्यावी बरोबर.”

नाही तरी त्याला नकार दिल्यानंतर आपण त्याला भेटून त्याचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला नाही, आणि तो आपल्याकडे जेवायला होता त्याच वेळीं नेमकी आपण मावशीकडे जाऊन राहिलो होतो, या विचारानें नंदिनी उदास झालेली होती. मामांची सूचना तिला त्यामुळें बरीच वाटली आणि मग ती तिघेही रजनी-नाथाला गांठण्यासाठी ताबडतोब निघाली.

अर्थात् त्यांना रजनीनाथ भेटणे शक्यच नव्हते. नंदिनीची त्यामुळे जबर निराशा झाली. आणि पुढील आठ दिवसांतही तो आला नाही किंवा भेट घेण्याचा प्रयत्न करूनही तो भेटला नाही, तेव्हां मात्र त्याने मुंबई सोडली तर नाही ना अशी तिला शंका आली, आणि केव्हांतरी एकटीच जाऊन त्याचा शोध घ्यायचा तिनें विचार केला.

*           *           *           *

ठरल्याप्रमाणे मनोहर साहेबाला भेटून आला, आणि नोकरीच्या बाबतीत त्याला यशही कल्पनेबाहेर मिळाले. त्याच्यावरील गाढ प्रेमाने त्याच्या साहेबाने त्याची जागा तशीच रिकामी ठेवली होती, आणि एकदां मनोहरचा शोध लावून त्याच्या तोंडूनच राजीनाम्याची कारणे विचारल्याशिवाय जागा भरायची नाही असा त्यानें निश्चय केला होता.

मनोहरला पहातांच इतर नोकर वर्गांत जसा आनंद झाला तसाच साहेबालाही झाला, आणि ताबडतोब त्याला आपल्याकडे बोलावून तो म्हणाला, “ मी तुझी वाटच बघत होतो. राजीनामा देऊन तुझं कल्याण झालं असतं तरी मी तुला सोडायला तयार झालो नसतो. इतर ठिकाणी जाऊन तुझं जें कल्याण झालं असतं तें मी तुझं या ठिकाणीच करायला केव्हांही तयार आहे. ”

" आभारीं आहें मी आपला ! कांहीं कारणामुळे माझी मनःस्थिति बिघडली होती, आणि म्हणूनच माझ्या हातून तो वेडेपणा घडला."

" अच्छा ! तूं कांहीं काळजी करूं नकोस. राजीनामा देण्याचीं कारणं खाजगी असलीं तर मी तीं तुला विचारीत नाहीं. परिस्थितीमुळें भांबावून जाऊन कांहीं वेळेला मनुष्य वेडेपणा करतो हे मला माहित आहे."

योगायोग असा आला कीं ज्या दिवशी मनोहरनें ऑफीसांत पुन्हां पाऊल टाकलें त्याच दिवशी सूर्यकांत आलेला नव्हता, आणि नंतर तो आला त्याच दिवशी पैशाची अफरातफर केल्याच्या आरोपावरून त्याला नोकरीतून कमी करण्यांत आलें. वास्तवीक त्यावेळीं त्याच्यावर खटलाही व्हायचा. पण मनोहरच्या मध्यस्थीनें पैसे भरण्याची व्यवस्था होऊन त्याला नोकरीतून कमी करण्यावरच भागलें

मनोहर परत आल्यानंतर या घडामोडी झाल्या त्या अर्थी त्याचेंच या बाबतींत अंग असलें पाहिजे असें उगीचच मानून त्याने याचा वचपा काढण्याचें ठरविलें.

दोन तीन दिवसांतच त्याने मनोहरच्या बदलेल्या जागेचा पत्ता काढला आणि त्याला घरी गांठून सूर्यकांत म्हणाला, " नोकरी गेल्याबद्दल मला मुळीच आश्चर्य वाटत नाहीं. तुझी अब्रू संभाळण्याकरितां जगांत सगळीकडेच तूं मला टाळण्याचा प्रयत्न करशील हें मी जाणून आहें. "

त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर मनोहरच्या हृदयावर नवनवीन आघात होत होता. आपण नोकरीत परत आलो त्याच सुमारास सूर्यकांताची नोकरी जावी याबद्दल त्याला कितीही वाईट वाटले असले, तरी त्याने आपल्यावर या प्रकाराचा गहजब करावा हे त्याला मुळीच आवडलें नाही. कदाचित् नोकरी गेल्याच्या जबरदस्त आघातामुळेंच उद्वेगाने त्याच्या तोंडून असले उद्गार निघाले असावेत असेंही मानायला तो तयार झाला असता; पण सूर्यकांताच्या तोंडून एक विलक्षण वाटणारी सूचना ऐकतांच मनोहरला त्याचे खरें स्वरूप तर दिसूं लागलेच, पण त्या बरोबरच इतर मंडळींना त्याच्याविषयीं तिरस्कर कां वाटत असावा याचेही आतांपर्यंत न सुटलेलें कोडे त्याला सुटूं लागलें.

सूर्यकांत त्याला म्हणाला, " झालेल्या प्रकाराबद्दल मी मुळींच वाईट वाटून घेत नाहीं. तुझी अब्रू संभाळण्याकरितां मी मागीन तेवढे पैसे मला देत जा. मी कोणत्याही प्रकारें तुझ्या मार्गांत येणार नाही. पण पैसे वेळच्या वेळा मिळाले नाहींत तर तुझं तूं पाहून घे. "

## —१—

आगदीं नव्या प्रांतांत प्रवासाला निघालेल्या तरुण प्रवाशाच्या अंगी उत्साहाचें जे नवचैतन्य दिसते, ते रजनीनाथाजवळ न दिसल्यानें अरविंदबाबूंचें हृदय चरकल्यावांचून राहिले नाही. एका भिन्न प्रांतीय तरुणाला आपल्या प्रांतांत नेतांना केवळ त्याच्याच कल्याणाच्या दृष्टीनें हे आपण करीत आहोंत ही जाणीव त्यांच्या ठिकाणी थोड्या फार अंशाने वसत असल्यामुळे, तो उदासीन दिसल्यानें त्यांचा विरस व्हावा यांत नवल नाही. प्रवासाच्या आरंभापासून त्यानें दाखविलेली विन्मुखता पाहून या तरुणाच्या अंतर्यामीं एखादी खोल जखम तर झालेली नाही ना, अशी त्यांना शंका आल्यावांचून राहिली नाही.

आणि एखाद्यानें रजनीनाथाला त्याप्रमाणें प्रश्न केला असता तर त्याला आपली मनस्थिति लपवितां आली नसती. सबंध हिंदुस्थानचाच नव्हे तर जगाचाही प्रवास करण्याची महत्वाकांक्षा एकदां त्याने बाळगली होती. पण एकाएकी झालेल्या प्रेमभंगाच्या जबरदस्त आघातामुळे त्याचा सारा उत्साह मावळला होता, आणि केवळ संधि आली म्हणूनच एखाद्या यंत्राप्रमाणें नंदिनीच्या नजरेआड होण्याच्या तीव्र इच्छेनें तो बाहेर पडला होता. या पूर्वी दोन वेळां इंदूरला जाण्याच्या निमित्ताने त्याला भुसावळवरून खांडव्याच्या रस्त्यानें जावे लागलें होतें, आणि त्या दोन्ही वेळीं भुसावळच्याच स्टेशनावर समोर उभ्या असलेल्या गाडीतील शीख प्रवाशांची

अफू चोरून आणल्याबद्दल झालेली झडती त्यानें कुतूहलपूर्वक पाहिली होती. ' क्यौं सदरदारजी ' म्हणून हांक मारून अबकारी खात्याच्या शिपायानें त्या शीखांच्या वर्मावर घाव घातलेला बघत असतांना त्याची त्या वेळी किती तरी करमणूक झाली होती, आणि कधी काळी नंदिनीबरोबर या बाजूने प्रवास करण्याचा योग आल्यास, तिला एखाद्याला हरभऱ्याच्या झाडावर बसवून खालीं पाडण्याची ही अजब युक्ति अवश्य दाखवायची असे त्याने घोकून ठेवले होतें. पण नंदिनीला आपली सहचारिणी म्हणून बरोबर घेऊन जाण्याची आशा नष्ट झाल्याने या प्रवासांत त्यानें भुसावळ स्टेशनवरील गंमतीकडे मुळीच लक्ष दिलें नाही. पूर्वीच्या प्रवासांत गाडी भुसावळवरून निघून खांडव्याच्या बाजूला वळतांना नागपूरकडे जाणारा रस्ता बघण्यासाठीच म्हणून आपण एकदां या बाजूच्या प्रवासाला यायचंच, असे त्यानें ठरवून ठेवले होतें. पण आजच्या कष्टी मनःस्थितीत त्या संकल्पाचा त्याला पूर्ण विसर पडला होता. आणि इतर वेळीं केवळ जिज्ञासेनें बरोबरच्या प्रवाशांची माहिती मिळवायचीच असा जो त्याचा दंडक होता त्याची तर त्याला आठवणही झाली नाहीं. त्याच्या मनश्चक्षूंपुढे नंदिनीची सडपातळ प्रतिमा दिसत होती, आणि तिनें नकार दिला त्या वेळचे अखेरचे शब्द त्याच्या कर्णरंध्रांत घुमत होते.

नागपूरच्या बाजूनें बंगाल प्रांतांत शिरतांना आजूबाजूची सुंदर सुंदर निसर्गचित्रें पहायचें सोडून तो असा किती वेळ बसला असता कोण जाणे ? पण त्याला बरोबर घेऊन निघालेल्या अरविंदबाबूंना गप्प बसणे अशक्य होऊन बसले, आणि मग दुसऱ्या दिवशी सकाळीं नागपूर सोडल्यानंतर ते रजनीनाथाला म्हणाले, " मुंबई प्रांत सोडतांना तुम्हांला वाईट वाटतसं दिसतंय् ? "

प्रवासाला सुरवात झाल्यापासून मधून मधून झालेली किरकोळ प्रश्नोत्तर सोडलीं, तर हृदयाला हात घालणारा त्यांचा हा पहिलाच प्रश्न ऐकून रजनीनाथ दचकल्या-वांचून राहिला नाही. पण आपल्याला सफाईदार खोटं बोलायला या सारखी दुसरी संधि मिळणार नाही असें वाटूनच की काय तो म्हणाला, " आपल्या प्रश्नाचं उत्तर द्यायला मला मुळींच संकोच वाटत नाही. आपण म्हणतां तशी झाली आहे खरी माझी स्थिति !"

" एखाद्या ठिकाणी आपण सारा जन्म घालविला म्हणजे केव्हां केव्हां असं वाटतं माणसाला; पण जगाचा अनुभव मिळवायचा असला तर आपली मायभूमि सोडून माणसानं लांब लांब फिरलं हें पाहिजेच!"

" हं ! "

" आपला देश सोडतांना माणसाला जें दुःख होतं त्याला कारणं मात्र वेगळी वेगळी असतात बरं कां. " त्याला खुलविण्याच्या उद्देशानें अरविंदबाबू किंचित् मिस्किलपणाने म्हणाले, " आपला देश सोडतांना प्रिय माणसांचा विरह होणार हीच भावना त्यांत प्रमुख असते. "

अरविंदबाबूंचा हा टोला आपल्यालाच तर नाही ना, अशी रजनीनाथाला शंका आल्यावांचून राहिली नाही. पण मग पुन्हां त्याच्या डोक्यांत विचार आला कीं त्यांना आपल्या प्रणयभंगाची हकीकत ठाऊक असणे मुळीच शक्य नाही; केवळ त्यांच्या म्हणण्याच्या अनुरोधानेच आपल्याला तसा संशय आला.

" तुमच्याबरोबर येणारं कोणी प्रिय माणूस नव्हतं का ? परक्या प्रांतांत आपल्या प्रिय माणसांना घेऊन रहाणं मोठं आल्हाददायक असतं."

ते शब्द तर त्याच्या हृदयांत खोल जाऊन रुतले. आपलें दुःख आपल्याला या पुढें लपवून ठेवतां येणार नाही अशी त्याची बालंबाल खात्री झाली, आणि मग तो निश्चयाने आवंढा गिळून म्हणाला " बंगालचं सृष्टिसौंदर्य पहाण्यासारखं असतं म्हणतात ! आपल्यामुळे ते पहाण्याची मला संधि मिळाली या बद्दल मला आपले आभारच मानले पाहिजेत. "

मग तो डोळ्यांपुढून सरसर मागे सरत असलेल्या निरनिराळ्या दृश्यांकडे बघण्याच्या निमित्तानें खिडकीबाहेर पाहूं लागला.

त्याच्या न कळत सुटलेले दीर्घश्वास, सौंदर्यदर्शनाचा आनंद न दर्शविणारी त्याची कष्टी मुद्रा, आणि एखाद्यावेळी नजर गाडीतच परत येऊन कुठेंतरी लागलेली त्याच्या दृष्टीची तंद्री, या सर्व गोष्टींवरून आपल्याला आलेली शंका खरीच आहे असा त्यांनी कयास बांधला, आणि मग त्याच्या दुःखाचे स्वरूप तरी कोणतें असावें या विचारानें अरविंदबाबू स्वतःच विचारमग्न झाले.

मुंबई सोडल्यापासून सारखा विचार करून डोकें शिणल्यानंतर, नाइलाजानें का होईना पण रजनीनाथाला आपल्या आजूबाजूला बघण्याची इच्छा वारंवार होऊं लागली. त्यानें पाहिलें तों पलीकडच्या बाजूला एक महाराष्ट्रीय जोडपें आनंदानें बोलत बसलें होतें. प्रवासाचा शीण त्यांच्या तोंडावरून स्पष्ट दिसत असला तरी पण परक्या प्रांतांत जातांना जरूर असलेला उत्साह त्यांच्या ठिकाणीं पूर्णतेनें वसत होता. नंदिनीला घेऊन आपणही असेच आनंदानें गेलों असतों असा विचार त्याच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. पण त्या बरोबरच आपल्याबरोबर प्रवास करणारीं ही स्वदेशीय माणसें असावीत तरी कोण अशी उत्सुकताही त्याच्या मनांत उत्पन्न झाल्यावांचून राहिली नाहीं. त्या जोडप्याशी ओळख करून घेण्याचा मोह त्याला अनावर झाला. त्या जोडप्यांपैकी तरूणाचें लक्षही त्याच्याकडेच असावें. कारण रजनीनाथाने त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकतांच आपण केव्हांची ज्या संधीची वाट बघत आहोंत ती एकदांची आपल्याला मिळाली असाच दर्शविणारा आनंद त्याच्या मुद्रेवर दिसूं लागला, आणि ज्या क्षणीं रजनीनाथाला आपल्या जागेवरून उठून त्याच्याकडे जावें असें तीव्रतेनें वाटलें त्याच क्षणीं तोच आपणहून रजनीनाथजवळ आला आणि म्हणाला, " माफ करा आपण ! पण विचारल्यावांचून रहावत नाही म्हणून विचारतों. कलकत्त्यालाच निघालांत ना आपण ? "

" हो ! कशावरून ताडलंत आपण हे ? "

" ती फार सोपी गोष्ट आहे. सकाळी नागपूरला तुम्ही उतरलां नाही तेव्हांच मीं अंदाज केला. "

" बरोबर आहे तुमचा अंदाज ! " रजनीनाथ हंसून म्हणाला.

" आणखी एक प्रश्न विचारायचाय्. आपली हरकत नसल्यास विचारतो !"

" विचारा कीं ! " रजनीनाथाला त्याच्या परवानगी मागण्याच्या पद्धतीची गंमत वाटून तो म्हणाला.

' कोणत्या कामाकरितां चाललांत ' हाच तो प्रश्न असणार असा त्याने चाळ्यानें अंदाज केला. आणि अंदाज करण्यांत आपण पटाईत आहोंत कीं नाहीं हे अजमावण्याकरितां तो त्या तरुणाच्या तोंडाकडे पाहूं लागला.

" प्रसिद्ध डायरेक्टर रजनीनाथ ते आपणच का ? "

आपला अंदाज चुकेल अशी रजनीनाथाची मुळींच कल्पना नव्हती, पण त्या प्रश्नानें त्याला आनंदहि झाल्यावांचून राहिला नाहीं. नंदिनीबरोबर असती तर तिला एक अनोळखी इसम आपल्याला असा प्रश्न विचारतांना पाहून आनंद झाल्यावांचून राहिला नसता ही गोष्ट ताबडतोब त्याच्या मनांत येऊन गेली. त्यामुळें एकदोन क्षण त्याची उदासीनता पुन्हां डोके वर काढूं लागली; पण त्यानें संयमन करून आपल्या मुद्रेवरील भाव पालटले, आणि मान हलवून तो म्हणाला, " बरोबर आहे आपला अंदाज; पण त्यांतील प्रसिद्ध हें विशेषण मान्य नाही मला."

त्याचवेळीं त्या तरुणानें आपल्या पत्नीकडे अशा कांहीं विवक्षित नजरेनें पाहिलें की ' बघ, मी म्हणत होतों तें खरं होतं कीं नाहीं ' असेंच जणुं त्याला तिला पटवायचे होतें.

पतीपत्नीची त्यावेळीं झालेली नजरानजर रजनीनाथाच्या नजरेंतून सुटली नाहीं. आपण या अनोळखी इसमाच्या आणि त्याच्या पत्नीच्या कौतुकाचा विषय झालों आहोंत याचा त्याला आनंदच झाला.

" मी आपला फोटो पाहिला होता वर्तमानपत्रांत ! आणि काल संध्याकाळी आपण गाडींत बसलांत तेव्हांपासूनच आपल्याला विचारून खात्री करून घ्यायची असं मी ठरवलं होतं. "

त्यानें तोंडावर आपली प्रशंसा करूं नये म्हणून मग रजनीनाथ विषय बदलून म्हणाला, " आपण पहिल्यानेंच चाललां आहांत का तिकडे ? "

" नाहीं ! मी आज पांच वर्षं झालीं नोकरीलाच तिकडे आहें. नुक्तंच माझं लग्न झालं आणि पत्नीला घेऊन निघालों आहे. तिनं मात्र कलकत्ता पाहिलं नाही अजून. "

जी गोष्ट टाळण्याचा त्याचा मनापासून प्रयत्न चालला होता तीच कोणत्या तरी निमित्तानें पुन्हां डोकें वर काढीत होती. नूतनपरिणीत पत्नीला घेऊन चाललेल्या त्या तरुणाकडे पाहून आपणही नंदिनीला घेऊन असेंच उत्साहानें निघालों असतों असें त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

त्या तरुणाच्या नजरेंतूनही रजनीनाथाची ही कष्टी मनःस्थिति सुटली नाहीं. पांच वर्षांपूर्वी आपण घर सोडून निघालों त्या वेळीं आपल्याला नक्की काय वाटलें हें

आठवायचा त्यानें प्रयत्न केला; पण तें आठवण्यासाठी त्यानें डोक्याला मुद्दाम ताण दिला नाहीं.

एका प्रसिद्ध कलावंताशीं आपला परिचय झाला याच आनंदांत तो रजनीनाथाशीं गप्पा मारूं लागला.

नंतर रजनीनाथाने आपल्या इतर प्रवासीबांधवांकडे एक दृष्टिक्षेप टाकला. त्याच्यापासून थोड्याच अंतरावर एक मोठ्या पोटाचा मारवाडी बसलेला होता, आणि शेजारच्या इसमाशी चाललेल्या त्याच्या गप्पाही धंदा कसा मंदीत आहे याविषयीच्या होत्या. समोरच्या बाकावर एक मुसलमान बसला होता. वारंवार नमाज पढण्याच्यावेळी तो इतर उतारूंच्या करमणुकीचा विषय होऊन बसलेला होता. निरनिराळ्या देशांच्या आणि निरनिराळ्या वेषांच्या त्या माणसांकडे बघून ' जग वैचित्र्यपूर्ण आहे ' एवढाच उद्गार त्याने काढला.

रजनीनाथानें मध्येच कांही वेळ मौन स्वीकारलेलें पाहून त्या तरुणाचा थोडासा विरसच झाला. ज्या कलावंताचें आपण चहाते आहोंत त्यानें आपलीहि थोडी माहिती विचारावी, आपण त्याच्या हृदयांतही शक्य झाल्यास स्थान मिळवावें, आणि ज्या परक्या प्रांतांत तो जात आहे त्याची आपल्याला पांच वर्षांच्या वास्तव्याने माहिती झाली असल्याने त्याला स्थायिक होण्यास शक्य तो मदत करावी, असे त्याला सारखें वाटत होतें. कांही वेळ त्याने रजनीनाथला आपल्याच अवलोकनांत आणि विचारांत रमूं दिले, आणि मग त्याला कांहीतरी प्रश्न विचारल्याशिवाय तो बोलणारच नाहीं असें वाटल्यामुळेंच की काय तो म्हणाला, " आपण बंगालमध्यें कांही कामानिमित्तच चाललां असाल ? "

" हो ! हे गृहस्थ मला डायरेक्टर म्हणून घेऊन चालले आहेत. "

" अरे वा ! आपण निघालांत ते छान झालं. आपल्या प्रांतांत आपलं कौतुक व्हावं असं कोणालाही वाटणं शक्य आहे. पण परक्या ठिकाणी जाऊन उच्च पदवीला पावणं हें त्याहूनही आनंददायक आहे."

आतांपर्यंत त्या तरुणाचें नांव गांव विचारण्याची रजनीनाथाला विशेष उत्सुकता वाटली नव्हती. पण उच्च पदाच्या आनंदाविषयीं तो बोलूं लागलेला पाहून सहाजिकच त्याची माहिती मिळवावी असे त्याला वाटलें, आणि मग तो म्हणाला, " आपण तिकडे काय करतां तें नाहीं सांगितलंत मला. "

" मी तिकडे एका इलेक्ट्रिक कंपनीत आहें, असिस्टंट इंजीनिअर म्हणून मला काम करावं लागतं."

" आपलं नांव ? "

" सदानंद चित्रे."

" आपली गाडीत ओळख झाली हें छान झालं ! "

" असं वास्तविक मी म्हणायला पाहिजे. परक्या प्रांतांत गेल्यावर आपल्या बाजूच्या माणसाची भेट व्हावी असं फार वाटतं. त्यांतून आपण कलावंत असल्याने आपल्या ओळखीचा आनंद विशेष आहे. "

" खरं सांगायचं म्हणजे मला अजून फार शिकायचं आहे. या बाबूजींच्या कृपेनं मला संधि लाभली म्हणून मी स्वतःला भाग्यवान् म्हणतों ! "

" अहो महाराज मी आपल्याला असलं कांहीं भलतंसलतं बोलूं देणार नाही बरं का ? माझ्या विनंतीला मान देऊन आपण आला नसतां मग मी काय केलं असतं ? " बराच वेळ गप्प बसलेले अरविंदबाबू हंसत म्हणाले.

बाबूजींनीं आपल्यालाच मोठेपणा दिलेला पाहून रजनीनाथाला गुप्त आनंद झाल्यावांचून राहिला नाही. आतांपर्यंत त्यानें अनुभवलेली जगरहाटीच अशी होती की, स्वतःच्या श्रेयाचा वांटा कोणी दुसऱ्याला द्यायला तयार नव्हताच, पण आपण न केलेल्या कृत्याचे श्रेय पटकविण्यास प्रत्येकजण सरसावून पुढे आलेला होता. जगांतील आपल्या कर्तबगारीला वाव द्यायला एक सच्चा दिलाचा इसम पुढें आला आहे या गोष्टीचें त्याला साभिमान कौतुक वाटले.

बाबूजी आणि रजनीनाथ यांच्यापेक्षां सदानंदाच्या मनाची स्थिति अगदींच वेगळी होती. एखाद्या रसिकानें ऊन आणि पाऊस या दोघांनीही निर्माण केलेल्या रमणीय दृश्याकडे पहात रहावें आणि यांत श्रेयाचा वांटा कोणाचा हें ठरविण्यासाठीं दोघांचीही उदात्त चढाओढ लागावी असाच त्याला भास झाला. कांहीं वेळ दोघांकडेही कौतुकाने पाहिल्यानंतर तो हंसत म्हणाला, " तुमच्या चढाओढींत मलाही भाग घ्यावासा वाटतोय्."

सदानंदाची चर्याच त्या वेळीं अशी होती की तो कांही तरी गंमतीचेंच बोलणार अशी कोणाचीही खात्री व्हावी. अरविंदबाबू आणि रजनीनाथ यांनींही त्याप्रमाणेंच

अंदाज बांधला, आणि आपला अंदाज मुळीच खोटा नाहीं असे ताबडतोब त्यांच्या प्रत्ययास आले.

"मात्र मी चढाओढींत भाग घेणार म्हणजे तुमची दोघांचीही परीक्षा पहाणार हें दोघांनीही विसरूं नये!" सदानंद आपल्या बोलण्याविषयीं त्यांची उत्सुकता वाढवीत म्हणाला, "एकमेकांच्या श्रेयाचा वांटा पटकविण्याची दोघांचीही इच्छा नाहीं हें आतांच माझ्या प्रत्ययास आलं. पण तें मनापासून आहे हें सिद्ध करण्यासाठीं बाबूजीनीं रजनीनाथांना माझ्याकडे उतरण्याची परवानगी द्यावी. बाबूजीनीं परवानगी देण्यांत आणि रजनीनाथांनी माझी विनंति मान्य करण्यांत खरी कसोटी आहे."

बोलतां बोलतां गंमतीनें सदानंदानें आपली अडचण ओळखली याबद्दल रजनीनाथाला आनंदच झाला. नाही तरी त्याने 'महाराष्ट्रनिवासांत' किंवा 'मंडळांत' सोयीचें वाटेल त्या ठिकाणी उतरावे असें ठरले असल्यानें एखाद्या कुटुंबवत्सल माणसाकडे उतरण्याची त्याची अनायासेच सोय झालेली पाहून बाबूजींनाही समाधान वाटलें.

कोणीही विशेष हरकत न घेतां सदानंदाची सूचना मान्य झाली.

पण या नवीन ओळखी आणि त्यानंतर झालेल्या गप्पांनंतरही रजनीनाथाचं वृत्ति कोणालाच उल्हसित भासली नाही.

त्यांतल्या त्यांत बाबूजींना तर त्याची अप्रसन्नता भारीच जाणवली. कारण जवळ जवळ त्याच्याच वयाचा सदानंद आपल्या पत्नीला बंगालची निसर्गशोभा दाखवि ण्यांत तन्मय झाला होता, तर त्याच वेळीं रजनीनाथ आपल्या नजरेसमोर गतस्मृतींच चित्रें रंगविण्यांत आणि त्या बरोबरच दुःखाचे कढत निश्वास सोडण्यांत मग्न होत

संध्याकाळी विलासपूरच्या आसपास दिसणारें सौंदर्य, मध्यरात्रीला टाटानगरर दिसणारी हिरव्या दिव्यांची शोभा आणि हमालांचे मुंबईच्या माणसाला विचि वाटणारे हेल, पहाटे चारसाडेचारच्या सुमाराला दिसूं लागणारा अंधुक प्रकाश, आ त्यानंतर सव्वापांचच्या सुमाराला कोंवळ्या उन्हांत सतेज दिसणारीं ताडांचीं झा आणि त्यांच्या छत्राखालींच जणुं ऐटीनें उभीं असलेलीं रंगी बेरंगी फुलांचीं इ कांहीं झाडें, मुंबई बाजूपेक्षां उंचट आणि विनविणीच्या झावळ्यांच्या झोपड्या, त

झोंपड्या आणि वृक्ष यांना आपण निर्माण केलेलें सौंदर्य बघण्यासाठीं मानवांनीं तयार केलेल्या पुष्करिणी, आणि या सगळ्यांचीं स्तुतिस्तोत्रे गाणारी मनोहर रंगांचीं इकडून तिकडे उडणारीं पांखरें, या सगळ्यांकडे रजनीनाथासारख्या रसिक तरुणानें अतृप्त नजरेनें पहायला पाहिजे होतें असें बाबूजींना सारखें वाटत होतें. सदानंद आपल्या पत्नीसहित त्या सौंदर्याकडे आसक्त नजरेनें बघत होता. त्याबद्दल त्यांना मनापासून आनंदच होत होता. पण ज्या तरुणाला आपण एवढ्या उत्साहानें आपल्या बाजूच्या सौंदर्य सागरांत घेऊन चाललों आहोत त्याने ते सौंदर्य अवलोकून प्रशंसेचा एखादाच उद्गार काढला असता तर आपल्याला खचित अवर्णनीय आनंद झाला असता ही गोष्ट त्यांना विसरतां येत नव्हती.

रजनीनाथाचे या सौंदर्याकडे मुळीच लक्ष नव्हतें असे नाही, पण त्याकडे पहातांना निसर्गानें आपल्याला हिणविण्याकरितांच हा ठेवा आपल्यापुढे मांडला आहे असें त्याच्या मनांत येऊन गेले. आणि मग निसर्गाचा धिक्कार करण्याकरितांच कीं काय त्यानें मुद्दामच ते चैतन्यदायक देखावे पहाण्याचें टाळले.

हौरा स्टेशनवर उतरल्यावर टॅक्सीनें कलकत्ता शहरांत पदार्पण करतांना त्याची ती उदासीनता कायम राहिली. नव्हे ट्राम आणि बस मध्यें बसलेले जवळ जवळ उघडेच असे ओरिये पाहिल्यानंतर त्याची विषण्णता वाढीसच लागली. आणि जगांत दुःखच अधिक भरलें आहे, सुखाचा केवळ भासच उत्पन्न होतो आणि त्यानें मनुष्य फसतो...आपणही तसेच फसलों असा त्याच्या मनाने निर्वाळा दिला.

---

# —१०—

दोन तीन वेळ प्रयत्न करूनही रजनीनाथ भेटला नाही तेव्हां मात्र तो निराशेनें कुठें तरी नाहीसा झाला नाहीना, या शंकेने नंदिनी व्याकुळ झाली, आणि मग तो या जगांत कुठे तरी आपली आठवण काढीत भटकत असेल आणि आपण मात्र या ठिकाणी स्वस्थ बसलो आहोत, ही जाणीव तिला कांही केल्या शांतता लाभूं देईना. आपण आपल्या सुखावर तिलांजली दिली आहे या गोष्टीचे तिला विस्मरण झाले नसलें तरी आपल्या नकारामुळेच त्याच्यावर निष्प्रेम जीवन कंठण्याची पाळी आली आहे ही गोष्ट वारंवार तिच्या मनांत येत होती. आणि त्यांतच पंधरा दिवसांत रजनीनाथ आपल्याला भेटायला आला नाही किंवा त्याची कांहीं बातमीही नाहीं हे लक्षांत आल्यावर दिनकरमामा त्याच्या निवासस्थानी जाऊन आल्यावर त्यानें जागाच सोडली आहे असे त्यांना कळलें, तेव्हां त्यांनी नंदिनीवरच प्रश्नांची जी सरबत्ती केली तिने तर तिचा मनस्वी कोंडमारा होऊं लागला.

“ तुलाही त्याचा कांहीं पत्ता लागला नाही ? ” एके दिवशीं त्यांनीं विचारलें.

“ कसा असणार ? ” नंदिनी कसेबसे म्हणाली.

“ अग, आमच्यापेक्षां तुलाच अधिक माहिती असायला पाहिजे. ”

“ पण मी एकदां इथें नसतांना ते जेवायला आले होते त्यानंतर मला तरी कुठें भेटले ते ? ”

" ही गोष्ट कांही बरी नाहीं बुवा !" मामांना खरी परिस्थिति माहीत नसल्यानें तिची थट्टा करण्याची लहर येऊन ते म्हणाले, " अग तरुण मंडळीचा कांही नेम नसतो; तुम्हीं मुलींनीं त्यांच्यावर पाळत ठेवली नाही तर ते केव्हां पळ काढतील याविषयीं खात्री नाही."

" मामा, खरंच सांगतें मला त्यांच्यावर पाळत ठेवायचं कांहीच कारण नाही !"

एकाएकीं तिच्या आवाजांत झालेला फरक तिला आपली मस्करी कळली नाहीं हेंच दाखवीत आहे असें दिनकरमामांना वाटलें. आणि मग तिच्या आवडत्या माणसाविषयी आपण बोलत असतां ती हंसरी दिसत नाहीं तेव्हां याच गोष्टीचा तर रजनीनाथाच्या नाहीशा होण्याशीं संबंध नाहीं ना, अशी त्यांना शंका आल्या वांचून राहिली नाहीं.

" मग तूंच त्यांना कांही कामासाठीं कुठें पाठवलं असावंस !" आपल्या बोलण्यांत ताबडतोब फरक दिसूं नये म्हणून थट्टा तशीच चालू ठेवून मामा म्हणाले, " पण तुम्ही आम्हांला त्यांचा पत्ता सांगितला नाही तरी कळणार नाही असं नाही बरं का !"

" तुम्हांला माझं म्हणणं मुळीच खरं वाटणार नाही हे मी जाणून आहे. पण मी खरंच सांगतें कीं मला कांहीच माहिती नाही."

" तो तुझ्यावर रागावला तर नाही ना ?" मामांनी एकदम गंभीर होऊन विचारलें.

नंदिनी कांही वेळ गप्प राहिली. मामा जोंपर्यंत मस्करीच करीत होते तोंपर्यंत त्यांना वाटलीं ती उत्तरं द्यायला तिला कांही वाटलें नसतें. पण त्यांच्या शेवटच्या प्रश्नावरून त्यांना आपल्या हृदयांतील गुप्त दुःख नक्की समजलें असावें, आणि आतां ते भेदक प्रश्न विचारून आपल्या हिताकरितां का होईना पण सगळी माहिती काढण्याचा प्रयत्न करतील, आणि आपल्याला त्यांच्या प्रश्नांना कांही तरी समाधानकारक उत्तरे दिल्याखेरीज गत्यंतर उरणार नाहीं, हे लक्षांत येतांच ती थोडीशी बावरली.

" मामा हा प्रश्न मोठ्या माणसांनी लहानांना विचारायचा नसतो !" शक्य तर थट्टेवरच सगळा प्रकार नेण्याचा विचार करून नंदिनी म्हणाली, " तरुण मंडळींत

खरोखरच कांहीं भांडणं झालीं तर तीं तुमच्यापर्यंत येऊन चालणार नाहींत. तीं आमच्याजवळच रहाण्यांत माधुरी आहे."

"असं होय? बरं, बरं! पण त्याचा पत्ता मला कळव म्हणजे झालं!" मामा हंसून म्हणाले.

"तो मात्र मलाही माहित नाहीं!" असें कांहीं तरी नंदिनी पुटपुटली खरी, पण आपण काय बोललों तें तिचें तिलाच कळलें नाहीं, आणि मग मामाही तिथून निघाले. पण कांही तरी जबरदस्त कारण झाल्यावांचून रजनीनाथ आपल्याला न कळवतां निघून गेला नाही हे मात्र त्यांनीं नंदिनीच्या मुद्रेवरून ठरविलें, आणि तो कुठेंही आपल्याला भेटला तर त्याला घरीं घेऊन यायचें आणि मग दोघांमधील गैरसमज गंमतीनें घालवायचे, असा त्यांनी स्वतःशी विचारही करून ठेवला.

पण प्रयत्न करूनही नंदिनीच्या मुद्रेवर दिसलेली दुःखाची छटा त्यांना विसरतां येईना, आणि मग ते संधि मिळतांच यशोदाबाईंना बाजूला गांठून म्हणाले, "मला वाटतं दोघांची कांही तरी कारणावरून बोलाचाली झाली असावी; त्या शिवाय इतक्या दिवसांत आल्यावांचून त्याला राहवलं नसतं."

"काय आहे ते परमेश्वर जाणे! पण भांडण झालं तरी दोघंही अबोला धरतील असं मला वाटत नाही!"

"अग त्यांना नेहमींच भांडायची संवय असती तर आपल्याला काळजी करायचं कांहींच कारण नव्हतं."

"खरं आहे तुझं म्हणणं!"

आणि मग त्यानंतर किती तरी वेळ यशोदाबाई सुन्न मनानें या प्रश्नाविषयीं विचार करीत बसल्या होत्या.

नंदिनी पूर्वीसारखी प्रसन्न दिसत नाहीं ही गोष्ट केव्हांच त्यांच्या लक्षांत येऊन चुकली होती. आणि तिला केव्हां तरी मोकळेपणाने या विषयीं विचारलेंच पाहिजे हेंही त्यांच्या मनानें ठरवून ठेवलें होतें. कारण त्यांनीं तिला अभ्यास करतांना किती तरी वेळां हातांतील पुस्तक तसेंच राहून कुठें तरी नजर लावून विचार करीत बसतांना पाहिलें होतें; किती तरी वेळां ती एकांतांत रडत असावी असा त्यांना संशय आलेला होता, आणि कांहीं वेळां मध्यरात्रीला ती जागी असावी

असेंही त्यांच्या प्रत्ययास आलें होतें. कांहीं वेळां त्यांनींही तिला एखादा सूचक प्रश्न टाकून छेडण्याचा प्रयत्न केला होता. पण तिनें अभ्यासाचीच सबब दाखवून वेळ मारून नेलेली असल्यानें त्यांचाही मग नाइलाज झाला होता.

आतां मात्र तिला विचारल्यावांचून गत्यंतर नाहीं....

दिनकरमामा गेल्यावर त्या स्वतांशीच म्हणाल्या, आणि मग संध्याकाळी घरांत पाहिजे तसा एकांत मिळतांच त्यांनी तिला प्रश्न केला, " तुला हल्ली बरं का वाटत नाहीं ? "

" कोणी सांगितलं तुला ? " नंदिनी बळेंच हंसण्याचा प्रयत्न करून म्हणाली.

" आईला या गोष्टी सांगाव्या का लागतात कोणी ? वेडी कुठली !"

" असं होय ? मग तर सांगितलेल्या गोष्टींबद्दल कांही तरी विचार करावा असं मीं म्हणेन. पण तर्कानंच ज्या गोष्टी ठरवावयच्या असतील त्या बद्दल विचार न करणंच चांगलं नाही का ? "

" मला तुझ्यासारखं कांही बोलतां येणार नाही; पण मुलीच्या मनाचा आरसा आईच्या हृदयांत असतो हें विसरूं नकोस ! "

" तूं तरी गंमतच करतेस बरं का आई ! आतांच तूं म्हणालीस की तुला बोलतां येत नाही आणि बोलतां बोलतां असं सुंदरसं बोलून गेलीस की कोणीही विद्यार्थ्यानं तुझी आरशाची कल्पना घोकून ठेवावी परिक्षेसाठीं. "

" तें प्रथम तूंच कर ना; पण तरीही माझ्या प्रश्नाचं उत्तर तुला देतां आलं नाहीं. आतां खरं सांग हं, तूं आतांशा कष्टी कां दिसतेस ? "

" उगीच ग ! तूं पहातेस अभ्यासाचा केवढा डोंगर पसरला आहे तो. मला आतांपासूनच बाई त्या परीक्षेची भीति वाटूं लागली आहे. "

" देश जिंकायला निघालेला एखादा वीर असं भीतिचं स्तोम माजवूं लागला, तर त्याच्या निकटच्या माणसांना जें वाटेल तेंच मला आतां तुझ्याविषयीं वाटतंय्. वीराप्रमाणें विद्यार्थ्यांनीही अशा भीतिच्या गोष्टी बोलून चालणार नाहीं, आणि अशा गोष्टींनीं कोणी फसणारही नाहीं."

बोलतां बोलतां आईच्या शब्दांत आपल्याविषयीं जितका आत्मविश्वास प्रगट झालेला नंदिनीच्या प्रत्ययास येत होता, तितकाच तिच्या कंठांत निर्माण झालेला

गंहिवरही तिला अधिक दुःखी करीत होता. पण आपलें दुःख या जन्मांत केव्हांही आपल्या आईला निवेदन करतां येणार नाही हें ती जाणून होती, आणि त्यामुळें आपण यावेळी हृदय घट्ट करून बोललों नाहीं तर आईच्या मनावर विपरीत परिणाम होईल हें तिने ओळखलें, आणि मग आईला थोड्याफार अंशानें चकविण्याच्या उद्देशानें ती हंसत म्हणाली, " मला माहीत आहे तूं मघांपासून एवढं खोदून कां विचारते आहेस ती."

" बरीच ग मनकवडी दिसतेस ! मग सांगच मी तुला एवढं का विचारतें आहें आणि त्याप्रमाणें खरोखरीच कांहीं आहे का?" नंदिनी इतक्या स्पष्टपणे बोलणार नाहीं अशी कल्पना असल्यामुळेच आश्चर्यचकित होऊन यशोदाबाई म्हणाल्या. मात्र ही पोरगी बोलायचं म्हणूनच कांही तरी बोलते आहे, तिला आपला प्रश्न मुळीच कळलेला नाही अशी त्यांची खरोखरच भावना होती.

" रजनीनाथ हल्ली येत नाहीत तेव्हां त्यांचं माझं पटत नाही की काय, या प्रकारचा तुझा प्रश्न होता की नाही ? "

" अगदीच कांही चूक नाही ! पुढे ? तुझं यावर काय उत्तर आहे ? बेटा खरं असेल ते सांग हं; आतां मोकळेपणाने बोलायला तूं सुरवात केली आहेसच. तेव्हां एखाद्या मैत्रीणीजवळ सांगशील इतकं मला मोकळेपणानें सांगितलं पाहिजेस हं. "

" पण त्यांत सांगण्यासारखं कांहीच नाही. नाही तर मी इतक्या मोकळेपणानें बोललें असतें कां ? "

" मग ते येत कां नाहीत ? "

आईपासून फार वेळ आपल्याला कांहीही लपवितां येणार नाहीं, असे त्या क्षणीं यशोदाबाई ज्या कळकळीने प्रश्न विचारीत होत्या त्यावरून नंदिनीला वाटलें, आणि आईचे पुढले प्रश्न टाळायचे असले तर तिला अर्धसत्य तरी सांगितल्यावांचून गत्यंतर नाहीं असें ठरवून ती म्हणाली, " तुला कांही सांगितलं तर खरं वाटेल आई ? "

" कां नाहीं वाटणार ? आजपर्यंत मी तुझ्याविषयीं कधी अविश्वास दाखवला आहे का ? "

" आजपर्यंत दाखवला नाही हे कबूल. पण मी आतां जें तुला सांगणार आहे तें आहेच अविश्वास दाखवण्यासारखं; आणि त्याला कारणंही तशींच जबर आहेत. तुम्ही मनाशी माझ्याविषयीं कांही आकांक्षा बाळगल्या नसत्या तर तुम्हांला मी सांगणार आहें त्याचं कांहीच वाटलं नसतं. "

" पण काय तें सांगून टाक लवकर. "

" सांगेन; पण एक अट आहे माझी ! मागाहून मला कोणताही प्रश्न विचारायचा नाही. "

तिच्या प्रत्येक शब्दाबरोबर यशोदाबाई खरोखरच बुचकळ्यांत पडत होत्या यांत संशय नाही. पण आपल्या लेकीला आपल्याला इतके बांधून घेतांना किती कष्ट पडत आहेत हेही त्यांना कळत होते. आणि म्हणून तिला ती मागत असलेलें आश्वासन देतांना ते कुठपर्यंत श्रेयस्कर होईल हें त्यांना ठरवितां येत नव्हते; पण आतां तिच्या कलाप्रमाणे वागून तिच्या दुःखाचे कारण काढून घेऊं, आणि मग पुढला विचार करूं असे ठरवून त्या म्हणाल्या, " बरं बाई नाही विचारणार तुला कांही; मग तर सांगशील ?"

" मग ऐकच !" नंदिनी आवंढा गिळून म्हणाली, " माझा आणि रजनीनाथाचा विवाह होईल अशी तुमची सगळ्यांची अटकळ होती, ती या पुढे खोटी ठरणार !"

" म्हणजे ? " यशोदाबाई तत्काळ आश्चर्यचकित होऊन म्हणाल्या, " तूं माझी थट्टा तर करीत नाहींस ? "

" इतक्या महत्त्वाच्या बाबतीत मी तुझी थट्टा करीन असं तुला वाटतं का आई ? " नंदिनी सगळे धैर्य एकवटून रुद्ध कंठाने म्हणाली.

यशोदाबाई मूढ होऊन कांही वेळ स्वतांशीच विचारमग्न होत्या. एखाद्या गरोदर स्त्रीला पुत्रप्राप्ति होणार अशी सगळ्यांची अपेक्षा असावी, आणि ती प्रसूतीनंतर ताबडतोब मृत झाल्याची बातमी कानावर येऊन प्रत्येकालाच कांही वेळ धक्का बसावा, त्यांतलाच तो प्रकार होता यांत संशय नाहीं.

ती वेळच अशी होती की कांही वेळ कोणालाही झालेल्या प्रकाराबद्दल काय बोलावें हेंच सुचूं नये. नंदिनी आणि यशोदाबाई यांचीही तशीच स्थिति झाली. ती संध्याकाळची वेळ असल्याने घरोघरी विजेचा लख्ख प्रकाश पडत होता. जुनीं

मंडळी त्या विद्युतदीपांना बघूनच आपला 'शुभं करोतिचा' मंत्र पोराबाळांना पढवीत होती, आणि कोणी प्रेमळ आयांनी आपल्या मुलांच्या काढलेल्या दृष्टीच्या मीठ मोरीचा वास सगळीकडे दरवळत होता. यशोदाबाईंची नजर दाराबाहेर लागलेली होती; तर नंदिनी पायाच्या आंगठ्याशीं चाळा करीत खालीं मान घालून उभी होती.

कांहीं वेळाने यशोदाबाईंनी एक दीर्घ श्वास सोडला, आणि मग त्या नंदिनीकडे दुःखपूर्ण नजरेने पाहून म्हणाल्या, "झाली ही गोष्ट बरी कां वाईट हे ठरवणं आमच्यापेक्षां तुझ्यावरच अवलंबून आहे. तुझ्याच संमतीनं हा निकाल लागला असला तर मला किंवा मामांना बोलण्याचं कारणच नाहीं; पण माझ्या मनाला ही गोष्ट पटत नाही हें खरं! अजूनही मला वाटतं की त्यानं किंवा तूं मुद्दामच हा धोंडा आपल्या पायावर पाडून घेतला असावा. खरं सांग पाहूं त्यानंच तुला नकार दिला का?"

"नाहीं मीच त्यांना नकार दिला! माझ्यापासून त्यांना सुख होणार नाही असं मला वाटतं."

प्रत्येक शब्द बोलतांना नंदिनीला होत असलेले कष्ट पाहून, यावेळीं तिला कांहींच न विचारणें श्रेयस्कर होईल असा विचार करून यशोदाबाई दाराबाहेर येऊन उभ्या राहिल्या. नंदिनीनेंही आपल्या मनावर नकाराचा कांहीच परिणाम झालेला नाही, उलट आपण केली ती गोष्ट अतिशय आनंदानेच केली आहे हे सगळ्यांना भासविण्यासाठी मग टेबलावरील एक पुस्तक उचलले, आणि वाचण्यास आरंभ केला.

आणि रात्रीं सगळीकडे शांतता पसरल्यानंतर मग मात्र नंदिनीला आपल्या हृदयावर ताबा ठेवणें अशक्य होऊन बसले. आईपासून लपविण्यासारखे एक दुःख आपल्या हृदयांत निर्माण झालेले आहे या गोष्टीची त्यावेळीं तिला इतक्या तीव्रतेनें जाणीव झाली, की कुठेंतरी जाऊन मोकळ्या मनाने रडावें असें तिला सारखें वाटूं लागलें. पण तशी शांत जागाहि आपल्याला या जगांत उरलेली नाहीं हेही तिच्या तीव्रतेनें प्रत्ययास आलें.

सारीं सुखदुःखें एकमेकांना मोकळ्या मनाने सांगतां आली असतीं तर जगांत कोणत्या प्रकारची क्रांति घडून आली असती कोण जाणे? ठराविक सुखदुःखासाठीं ठराविक माणसांची नेमणूक झालेली दिसून येते. या ठराविकाच्या पलीकडे

आणखी कोणाला आपली दुःखें निवेदन करणं अशक्य कोटींतलिच दिसतं. चंद्राचें मन कधी काळी उषेवर जडलं किंवा संध्या रविराजावरच अनुरक्त झाली तर त्यांना या गोष्टी मनांतल्या मनांतच ठेवल्या पाहिजेत. त्यांना चुकून एकमेकांकडे बघतांही येणार नाही. मेघराजाला विद्युल्लतेवर प्रीती करतां येणार नाही, आणि केव्हांही विजेला पृथ्वीकडे धांव घ्यावी लागते....

त्या वेळी नंदिनीच्या डोक्यांत या प्रकारच्या विचारांची गर्दीच उडाली होती. डोक्यांत झंझावाताप्रमाणे थैमान घालणारे विचार एकत्रित करण्याचा तिने कितीही कसून प्रयत्न केला असता तरी तें शक्य झालें असतें की नाही कुणास ठाऊक? पण...

कुठल्या तरी सुखाच्या डोंगरावरून आपण गडगडत खाली जात चाललों आहोंत याबद्दल तिला संशय नव्हता. पण आपण कुठून खाली चाललों आहोत हे मात्र तिने कोणालाच सांगितले नसतें, आणि हेच लपवून ठेवण्याची अतिसीमा तिनें यशोदाबाईजवळ गांठली होती.

मग तिने मुक्यानेंच अश्रुसिंचन केले, आणि पुष्कळ दिवसांनी पोटभर जेवल्याचे समाधान लाभल्यानंतर एखाद्याने मरणापूर्वीची निरवानिरव करावी, त्या प्रमाणें एक एक गोष्टीचा विचार करायला सुरवात केली.

रजनीनाथाला शेवटचं पत्र लिहायचं...

सूर्यकांताला उघड उघड मामांजवळ मागणी घालायला सांगायचं...

दोन्ही गोष्टीबद्दल आपल्याला सारखेच दुःख होत आहे हे ताबडतोब तिच्या प्रत्ययास आले.

सर्वसंग परित्याग करायला निघालेल्या माणसालाही आपल्या सारखेच दुःख होत असले पाहिजे असे तिला वाटल्यावांचून राहिले नाही. तिच्या मनांत विचार आला...त्यागांत सुख आहे असं ज्ञाते सांगतात...

पण ज्ञात्यांनी याचा अनुभव कधी घेतलाय् काय ?...

हे अनुभवावांचूनचे कोरडेच बोल वाटतात...

जे शल्य पुढे जन्मभर बोचत रहायचं त्यांत कसलं आलं आहे सुख ?...

मोठमोठ्या तपस्व्यांनाही न सुटलेलें तें कोडें ती किती तरी वेळ सोडवीत बसली होती. पण त्यागांत सुख आहे ही कल्पनाच तिला रुचेना.

आणि नंतर तिने रजनीनाथाला जें पत्र लिहायला घेतलें त्यांत आपल्या हृदयांतील सारें रक्त ओतून ती लिहीत होती....

प्रिय रजनीनाथ—

मला माहित आहे तुम्ही इतक्या दिवसांत कां आला नाहीं तें. त्या दिवशी मी तुमच्याशीं अगदीं निष्ठुरपणानें बोललें नाही ? पण मी तरी काय करूं हो ! माझ्या परिस्थितींत तुम्ही असतांत तर तुम्हीही तेंच केलं असतं हो. तुमचं माझं हृदय इतकं एकरूप झालेलं आहे कीं मी हें न सांगतांही तुम्हाला समजलं असेल. पण मला तुमच्याजवळ हृदय मोकळं केल्याशिवाय रहावतच नसल्यामुळें हें पत्र लिहीत आहें. एकदां तुम्हांला लाथाडल्यावर उत्तर पाठवा असं लिहायला मला तोंडच नाहीं.

मनाची भाषा बोलून किंवा लिहून दाखवितां येत नाही असं म्हणतात. मला त्याचा प्रत्यय आतां येत आहे. तुमच्या सहवासांत आयुष्य घालविण्याची मला किती ओढ लागली होती हे वर्णन करतां येत नाही. पण निष्ठुर दैव आपल्या मनोराज्यावर बोळा फिरवील अशी मला कल्पनाच नव्हती.

तसं पाहिलं तर या यातना अनुभवतांना केवळ दैवालाच कां दोष द्यावा हें ठरविणं कठीण काम आहे. कारण जाणतां न जाणतां केलेल्या अपराधाचं माप कोणाच्या पदरांत घालायचं असेल तर तें माझ्याच पदरांत घ्यावं लागेल. हृदय मोकळं करण्याकरितांच हें पत्र लिहायला घेतलं असल्यानें प्रत्येक गोष्ट कबूल करायला हवीच.

तुम्ही मला तुमचं शूटिंग बघायला बोलावलं होतं तो दिवस आठवतोय् तुम्हाला ? त्या पूर्वीच्या आठ दहा दिवसांतली हकिकत आहे ही...

प्रत्येक गोष्ट घडली तशी लिहावी असा नंदिनीचा कितीही मनोदय असला तरी ती गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही हें तिच्या प्रत्ययास येऊं लागलें. एक एक शब्द लिहितांना नंदिनीच्या नजरेसमोर त्या सगळ्या गोष्टी नुकत्याच घडल्या आहेत इतक्या ताजेपणानें वावरत होत्या, आणि मग तिला हुंदके अनावर होऊन कांहीं वेळ थांबल्यावांचून पुढें जातांच येत नव्हतें. तरी पण कोणतांही आडपडदा न ठेवतां

तिनें सगळी हकिकत त्या पत्रांत लिहिली आणि मग तिला रजनीनाथाच्या विरहाची जाणीव होत असली तरी, पण त्याच्यापासून आपण कोणतीही गोष्ट लपवून तरी ठेवली नाहीं या समाधानाचा लाभ झाला. पत्र संपवितांना तिनें लिहीलें होते.

आतां तुमचा शेवटचा निरोप घेण्याचं काम बाकी राहिलं आहे. त्या पूर्वी एकच विचारावसं वाटतं. उद्यां माझं सूर्यकांताबरोबर लग्न झालं तर तुम्ही तरी मला दोष देणार नाही ना ? जग मला वेड्याच्या मालिकेत बसवील ही गोष्ट स्पष्ट आहे. पण सगळी परिस्थिति लक्षांत घेतां सूर्यकांताच्या राक्षसी इच्छेला बळी पडल्याशिवाय मला तरणोपाय होता का ? त्याचं म्हणणं मी धैर्यानं नाकारलं असतं तर त्यानं आपल्याला सुखाचा संसार करूं दिला असता का ? माझी खात्री आहे त्यानं चार लोकांत व्यभिचारी पत्नीचा पती म्हणून तुम्हाला हिणवायला कमी केलं नसतं.

असो. एकमेकांच्या सहवासाचं सुख या जन्मी आपल्या दैवांत नव्हतं असं म्हणून आपल्याला पुढले दिवस कंठायला पाहिजेत.

आतां या जन्मी मला कायमची विसरा हं. आणि हे पहा आपल्या आयुष्यांत एक सुखाचा काळ केव्हां तरी येऊन गेला असं न समजतां कोणातरी योग्य मुलीबरोबर लग्न करून आनंदानं आयुष्य घालवा बरं. मी पुढल्या आयुष्यांत तुम्हाला शक्य तो न भेटण्याचा प्रयत्न करीन. पण तो प्रयत्न फसला तर मात्र ......

पण आतां मला पुढें लिहितांच येत नाही.

आणि पत्र संपविल्यानंतर मग तिने आपल्या अश्रूंना पूर्ण मोकळीक दिली. मोकळेपणानें रडण्याची ही शेवटचीच आहे संधि असे कां कोण जाणे तिच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाही.

रजनीनाथ आपल्याला भेटला नाही तरी त्यानें आपल्या टपालाची कांही तरी व्यवस्था केलीच असेल या कल्पनेनें तिनें दुसऱ्या दिवशीच तें पत्र त्याच्या माहित असलेल्या पत्त्यावर रवाना केलें.

---

## —११—

ज्या दिवशीं रात्रीच्या प्रशांत वेळीं नंदिनी रजनीनाथाला पत्र लिहीत होती, त्याच दिवशीं आणि त्याच वेळी रजनीनाथालाही तिला एक तरी पत्र लिहिण्याचा मोह अनावर होऊन, तो शेवटचेंच म्हणून एक पत्र लिहायला बसला होता. आणि ती शेवटची प्रणयपत्रिका लिहायला बसण्यापूर्वी त्याच्या सगळ्या कोमल भावना उचंबळून यायला कारणही तसेंच घडले होते.

रात्रीचीं जेवणें उरकतांच सदानंद त्याला म्हणाला, "फिरायला यायचंय् का आज?"

"जाऊं की!" घरांत बसून चैन पडत नसल्याने रजनीनाथही ताबडतोब कबूल होऊन म्हणाला.

"आणि मृणाललाही घेऊं बरोबर."

"अवश्य!"

थोड्याच वेळांत तीं तिघेंही युरोपियन क्लबाच्या बाजूलाच असलेल्या एका पुष्करणीच्या कांठीं येऊन पोंचलीं. त्या ठिकाणची कोणाही रसिकाच्या मनाला मुग्ध करणारी शांतता, क्लबाच्या इमारतीमधून येणारा दिव्यांचा नीलवर्ण प्रकाश, आजूबाजूच्या सृष्टीचें अस्तित्व विसरून जाऊन सदस्यांच्या हास्याचा येणारा मोकळा आवाज, दुःखी मनाला रिझविणाऱ्या नादमधुर संगीताच्या लहरी, आणि वायूच्या नाजूक हेलकाव्यामुळें जलाशयावर झालेला गोड आघात, वरती नीलाकाशांत

ओसंडणारें रजनीचें सौंदर्य, या सगळ्यांनीं वातावरणांत प्रसन्नता निर्माण करण्याचा जणूं विडाच उचललेला दिसत होता. नंदिनीबरोबर आपण या ठिकाणी आलें असतों तर या आनंदाचा भरपूर वांटा दोघांनाही उपभोगतां आला असता, अशी कल्पना त्याच्या मनांत आल्यावांचून राहिली नाही. क्लबांतून येणाऱ्या संगीताच्या लहरींनीं तर त्याच्या मनाला इतकी जबरदस्त मोहिनी घातली कीं नंदिनीच्या सहवासाचें सौख्य आपल्या नशींबी नसलें तरी तिला प्रेमानें ओथंबलेलें एक पत्र लिहून आपलें हृदय मोकळें करावेंच असें त्याला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आणि मग घरी जातांच तिला पत्र लिहायचेंच असा त्याने त्या वेळी निश्चयच केला.

आणि त्या निश्चयाला बळकटी आणणारा एक करुण प्रसंग त्याच वेळीं घडून आला. पुष्करिणीच्या कांठी फिरायला आलेल्या लोकांची गर्दी फार नव्हती. त्यामुळें जलाशयाच्या पृष्ठभागावर झालेला लहानसाही आघात कोणालाही ऐकूं येत होता. रजनीनाथ, सदानंद आणि मृणालिनी सृष्टीच्या स्वरूपाकडे अनिमिष नेत्रांनी बघत असतां पाण्यांत धबकन् कांहीं तरी पडल्याचा आवाज ऐकूं आला, आणि त्याच्या पाठोपाठ दोन तीन तरुण मुलींनी मारलेल्या किंकाळ्या त्यांच्या कानावर येऊन आदळल्या. बाजूच्या रस्त्यावर माणसांची रहदारी बरीच तुरळक असली तरी जाणारीं येणारीं माणसें त्या ठिकाणी धांवून आल्यावांचून राहिली नाहीत.

त्या मुलीच्या किंकाळ्या कसल्या असाव्यात हे रजनीनाथाने केवळ अंदाजानेच ताडलें, आणि त्याचवेळीं कोणीतरी मुलगी पुष्करिणीत पडलेली दिसली.

नक्की आवाज कोणत्या दिशेनें आला हें कोणालाच माहित नव्हतें. पण विचार करीत बसावयाची ही वेळ नव्हे असा विचार करून रजनीनाथानें ताबडतोब कपडे उतरून पाण्यांत उडी मारली. पाण्याचा पुन्हां आवाज झाला. रजनीनाथ पाणी कापत असल्याचे ऐकूं येऊं लागलें. पण आंतील परिस्थितीची कल्पना देण्याइतका प्रकाश त्या ठिकाणी नसल्यानें, सदानंद आणि मृणालिनी हतबुद्ध झाली होती. आजूबाजूला जमलेले चार लोक आपापसांतच कांहींतरी कुजबुजत होते आणि त्या मुलींचा आक्रोश एकसारखा चालूंच होता. आपणही उडी मारायला पाहिजे होती असें सदानंदाच्या किती तरी वेळां मनांत येऊन गेलें. पण त्याच वेळी आपला हात मृणालनें धरलेला आहे हेंही तितक्याच तीव्रतेनें त्याच्या प्रत्ययास आलें.

आपण करीत आहोंत ही गोष्ट चांगली की, वाईट हें अधिक स्पष्टपणें ठरविण्याच्या मनःस्थितींत तो नव्हता. तोंच रजनीनाथानें जवळच मारलेली हांक त्याच्या कानीं आली, आणि तो त्या आवाजाच्या अनुरोधाने कांठाजवळ गेला.

रजनीनाथ एका तरुण मुलीला बेशुद्ध स्थितीत उचलून किनाऱ्यावर आला होता.

सदानंदाने ताबडतोब एक टॅक्सी आणली, आणि आजूबाजूला कोठेंही पोलिस न दिसल्यानें समाधानाचा सुस्कारा सोडून त्या मुलीसहीत त्या ठिकाणचा निरोप घेतला.

बरोबरच्या दुसऱ्या मुलींजवळून माहिती काढून त्यांनी सांगितलेल्या मार्गाकडे गाडी नेली.

आणि विस्मयाची गोष्ट अशी कीं आपण ज्या मुलीला वांचविलें ती अरविंद-बाबूंची मुलगी आहे असें थोड्याच वेळांत रजनीनाथाला कळून चुकले.

अर्थात् ती वेळच अशी होती कीं बेशुद्ध असलेल्या त्या मुलीवर कांहीं तरी उपचार करणे जरूरीचे होतें; आणि त्याप्रमाणें बाबूजीही आपल्याकडून कसून उपचार करीत होते. पण त्या बरोबरच ज्या तरुणाला आपण मुंबईहून एवढ्या हौशीनें आणलें तोच या वेळीं आपल्या मुलीचे प्राण वांचविणारा ठरावा या योगा-योगाचे त्यांना आश्चर्य वाटल्यावांचून राहिले नाही; आणि एकीकडे मुलीवर उपचार चालले असतांना दुसरीकडे रजनीनाथाविषयीं उत्पन्न झालेली कृतज्ञता व्यक्त केल्यावांचून त्यांना राहवले नाही.

मुलगी शुद्धीवर येतांच त्यांनीं तिला शांतपणें पडूं देण्याची व्यवस्था केली, आणि मग ते रजनीनाथाजवळ बैठक मारून म्हणाले, " जणूं कांही माझ्या मुलीला वांच-विण्यासाठींच तुम्ही मुंबईहून इथें आलांत असं कोणालाही वाटेल. "

" त्यापेक्षां मी असं कां म्हणूं नये की रात्री झोप लागायला कांही तरी व्यायाम घेण्याची जरूरी होती तेवढ्यासाठीच मला ही संधि मिळाली. "

" असं कसं मी म्हणूं देईन तुम्हांला ? " बाबूजी त्याला अडविल्यासारखें करून म्हणाले, " माझं पूर्वसंचित जबर म्हणून तुम्ही त्यावेळीं तिथं होता ! "

" हा तुम्ही मला विनाकारण मोठेपणा देत आहांत. "

दोघांचें संभाषण आणखीही कांहीं वेळ चालले होते, पण त्या मुलीने पाण्यांत उडी कां टाकली अशी उत्सुकता असूनही रजनीनाथानें चौकशी केली नाही, आणि

मग त्याच्या या चातुर्याबद्दल बाबूजींना त्याच्या विषयीं अधिकच आदरभाव वाढूं लागला; नव्हे यांत त्याची उदार दृष्टीच प्रगट झाली आहे असे त्यांना वाटल्यावांचून राहिलें नाही.

" येत जा मधून मधून ! " रजनीनाथ व सदानंद जाण्यासाठीं उठलें तेव्हां बाबूजी म्हणाले.

" येईन कीं ! " असें म्हणून रजनीनाथ बाहेर पडला.

" बाकी तुम्ही होतां म्हणूनच त्या मुलींचे प्राण वांचले बरं कां !" कांही अंतर चालून गेल्यावर सदानंद म्हणाला; " सामान्य बंगाली माणसाकडून हें काम झालं नसतं. "

" असं कसं म्हणतां येईल आपल्याला ? बंगाली युवयुवतींच्या शौर्याची किती तरी वर्णनं आपण प्रत्यही वर्तमानपत्रांतून वाचतों; त्यावरुन मला तरी तसं वाटत नाही. "

" चुकतां तुम्ही इथं ! शौर्य दाखविणारी माणसं मूठभरच आहेत म्हणाना. आपल्या बाजूसारखी तडफ लोकांमध्ये असती तर काळ्या गोऱ्यांचा भेद आपण पहातों इतक्या प्रखर स्वरूपांत आपल्याला इथं दिसला नसता. आपल्या प्रांतांत पाहिलं तर आपल्या बुद्धिमत्तेची चहा होत असते, आणि आपल्याला पुष्कळ वेळ बरोबरीच्या दर्जानं वागविण्यांतही येतं. "

बंगाली लोकांच्या आळशीपणावर, त्यांच्या पान चघळण्याच्या गलिच्छ संवयीवर, आणि त्यांच्या शेळपटपणावर बोलण्याची सदानंदाला हौसच आहे असें रजनीनाथाच्या इतक्यांतच प्रत्ययास आले होते. आणि मार्मिक अवलोकन करूनच तो बोलत असल्यानें त्या बद्दल रजनीनाथाला कौतुकच वाटत होते. पण त्याच्या बोलण्यानें त्याने आतांपर्यंत बंगाली तरुणांच्या शौर्याविषयीं ज्या भावना आपल्या हृदयांत जोपासल्या होत्या त्यांना जबर धक्का बसत असल्याने, आपण स्वतांच आपले मत तयार करावें असे त्याने ठरविलें होते. त्यामुळे मग त्याने सदानंदाच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं, मानसशास्त्राच्या नियमाप्रमाणे थोड्याच वेळापूर्वी घडलेल्या त्या हकीकतीचा त्याच्या मनावर जबर परिणाम झाला होता, आणि त्या संबंधींच मनाला उलट सुलट प्रश्न विचारून त्यांची उत्तरें देणेंच त्याला यावेळीं अधिक

आवडत होतें. आजूबाजूला झालेल्या गडबडीवरून आणि शुद्धीवर आल्यानंतर त्या तरुणीच्या मुद्रेवर दिसलेल्या कारुण्याच्या छटेवरून, तिनें कोणत्या तरी दुःखाचा अतिरेक झाल्यामुळेच आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला असावा असें न कळत त्याच्या मनांत आलें, आणि मग घरी होणारा छळ, प्रणयभंग, किंवा असेच एखादें कारण घडले असावे असें त्याला सारखें वाटूं लागलें. आणि प्रणयभंगामुळेच तिनें आत्महत्त्येचा प्रयत्न केला असावा ही कल्पना तर त्याच्या मनांत इतक्या जलदीनें घोळूं लागली कीं, मग दुसरे कोणतेही कारण तो विचारांत घेण्यास तयार होईना.

प्रणयभंगाच्या यातना तो स्वतःच अनुभवत असल्यानें त्या दुःखाची तीव्रता किती आहे हे आकलन करण्यास त्याला मुळीच वेळ लागला नाही. आणि मग त्याला वाटले नंदिनीने स्वखुषीनें नकार दिलेला नसला तर तिलाही हें दुःख जाणवल्यावांचून राहणार नाही...

तीही मग असला वेडेपणाचा मार्ग धरणार नाहीं ना...

आपण तिचं समाधान करायलाही तिला भेटलो नाहीं...

तिनं आत्महत्त्या केली आणि तिला वांचवायला कोणी नसला तर...

त्या कल्पनेने त्याच्या अंगावर शहारे आल्यावांचून राहिले नाहीत, आणि मग तिला पत्र लिहून आपले हृदय तिच्याजवळ मोकळे करावे, तिच्या नकाराचें कारण तिला विचारून त्यावर उपाययोजना करावी, आणि अजूनही शक्य असल्यास तिच्यासह विवाहबद्ध होऊन पुन्हां कलकत्त्याला यावे...या प्रकारच्या विचारांत तो गर्क होता.

'बिजली' नांवाच्या चित्रपटगृहाजवळ आल्यानंतर कुठें सदानंदाच्या लक्षांत आलें की रजनीनाथ आपल्या बोलण्याकडे लक्ष देत नसून स्वतःच्याच विचारांत गर्क आहे. आणि मग त्याला त्याची ती समाधि पाहून थट्टा करण्याचा मोह अनावर झाला. कांही वेळ त्याने रजनीनाथाच्या चेहऱ्याकडे मिस्किल नजरेनें पाहिले आणि मग तो म्हणाला, "तुमच्या मनावर आतांच्या हकीकतीचा बराच परिणाम झालेला दिसतो."

तो आपली थट्टा करीत असेल अशी रजनीनाथाला यत्किंचित्‌ही कल्पना नसल्यानें त्याने दचकून सदानंदाला प्रश्न केला, "काय म्हणालांत तुम्ही?"

"विशेष कांहीं नाहीं; म्हटलं तुमच्या मनावर आतांच्या हकिकतीचा बराच परिणाम झालेला दिसतो."

" कां नाही होणार ? " रजनीनाथ आवेशाने म्हणाला, " मला नाहीं वाटत कीं त्या तरुण मुलीनं सुखासुखी जीव द्यायचा प्रयत्न केला असेल ? "

" पण का हो राजेश्री, तिनं जीव दिला असं आपण कशावरून म्हणतां ? "

" तिची मुद्राच सांगत होती ! "

" अरे वा ! तुम्ही इतक्यांत अवलोकनही बरेच केलेलं दिसतं."

" पण माझा तर्क खोटा आहे असं तर तुमचं म्हणणं नाहीं ना ? "

" छे, छे ! उलट त्याबद्दल मी आपली तारीफच करतो "

" तुम्ही कशावरून म्हणतां कीं माझा तर्क बरोबर आहे म्हणून ? "

" आजूबाजूला चाललेल्या संभाषणावरून ! "

आणि मग ते दोघेही आपापल्या विचारांत गर्क झाले.

घरी जाऊन एकांत मिळतांच रजनीनाथ नंदिनीला पत्र लिहायला बसला.

त्यानें लिहिलें होते...

...नंदिनी तुला वाटलं असेल की मी तुझा निरोप न घेतां निघालों तेव्हां तुझ्या नकारामुळें मला राग आला असावा; पण तसं कांहीं नाही बरं ! विवाहाचा प्रश्नच असा आहे की ज्यानं त्यानं स्वतःच आपल्याला कोणापासून सुख होईल याचा विचार केला पाहिजे. मला तुझ्या सहवासात खरोखरच आनंद झाला असता.

तुझ्यावर माझं अस्तित्व लादावं अशी माझी मुळीच इच्छा नाही. पण राहून राहून शंका येते ती एकाच गोष्टीची की तूं दिलेला नकार मनापासूनचा होता का? तुला माझ्या प्रश्नाचा राग येणार नाही अशी आशा आहे.

नंदिनी मला असं प्रामाणिकपणानें वाटतं की या वेळी तूं माझ्याजवळ हृदय मोकळं केलं नाहीस. माझी निराशा झाली म्हणून नव्हे तर तुझं कल्याण व्हावं, तुला पुढील आयुष्य सुखानं घालवितां यावं म्हणून विचारतो कीं, तुला नकार द्यायला कोणतं कारण झालं तें मला कळव. तुझ्याशी विवाहबद्ध व्हायाला मिळालं असतं तर त्यांत मला आनंदच होता. पण माझी इच्छा पूर्ण झाली नाही तरी चालेल, पण एकदांच तुझ्या हृदयाची मला कल्पना येऊं दे. तुला कोणत्याही प्रकारें मला मदत करतां आली तरी आतांपर्यंत तुझ्यावर प्रेम केल्याचं सार्थक होईल.

मुंबई शहर सोडतांना मला किती दुःख झालं म्हणून सांगूं? निदान निघण्या-पूर्वी मला माझं हृदय तुझ्याजवळ मोकळं करतां आलं असतं तर मनाला इतक्या यातना झाल्या नसत्या. तुला भेटायला यावं असं किती तरी वेळ वाटलं. पण प्रत्येक वेळी तुला ते आवडलं नाही तर त्यापासून माझ्या मनाला दुःखच अधिक होईल असं वाटल्यामुळे मी तुझी भेट घेण्याचं टाळलं.

माझ्या यशाचा वांटा या जगांत मला तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही पदरांत टाकतां येणार नाही याची मला पूर्ण जाणीव झाली आहे, पण यापुढे हे यश आणि त्याचा हव्यास नको असं सारखं वाटतं.

माझ्या अनपेक्षित नाहीशा होण्यामुळे दिनकरमामासारख्या प्रेमळ सुहृदाचा निरोपही घेतां आला नाही. त्यांचा कांही गैरसमज झाला असला तर तूं तो नाहीसा करण्याचा प्रयत्न करशील अशी आशा आहे.

या प्रांताविषयीं लिहिण्यासारखं पुष्कळच आहे. पण यावेळीं सगळीं वर्णनं करण्याच्या मनःस्थितींत मी नसल्याने या पत्रांत कांहींच लिहीत नाही.

या पत्रांत विचारायचं एकच राहिलं. आणि ते केवळ तुझ्या नकारामुळेच मनांत येतं. माझ्या हातून तुझा एखादा अपराध तर घडला नाही ना? तूं इच्छेविरुद्ध माझ्या प्रेमाचा स्वीकार करावास असं मी केव्हांही म्हणणार नाहीं. पण कळत नकळत एखादा अपराध घडला असला तर त्याची क्षमा कर असं म्हटल्यावांचून राहवत नाही.

या पत्राचं उत्तर पाठवच असं मी कसं म्हणूं? पण तुझा हितचिंतक स्नेही म्हणून उत्तर पाठविलंस तर मी स्वतांला भाग्यवानच समजेन.

मात्र तुझ्यावर एखाद संकटच आलं तर पत्र लिहायला पुढे मागें पाहूं नकोस.

तुझ्याशीं स्नेह ठेवण्याची परवानगी दिलीस तर त्यांतच मी आनंद मानून आयुष्य कंठण्याचा प्रयत्न करीन.

या जन्मी मी तुला केव्हांही विसरणं शक्य नाही, मुंबई सोडल्यापासून प्रत्येक क्षणाला तुझी आठवण होत असते.

नंदिनी लिहिणं योग्य नाहीं पण तुझ्यावांचून मी रात्रीच्या रात्रीं तळमळत काढतो असं लिहीलं तर तुला राग येणार नाहीं ना?

दिवस कसा तरी पार पडतो पण रात्री जीवाला मुळींच उसंत नसते. कांहीं वेळा बिछान्यावर नुसताच पडलेला असतो, आणि मग कांहीं वेळ दिवा पेटवून माझ्याप्रमाणेंच तोही कसा जळतो हें पहात बसतो.

आतां अधिक लिहित नाहीं.

दिनकरमामांना माझा नमस्कार सांग...

पत्र लिहून रजनीनाथाने ते तावडतोब पाकीटांत घालून त्यावर पत्ताही लिहीला. पण मग त्यालाच वाटले कीं आपल्या पत्राने नंदिनीला आपला पत्ता कळविण्यापेक्षां तें न टाकतांच केवळ हृदय मोकळें केल्याचाच आनंद मानावा. आणि मग त्यानें तें रवाना न करण्याच्या उद्देशानें तसेंच ठेवून दिले

नंदिनीच्या आयुष्यांत या पुढें पुन्हां प्रवेश न करणेंच योग्य असाच त्याच्या मनाने त्याला निर्वाळा दिला.

---

## -१२-

त्यानंतर लवकरच नंदिनीने सूर्यकांताकडे जाऊन लग्नाचे नक्की करण्याचें ठरविलें. या लग्नापासून आपल्याला काडीचेंही सुख लाभणार नाहीं हे तिच्या वारंवार मनांत येत होते; पण त्या बरोबरच आपल्याला अनिच्छया लादलेले कलंकित आयुष्य घेऊन रजनीनाथाच्या आयुष्यांतून दूर होता येत आहे, यांतच समाधान मानून घ्यायला ती आपल्या मनाला तयार करीत होती. रजनीनाथाला आपण मुद्दाम हृदय मोकळं करण्याकरितां म्हणून लिहिलेलें पत्र न मिळतां मालक मिळत नाही असा शेरा घेऊन परत आलें याच गोष्टीचे तिला वाईट वाटत होते. आणि मग राहून राहून तिच्या मनांत येई की त्या वेड्या जीवानें निराश होऊन आत्महत्या तर केली नाही ना ?...

आपल्यामुळें एक जीव या जगाला कायमचाच मुकला कीं काय ?...

मरतांना आपण जवळ नाही या बद्दल त्याला किती दुःख झालं असेल...

पण आत्महत्त्या करण्याइतका रजनीनाथ दुबळ्या मनाचा नाहीं...

मग तो आपल्याला पत्ता न लागण्याइतका लांब कुठें बरं गेला असावा ?...

तिला त्याच्याविषयीं कोणतीच कल्पना आपल्या मनाशीं कायम करतां येईना. मग ती भक्ति भावानें हात जोडून परमेश्वराची प्रार्थना करी कीं पृथ्वीच्या पाठीवर

तो कुठेंही असला तरी त्याला सुखी ठेव; आणि कधीकाळी माझी कहाणी त्याच्या कानावर गेली तर त्याच्या मनांत तरी माझ्याविषयी गैरसमज होऊं देऊं नकोस.

रात्री निजतांना तिच्या मनांत आणखी एक कल्पना येऊन गेली कीं त्याला लिहिलेलं एक पत्र पोस्टाकडून परत आलं, तरी आणखी एक पत्र त्याच्या नांवानं लिहून ठेवावं आणि सूर्यकांताशी विवाहबद्ध होऊन जिवंतपणीच या आयुष्याचा शेवट करण्यापूर्वी त्याचा निरोप घेऊन ठेवावा. तो भेटण्यापूर्वीच आपल्याला मृत्यु आला तर कोणी तरी आपल्यासाठी तें त्याच्या हातीं देण्याची व्यवस्था करील.

आणि मग त्या विचाराप्रमाणें ती शेवटले पत्र लिहायला बसली. तिने लिहीलें होते...

...रजनीनाथ मी केवळ दैवयोगाने निराळ्याच पुरुषाशी विवाह बद्ध होत असलें तरी शेवटपर्यंत मनानें मी तुमची होते हे लक्षांत ठेवा बरं. कधीं चुकूनही माझ्या हृदयांत तुमच्यावांचून कोणालाही जागा दिली नाही. केवळ या जगानं माझ्यामुळे तुमचा पाणउतारा करू नये म्हणूनच मी या मार्गाचा अवलंब केला आहे.

माझं हे लग्न म्हणजे जाणून बुजून मृत्यूला मारलेली मिठी आहे; आणि म्हणून तर हे पत्र तुम्हांला मिळेल की नाही याची शंका असतांना केवळ तुमचा शेवटचा निरोप घेण्यासाठी लिहीत बसले आहे.

आपल्या शेवटच्या या भेटीला वेळ तरी किती निवांत मिळाली आहे. माझ्या खिडकीतून या वेळी पृथ्वीवर ओसंडलेलं चांदण स्पष्ट दिसत आहे. चंद्राबरोबर अगणित चांदण्यांचा मनोहर विलास माझ्या मनाला मोहिनी घालीत आहे. ते पहा त्या पलीकडल्या टुमदार इमारतीवर, जवळच्याच झाडावर, समोरच्या चाळीत आपल्याला पहायला कोणी नाही अशी खात्री असल्यामुळेच की काय रिकाम्या असलेल्या ओटीवर चंद्रकिरणांनी आपल्यासाठी प्रवेश केला आहे. दुपारच्या वेळीं त्या ओटीवर किती तरी गोजिरवाणी मुलं खेळत असतात. चंद्रकिरणांचा चाललेला हा खेळ अगदी त्या मुलांसारखा आहे बरं का. तुम्ही माझ्याजवळ असतां तर सृष्टीवर चाललेला हा विलास पाहून तुम्हांलाही आनंद झाला असता. जगांत जिकडे तिकडे शांतता पसरल्यानंतर हा रमणीय विलास चालू व्हावा ही कौतुक करण्या-सारखी गोष्ट नाहीं का? मला तर वाटतं की या जगाच्या पातकी डोळ्यांची दृष्ट लागूं नये म्हणूनच ही बालकं या वेळी खेळायला खाली उतरली असावींत. पण

तुम्हांला नी मला मात्र हा खेळ बघायला मुळीच प्रतिबंध नाही बरं का. कोणाही विशुद्ध प्रेमिकांनी याच वेळी एकमेकांच्या गांठीभेटी घ्याव्यात असाच निसर्ग हेतु दिसतो.

तुमची ही शेवटची भेट मी याच शुचिर्भूत वेळी घेतली होती हे जिवांत जीव असेंपर्यंत लक्षांत ठेवा हं. शेवटच्या भेटींत कोण कोणाला कसल्या गोष्टी नजर करतं. माझी गरीबाची तुम्हांला हीच नजर.

माझी आठवण ठेवाल ना ?......

पण मग तिला शेवटच्या भेटीसाठी ती रात्र तळमळत काढावी लागली नाहीं. त्या चांदण्याकडे पहातां पहातां तिच्यामध्येच अशी कांही दैवी शक्ति निर्माण झाली की ती पाण्यांत पडल्यासारखे आपले दोन्ही हात हालवीत वर हवेंत तरंगू लागली, आणि तिच्याप्रमाणेच तिचा रजनीनाथही हवेमध्येंच तरंगत तिच्या भेटीसाठी आला. दोघंही मग सगळ्या सृष्टीवर संचार करूं लागली. एकमेकांशी कांही बोलावं असें त्यांना मुळीच वाटले नाही. एकमेकांच्या हृदयांतील प्रीती तीं आपल्या नजरेनेच व्यक्त करीत होती.

आणि मग मनसोक्त विहार केल्यावर आपली शक्ति नष्ट झाल्याचे तिच्या एकाएकीं प्रत्ययास येऊं लागले, आणि तिचा रजनीनाथही तिला दिसेनासा झाला. त्यानें आणखी कांही वेळ थांबावें अशी तिची भारी इच्छा होती.

त्या सुखदु:खकारक स्वप्नाच्या शिरशिरीतच नंदिनी जागी झाली. तिनें बाहेर नजर टाकली तों कोंवळ्या सूर्यकिरणांनी रात्री पाहिलेल्या चंद्रकिरणांची जागा घेतली होती. जगांतसुद्धां असंच नाही कां घडत ? तिच्या मनांत प्रश्न आला. पण आपण इतका वेळ निजून राहिलों हें चांगलं झालं नाहीं असें स्वत:लाच पढवीत ती उठण्याचा प्रयत्न करूं लागली. आणि त्याच वेळी आपल्याला आज उठायला मुळींच उत्साह वाटत नाही असे तिच्या प्रत्ययास आलें. पोटांत कसली तरी मळमळ चालल्याचा तिला भास झाला, आणि मग पडल्या पडल्याच हे असें कां व्हावें याचा ती स्वतांशीच विचार करूं लागली. पण रात्रीं घडलेल्या जाग्रणामुळें हा त्रास होत असावा असा विचार तिच्या मनांत येतो न येतो तोंच अलीकडे झोंप तर आपल्याला रोजच लागत नाही हें तिला आठवलें. ती आणखीही या गोष्टीचा

विचार करीत पडून राहिली असती. पण त्याचवेळीं यशोदाबाई " अजून उठायचं नाहीं का ?" असें विचारीत तिच्या बिछान्याजवळ येऊन बसल्या.

" उठत्यें ना आतां !" असे म्हणत तिनेच उलट आईचा हात आपल्या हातांत घेतला आणि मग तिला म्हणाली, " जरा बस ना आई माझ्याजवळ ! पुन्हां तुला कधीं सांगायला येणार नाही मी. "

आपण चुकून भलतीच गोष्ट आईजवळ बोलून गेलों हें तिच्या तावडतोब लक्षांत आले आणि यशोदाबाईही त्या बोलण्याबद्दल एकदम चमकल्या. पण तिच्या मनावर रजनीनाथाच्या नाहींशा होण्यामुळे आघात झालेला आहे त्याचाच हा परिणाम असेल असे वाटून, त्या तिच्या तोंडावरून हात फिरवीत म्हणाल्या, " वेड्यासारखं काय बोलावं असं ? मी तुला नाही म्हणाले असल्ये तर ठीक होतं तुझं म्हणणं. "

" मी सहज बोललें हो आई. तूं माझ्याजवळ असलीस म्हणजे मला भानच राहात नाही. "

" असं होणं चांगलं नाही हो. "

पण आपल्याशीं प्रत्येक शब्द बोलतांना आई आपल्याकडे निरखून पहात आहे असें नंदिनीला वाटल्यावांचून राहिले नाही.

यशोदाबाईंनी अधिक विचारपूस करू नये म्हणून मग ती म्हणाली, " अलीकडे मला बरंच वाटत नाही आई. शिकवण्या तर मी आतां सोडून देणारच पण खरं सांगायचं म्हणजे मला आतां कॉलेजचाही कंटाळा आलाय्. "

" शिकवण्यांबद्दल तुझ्या गळ्यांत कोणी धोंड तर बांधली नाहीं ना ? "

मायलेकींची त्या वेळी न कळत नजरानजर झाली आणि तिच्या डोळ्यांत एकवटलेल्या करुण भावनेवरून ती आपल्याजवळ कांहीं तरी मोकळेपणानें बोलूं शकत नाही ही त्यांची अलीकडे झालेली कल्पना कायम झाली.

आपल्या बोलण्यानें तिला विनाकारण निरुत्साही करूं नये या विचारानें मग त्या तिला म्हणाल्या, " आतांच कोणी परकं माणूस घरांत आलं तर किती आळशी मुलगी आहेस तूं असं तें म्हणाल्याशिवाय राहणार नाही. असं नाहीं बरं शोभत पोरीच्या जातीला. "

" मी उठतेंच आई आतां. पण तुझ्या बोलण्यावर उत्तर म्हणून मी असं म्हणेन.कीं असलं बोलणं नाहीं बाई शोभत स्त्रीच्या जातीला. जी गोष्ट पुरुष किंवा स्त्री दोघांनाही सारखी लावायला पाहिजे ती केवळ स्त्रीलाच शोभत नाहीं असं म्हणणं शुद्ध अन्यायाचं नाहीं का ? आळस हा दुर्गुणच असला तर तो एकट्या पुरुषांच्या बाबतींतच कसा शोभून दिसतो तें मला नाही कळत !"

" हलकें हलके तूं मोठीच पंडिता बनायला लागलीस बरं का ! " असें लाडिक-पणानें म्हणत यशोदाबाई तिथून निघून गेल्या.

पण नंदिनीच्या मुद्रेवर असलेला फिक्कटपणा पाहून त्यांच्या हृदयाला चरका बसल्यावांचून राहिला नाहीं. अगदी न कळत त्यांना एका भयंकर शंकेने ग्रासलें, पण ती खरी ठरल्यास नंदिनीची पुढें काय स्थिति होईल हें त्यांना अजमावतां येईना. असली भयंकर शंका इतर कोणाजवळ बोलतांही येणार नाही हेही ताबडतोब त्यांच्या मनांत आलें, आणि मग त्या विषण्ण मनःस्थितींतच आपले उद्योग हाता-वेगळे करूं लागल्या.

आजचा एकच दिवस आपल्याला आनंदांत घालवायचा आहे या कल्पनेनें पछाडल्यामुळे नंदिनीला कोणत्याच कामांत उत्साह वाटत नव्हता, पण शक्य तों हंसून खेळूनच वेळ घालवावा अशी तिची इच्छा असल्याने ती आपल्याकडून प्रसन्न दिसण्याचा प्रयत्न करीत होती. मुद्रेवर मालिन्य दिसूं नये म्हणून तिनें लवकरच थंड पाण्यानें स्नान उरकले. मनाला प्रसन्नता वाटावी म्हणून शुभ्र पातळ परिधान केलें, आणि यशोदाबाईंनी देवाकारितां म्हणून आणलेल्या पुडीमधून गुलाबाची दोन फुले काढून घेऊन तीं हलकेच केसांत खोवली.

दररोजच्यापेक्षां आजची नंदिनीची केशभूषा आणि वेषभूषा विशेष टापटिपीची झाली असल्याने दिनकरमामा आणि मामी या दोघांनाही बरेंच आश्चर्य वाटलें. दिनकरमामांना तर तिची थट्टा करण्याचा मोह त्यावेळी अनावर झाला, आणि मग ते एकदां संधि साधून तिला म्हणाले, " आज तुझ्यांत बराच फरक दिसतो. कोणीतरी आवडतं माणूस यायचंय् वाटतं ? "

आज मोकळेपणानें बोलणारे मामा उद्यां तसेंच बोलतील की नाहीं अशी त्यावेळी नंदिनीला शंका आल्यावांचून राहिली नाहीं. पण मग ती शंका कदाचित्

सगळ्याविषयींच घ्यावी लागेल असें ठरवून तिनें एकदां गोड हंसून मानेला हिसका देऊन उत्तर दिलें, "माझी गरीबाची काय थट्टा करतां मामा !...तुम्हीं कोणी बाहेरगांवाहून यायचे असतां आणि मग अशी कोणी थट्टा केली असती तर चालण्यासारखं होतं."

"आम्ही तुमचीं आवडतीं माणसं ठरलों मग स्वारस्य तें काय उरलं? मला नाही वाटत प्रत्यक्ष तुझी आई कुठून यायची असती, तर तूं एवढी गोड तयारी केली असतीस."

"मग तुमचं म्हणणं तरी काय हो? मुलीबाळींनीं कधीं टापटिपीनं राहूंच नये वाटतं?"

"असं मी मुळीच म्हणालों नाही. पण तुझी आजची टापटीप जरा जादा वाटली आम्हांला."

"कांही तरीच तुमचं !"

पण मामांशी बोलतांना जें ओढून चंद्रबळ आणावं लागत आहे ते त्यांच्या लक्षांत तर येत नाही, हें समजण्याकरितां ती मामांकडे मुद्दाम टक लावून बघत होती. पण मामांची नजर तिला तसें सांगत नव्हती. त्याबद्दल तिनें एक समाधानाचा सुस्कारा सोडला आणि मग ती उगीचच खिडकीबाहेर पाहूं लागली.

"मग मी सांगतो माझा तर्क !" दिनकरमामा कांही वेळानें म्हणाले, "रजनी-नाथ आज येणार असावा !"

"नाही !" एवढेच नंदिनी कसेबसे म्हणाली, आणि "चला कांही तरी काम केलं पाहिजे !" असे म्हणून तिथून निघाली.

आजच्या दिवसांत आपल्याला कुमुदिनी भेटली तर किती तरी चांगलें होईल असे तिला राहून राहून वाटूं लागलें. आपल्या जिवंत मृत्यूच्यापूर्वी जी कांही माणसं आपल्याला भेटावींत असें तिला वाटत होतें त्यांत कुमुदिनीच्या भेटीचीहि तिला तळमळ लागलेली होती.

मामांना सोडून थोडा वेळ झाल्यानंतर ती आपल्या आईजवळ गेली आणि तिला म्हणाली, "सात आठ दिवसांत मनोहर आले नाहींत खरे ?"

" खरंच कां बरं ते आले नसावेत ! " यशोदाबाईही विचार करीत म्हणाल्या, " का त्यांनाही रजनीनाथाप्रमाणे नाहींसं होण्याची लहर आली ? "

पण ताबडतोब आपण संभाषणाला या प्रकारचें वळण द्यायाला नको होतें असें त्यांच्या मनांत आले, आणि मग त्या नंदिनीला विचार करायलाही अवसर न देतां म्हणाल्या, " नसतील आले कामबिम असलं तर ! "

" कुमुद केव्हां येणार कांही कळलं का ?" आईच्या बोलण्याचा आपल्या मनावर कांहींच परिणाम झाला नाही असे दर्शवीत नंदिनी म्हणाली, " फार दिवस झाले तिला भेटून. केव्हां एकदां मला भेटते ती असं झालंय्. "

" कुमुद इतक्यांत येणार असावी," यशोदाबाई म्हणाल्या; " मनोहर मागल्या वेळेला आले होते तेव्हां त्या बद्दल कांही तरी बोलले होते असं वाटतं ! "

" मग आल्याही असतील बाईसाहेब. पण आली असली तर तिला इकडे येऊन जायला काय झालं होतं कुणास ठाऊक ? "

आणि मग ती आपल्याला भेटली म्हणजे मग आपण तिची खोटेच रागावून कशी गंमत करूं याविषयीं तिने यशोदाबाईजवळ कांही तरी उद्गार काढला, आणि गॅलरीत येऊन रस्त्याकडे पहात उभी राहिली.

बाहेर पहात असतांनाच या जगांत आपणच काय ती दुःखी आहोत, बाकीचं सारं जग आनंदाने आपले रोजचे कार्यक्रम पार पाडीत आहे अशी तिची भावना झाल्यावांचून राहिली नाही. कारण समोर दिसणारी प्रत्येक व्यक्ति आनंदीच असावी असें तिला वाटलें. समोरच्याच चाळीत राहणारी पतीपत्नी त्या वेळीं एकमेकांशीं कांही तरी थट्टा विनोद करीत होती, त्यांच्याजवळ राहणारी एक मुलगी रस्त्यावरून चाललेल्या वेणीवाल्याला बोलावून निरनिराळ्या वेण्या पहाण्यांत दंग झालेली दिसत होती, आणि त्या पलीकडच्या खोलीत कोणीतरी आवडते पाहुणे आल्यामुळें सगळ्यांचे चेहरे प्रफुल्लित दिसत होते. रस्त्यावर नजर टाकली तर तिथेंही तिला आनंदाचे मूर्तिमंत साम्राज्य पसरलेलें दिसत होते. दोन विरुद्ध बाजूनें आलेले तरुण एकमेकांना बघतांच हंसत थांबले; त्यांनी हंसत हंसतच हस्तांदोलन केलें, आणि कांही वेळ बोलणें झाल्यावर त्यांनी निरोप घेतला तो अशा थाटानें कीं, दोघांनाही सारखीच आनंद देणारी बातमी त्यांच्या कानावर आली असावी.

समोरच्या गच्चीवर तिनें नजर टाकली तर तिथेही तिला तोच आनंद भरलेला दिसला. मनसोक्त खायाला आणि उंच उडायला मिळाल्यामुळे पांखरांचा किलबिलाट चालला होता. जवळच कोणाचा तरी पोपट ' या बसा ' म्हणून नाचत ओरडत होता, आणि खालच्या बाजूला रस्त्यावर कांहीं कुत्रीं जमली होती तीही एकमेकांजवळ अंगाला अंग घासून बागडत होतीं.

दुपारपर्यंतचा वेळ नंदिनीने याच प्रकारें स्वतःला रिझविण्यांत घालविला, आणि त्यानंतर तिची पूर्ण खात्री झाली की या जगांत आपल्याला आनंदाचा लाभ होणें खरोखरच कठीण आहे. मग तिने अगदी नाइलाजाने आज दुपारी सूर्यकांताची भेट होईल तेव्हां त्याच्याशीं बोलायला सुरवात कशी करावी याचा विचार करायला आरंभ केला.

तीन वाजल्यापासूनच तिची बाहेर जाण्याची तयारी चालली होती. शक्य तों त्यांच्याशी बोलतांना आपल्याला लाचारी दाखवावी लागूं नये अशी तिची मनापासूनची इच्छा होती, आणि त्याच दृष्टीने ती आपल्या प्रश्नोत्तरांची जुळणी करीत होती.

साडेतीन वाजायच्या सुमारास ती सुन्न डोक्याने बाहेर उभी असतांनाच तिला कुमुदिनीला बघितल्याचा भास झाला, आणि मग तिच्या मुद्रेवर टवटवी येऊन आपल्या डोळ्यांनी आपल्याला फसविलं तर नाहीं ना, या बद्दल खात्री करण्याकरितां कठड्यावरून वांकून ती कुमुदिनीच्या वाटेकडे पाहूं लागली. थोड्याच वेळांत नजरेने आपल्याला फसविले नाही अशी तिची खात्री झाली. कारण कुमुदिनी आणि मनोहर आपल्या नूतन अपत्याला घेऊन तिच्याच चाळीच्या बाजूला येत होतीं. त्या दोघांच्याही चेहऱ्यावरील आनंद पाहून तिला समाधान वाटले.

कुमुदिनीचें स्वागत करायला ती जिन्याजवळ गेली आणि ती वर चढून येतांच तिला म्हणाली, " यावं बाईसाहेब ! आपण आलां असाल असा आम्ही केव्हांच अंदाज बांधला होता. "

" माझ्या गैरहजेरींत ही नवीनच विद्या आपण पैदा केलेली दिसते. " कुमुदिनी हंसत म्हणाली.

पण तिच्या उत्तरापेक्षां तिच्या चिमण्यालाच आपल्याजवळ घेण्याची नंदिनीला अधिक उत्सुकता लागली होती. त्यामुळें तिनें जवळ जवळ झडप घालूनच त्या छोट्या जीवाला आपल्या बाहुपाशांत घेतले, आणि ती त्याचे पटापट मुके घेऊं लागली.

मनोहर आणि कुमुदिनी यांना त्यामुळे आनंदच झाला.

आज ज्या वेळीं आपल्याला कुमुदिनीला भेटण्याची तीव्र इच्छा झाली होती त्याच वेळीं ती यावी या योगायोगाचेच नंदिनीला आश्चर्य वाटत होते, आणि त्यामुळे आपल्या हांकेला ती केव्हांही धांवून यावी असेच तिला मनापासून वाटलें. किती तरी वेळपर्यंत ती कुमुदिनीच्या मुलाचे मुके घेत होती; पण त्याहीपेक्षां आपल्याला खरा आनंद तिच्या आजच्या भेटीचाच झाला आहे ही गोष्ट तिला आपल्या मनाजवळ कबूल करावी लागली, आणि मग त्या आनंदामुळें कांही वेळ तिला कुमुदशी बोलणेंही अशक्य होऊन बसले.

कांही वेळ मौनांतच गेल्यावर कुमुदला स्वस्थ बसणें अशक्य होऊन ती म्हणाली, " किती ग वाळलीस तूं अलीकडे. "

" कुठे ! " नंदिनी बळेच हंसत म्हणाली, " उलट तूं जरा बरी झाल्यासारखी दिसतेस म्हणून तुला असं वाटत असेल ! "

" मी तर बेमुमार फुगले आहे. पण त्या बरोबरच तुझी प्रकृति बरोबर नाही असंही मला स्पष्ट दिसतंय्. काय होतंय् तुला ? "

तिच्या त्या प्रश्नांतच तिला आपल्याला काय होत आहे याची अंधुक कल्पना असली पाहिजे असें नंदिनीला वाटल्यावांचून राहिलें नाही. तिच्या त्या प्रश्नांत केवळ औपचारिक उत्सुकता नसून आपल्या हांकेला केव्हांही धांवून येण्याचें आश्वासनच आहे...

आपण तिच्याजवळ हृदय मोकळे केल्यास तिला त्या बद्दल आनंदच होईल...

पण हृदयच मोकळें करायचें असलें तर आतां अर्धवट हकीकती सांगण्यापेक्षां आजच्या सूर्यकांताच्या भेटीनंतरच सांगितलेलें काय वाईट असा विचार मनांत येऊन ती आवंढा गिळून म्हणाली, " वाटत नाही बरं अलीकडे हे तर खरंच. पण काय होतंय् तें मात्र आतां विचारलंस तर सांगतां येणार नाही. "

बोलतां बोलतांच तिच्या आवाजांत उत्पन्न झालेला कंप कुमुदिनीच्या नजरेतून सुटला नाहीं.

आजूबाजूला यशोदाबाई मामी आणि मनोहर हीं मंडळी असल्यानें यावेळीं आपल्याला कदाचित् ती कांहींच मोकळेपणानें सांगणार नाहीं असें वाटून, मग कुमुदिनीनें संभाषणाचा विषयच बदलला.

त्यानंतर कुमुदिनी त्या ठिकाणीं जवळ जवळ तासभर होती, पण दिनकरमामा आणि मनोहर यांनी चालविलेल्या हास्यविनोदांतच सगळा वेळ गेला.

नंदिनीचा प्रेमभरानें निरोप घेऊन रस्त्यावर आल्यानंतर कुमुदिनी मनोहरला म्हणाली, " पुरुषांच्या आणि बायकांच्या दृष्टीत काय फरक असतो तें आतां तरी कळलं तुम्हांला ? "

" काय ? " तिनें एकाएकी प्रश्न केलेला पाहून मनोहर बुचकळ्यांत पडत म्हणाला; " तुझं काय म्हणणं आहे तेच माझ्या लक्षांत आलं नाहीं अजून. "

" त्या दिवशींच तुम्ही नाहीं म्हणालांत कीं नंदिनीच्या मनावर त्या प्रसंगाचा कांहीच परिणाम उरलेला नाही म्हणून ? "

" बरं मग ? "

" हेंच तर तुम्हाला कळलं नाही. "

" कशावरून ? "

" तिची प्रकृतीच सांगते. किती खराब झाली आहे ती."

" हं ! " एवढाच उद्गार काढून मनोहर चालूं लागला.

आणि मग दोघेंही नंदिनीला काय त्रास होत असावा याचा विचार करीत आपल्या रस्त्याला लागलीं.

कुमुदिनी गेल्यावर नंदिनी थोड्याच वेळांत बाहेर पडली.

तिचीं पावलें तिला जवळ जवळ ओढीतच सूर्यकांताच्या खोलीकडे नेत होतीं. आपल्या आयुष्याला अकल्पितपणें कोणतें वळण लागलें आहे याचा विचार तिच्या मनाला प्रत्येक पावलाला त्रास देत होता. आपण आल्या पावलीच परत जावें आणि

त्या खल पुरुषाचा त्रास चुकविण्यासाठीं जीवाचें बरें वाईट करून घ्यावें असा विचार वारंवार तिच्या मनांत घोळत होता. जो प्रश्न तिनें त्याला विचारायचा असे मनाशी ठरविले होतें तो अपमानास्पद आहे अशी तिची प्रामाणिक समजूत होती. पण या जगांत जगायचंच असलं तर त्याखेरीज आपल्याला दुसरा मार्ग नाहीं हेंही तिला तितक्याच स्पष्टपणें कळून चुकलें होते.

ती सूर्यकांताच्या खोलीत शिरली त्या वेळी तो तोंडानें कोणती तरी लावणी म्हणत केस विचरण्यांत दंग झालेला होता. आरशामधून तिचे प्रतिबिब पाहून तो हंसत म्हणाला, " फारा दिवसांत आली नाहीस, तूं तेव्हां पुन्हां इकडे न येण्याचा विचारच केला होता की काय असं मला वाटत होतं. पण त्याबरोबरच तूं या ठिकाणी आल्यावांचूनही राहणार नाही अशी माझी मनोदेवता मला सांगत होती."

त्याचा प्रत्येक शब्द आपल्याला अवमानित करण्यासाठीच योजलेला आहे हे तिला कळत होते आणि त्या बरोबर आपण वाटेल तें झालें तरी याच्या बरोबर एक शब्दही न बोलतां आल्या वाटेनें निघून जावे असे तिच्या मनांत येऊन गेले. पण या पुढे हें कलंकित जीवन एकाकी राहून काढणें योग्य आहे काय हा प्रश्न तिच्या मनाला स्पर्श करून गेला.

आपण स्वखुषीनें कांही शीलाचा बळी दिला नाही...

मग याच पुरुषाबरोबर आपण संसार करावा ही सक्ति कां...

पण आपण सूर्यकांताबरोबरच विवाहबद्ध व्हावे अशी कोणीही आपल्यावर सक्ति केलेली नाही हें ताबडतोब तिच्या लक्षांत आलें.

रजनीनाथाचा संसार दुःखाचा होऊं नये म्हणूनच आपण हा मार्ग पत्करलेला नाही का......

आणि याच्याशींच लग्न केलं तर झालेल्या गोष्टी बाहेर येणार नाहींत हें तरी आपल्याला विसरून कसं चालेल?...

पण झालेल्या गोष्टीवर पांघरूण पडलंच पाहिजे असा तरी आपला अट्टाहास कां?......

याही प्रश्नाचा निकाल तिला स्वतांशीच लावल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. आजची समाजरचनाच अशी आहे की झाल्या गोष्टीची जबाबदारी प्रत्यक्षपणे आपल्याखेरीज कोणाच्याच अंगावर जाऊं शकत नाहीं.

चार ढोंगी श्रीमंतांनीं कांहीं केलं तरी चालतं. त्यांच्यावर पांघरूण घालायला कोणीना कोणीं सरसावून पुढें होतं, आणि पुष्कळ वेळेला अतिशय किळसवाण्या गोष्टींवर आपोआप पडदाही पडूं शकतो. गरीबांनाच जगांत कोणी वाली नाहीं. या ढोंगी लोकांना वठणीवर आणायला एकही समर्थ हात पुढें येऊं नये हें आश्चर्य नाहीं कां...

प्रत्येक विचाराबरोबर तिच्या अंगांत भर उन्हांतून सांवलीला बसलेल्या पांथस्थाला छळायला येणाऱ्या उष्ण वायूलहरीप्रमाणेंच संताप लहरी उसळत होत्या. त्याच्या मिस्किल नजरेचा परिणाम म्हणूनच की काय तिच्या नजरेंत धगधगीत स्फुल्लिंग निर्माण होत होते, आणि नाकपुड्यांतून उष्ण श्वासोच्छ्वास बाहेर पडत होता.

" आल्यासारखी बसशील तर खरी ! " कांही वेळ तिच्या मुद्रेवर दिसणारे फरक अवलोकन केल्यानंतर सूर्यकांत म्हणाला; "मी बोललों हे कटुसत्य आहे एवढंच; पण त्यामुळें तुला वाईट वाटून घेण्याचं कारण नाही."

नंदिनी आपला क्रोध आवरण्याचा प्रयत्न करून किंचित् हंसत म्हणाली, " तुम्ही अंतर्ज्ञानी आहांत हें आतां माहित झालं."

" तूं इतक्या लवकर मी कसा आहे हें ओळखलंस, हें छान झालं. या जगांत परस्परांनीं परस्परांना असंच ओळखायला शिकलं पाहिजे."

त्याच्या प्रत्येक शब्दांत कांही अर्थ भरलेला आहे, की कांही तरी बोलून वेळच काढायचा म्हणून तो असें बोलत आहे हे नंदिनीला आकलन करतां येईना. पण त्याच्या बोलण्यावरच आपण कांही तरी बोलून मूळ विषयाला सुरवात करावी असा विचार करून ती म्हणाली, " मग सांगा बघूं मी आज तुमच्याकडे कां आलें आहे ती ? "

" तें सांगतां येणं कठीण नाही. पण खरं सांगूं इतक्या दिवसांनीं तूं माझ्याकडे आल्यानंतर एखादा अप्रिय विषय काढून बसावं असं मला वाटत नाहीं." सूर्यकांत हंसत म्हणाला.

" मग तुम्हांला अंतर्ज्ञान नाहीं असंच मला म्हणावं लागेल."

त्या नंतर नंदिनी थोडा वेळ अडखळली. आपल्याला पुढें जें बोलायचं आहे तें खरोखरीच कठीण आहे असे तिच्या प्रत्ययास येऊं लागलें. कारण मनांत नसतां-

नाही आपल्याला त्याची स्तुति करीतच बोलावं लागत आहे ही गोष्ट तिला शल्या-प्रमाणें टोचूं लागली. पण आलेल्या संधीचा उपयोग करून घेऊन एकदांच काय तें बोलून टाकावं आणि ताबडतोब निघून जावं; पुढील जन्म त्याच्याच बरोबर काढा-यचा आहे असा विचार करून ती म्हणाली, " कारण मला जें बोलायचें आहे तें तुम्हांला प्रियच आहे."

" पण तुला नाहीं ना ? " सूर्यकांत तिला मध्येच अडवून म्हणाला.

नंदिनी त्याच्या त्या बोलण्यामुळें आणि नंतरच्या हंसण्यामुळें चपापल्यावांचून राहिली नाही. तरीही धीर करून ती बळेंच हंसत म्हणाली, " तरीही घसरल्या-वांचून राहिला नाहीत तुम्ही. तुम्ही आतां मला मागणी घालायची आहे ही गोष्ट अप्रिय खास नाही."

" खरं सांगूं मी तुला ? " सूर्यकांत विचारांत पडल्यासारखें करून म्हणाला; " तुझं रजनीनाथावरचं प्रेम आणि माझ्याशीं लग्न करण्याची नाखुषी पाहिल्यानंतर मी तो विचारच सोडून दिला. कारण लग्नाची कोणी कोणावर सक्ति करूं नये असं माझं आतां प्रामाणिक मत झालं आहे. "

त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर आपल्या डोक्यावर कसला तरी जबर आघात होत आहे असें तिला वाटलें.

" सूर्यकांत तुम्ही माझी थट्टा तर करीत नाही ? " कांही वेळाने ती श्वासो-च्छ्वास आवरत, आणि हंसण्याचा प्रयत्न करून म्हणाली.

" भलत्याच गोष्टींत थट्टा करायला मला वेड नाहीं लागलं नंदिनी ! "

" मग तुम्ही माझ्याशीं लग्न नाहीं करणार तर ? "

तिच्या प्रत्येक शब्दांतील असहाय्यता सूर्यकांताला स्पष्ट दिसत होती, आणि त्यामुळे आनंदाच्या अगणित लहरी त्याच्या हृदयांत उसळत होत्या.

नंदिनीच्या घशाला कोरड पडत चालली होती, भालप्रदेश घर्मबिंदूनीं डबडबला होता, आणि हातापायांतील सारी शक्ति नाहीशी झाल्याचा तिला प्रत्येक क्षणाला भास होत होता.

" तुझ्या इच्छेविरुद्ध लग्न करून आपल्या दोघांनाही सुख होणार नाहीं असं मला वाटतं बुवा ! "

" तेवढीच आडकाठी असेल तर नकार देण्याचं कांहींच कारण नाही."

" पण मी तो विचार माझ्या मनांतून काढून टाकल्यानंतर आतां काय राहिलं ? "

" सुखासाठी नाही, पण माझ्या अब्रूचा कांही विचार नको कां करायला ? माझी अब्रू बचावण्यासाठी तुम्हांला शीलाचं मोल दिलं ते इतक्यांतच विसरलांत ? "

" त्याबद्दल मी हवं तर तुला आश्वासन देतो की तुझी अब्रू मी चवाठ्यावर मांडणार नाही. त्याला लग्नाची काय जरुरी ? "

" तुमच्याकरितां मी रजनीनाथांना नकार दिला ते माहित नाही तुम्हांला ? अगदीच निर्दयपणाने वागूं नका."

" नकार दिला हें आतांच मी तुझ्या तोंडून ऐकतो आहे. पण तो माझ्याकरितां असं मी मानून घ्यायला तयार नाही."

" मग कशाकरितां ? " नंदिनी संताप न आवरून म्हणाली.

" आपलं बदकर्म त्याच्या कानावर गेलं तर त्यानं तुला टाकूं नये म्हणून."

" तुमचा माझ्या कोणत्याच गोष्टीवर विश्वास बसत नाही ? "

" कां बसावा ? तूं माझ्याशी लग्न करायला तयार झालीस ते माझ्यावरील प्रेमामुळें नव्हे हे तुलाही कबूल करावं लागेल. पण जणूं आतांपर्यंत प्रत्येक गोष्ट तूं माझ्यासाठींच केली आहेस असाच आव आणला आहेस. रजनीनाथाचा त्याग तूं माझ्यासाठीं केला नाहीस हे मी मघांशींच तुला पटवून दिलं. पण खरं म्हणशील तर मला अजूनही वाटतं की तुझं रजनीनाथावर मुळींच प्रेम नव्हतं. मनोहरपाशीं केलेलं बदकर्म झाकायला तुला रजनीनाथ पाहिजे होता ? तें बहुतेक त्याला कळलं असावं म्हणून तूं आतां माझ्याकडे आलीस. तुझ्या आतांपर्यंतच्या चरित्रावरून तूं माझ्याशी एकनिष्ठ वागशील असं मलाहि वाटत नाहीं."

" अजूनही तुमचा हाच निकाल आहे का ? " नंदिनी संतापाने भान विसरून म्हणाली."

पण छे...

या स्थितींत आपल्याला कोणापुढेंही जाण्याची लाजच वाटेल...

सृष्टीवर तो अकाली वर्षाव होत असतांना ती खिन्न नजरेनें त्याजकडे पहात बसली होती, तोच तिच्याजवळून सगळा खुलासा करून घेण्यावांचून गत्यंतरच नाहीं असें आपल्या मनाशी ठरवून यशोदाबाई जड हृदयानें तिच्याजवळ येऊन बसल्या. आई आपल्या जवळ कां आली असावी हे ओळखायला नंदिनीला मुळीच वेळ लागला नाही. आतांपर्यंत कोंडून ठेवलेला अश्रूंचा बांध कोसळूं लागला, आणि हुंदका अनावर होऊन ती यशोदाबाईच्या गळ्याला एकदम मिठी मारून म्हणाली, " आई यांत माझा खरंच कांही अपराध नाही ग !"

त्यानंतर एक शब्दही बोलणे तिला अशक्य होऊन बसले.

यशोदाबाईच्या हृदयांत तर नंदिनीपेक्षांही कल्लोळ उडाला होता.

नंदिनी वैतागानं आत्महत्या तर करून घेणार नाही ना...

मामा आणि मामी तिच्याकडे पूर्वीच्याच सहानुभूतीनें बघतील का...

आणि जग काय म्हणेल...

जग काय म्हणेल याची त्यांना कल्पनाच करतां येत नव्हती.

किती तरी वेळ त्या उदास हृदयाने आपल्याच विचारांत गुरफटल्या होत्या. त्यांचा हात नंदिनीच्या पाठीवर असला तरी, डोकें तिचें भवितव्य ठरवीत होते. आणि त्यांतच हा प्रकार घडला तरी कसा असावा हा प्रश्न सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता.

कांही वेळ त्यांनीं नंदिनीला मनसोक्त रडूं दिलें, आणि मग त्या तिला प्रेमभरानें कुरवाळीत म्हणाल्या, " हा दगड आपल्या पायांवर कसा ओढून घेतलास ग ?"

आईने विचारलेल्या त्या पहिल्याच प्रश्नामुळें नंदिनीला पुन्हां एकदां भडभडून आलें, आणि हुंदके देत ती म्हणाली, " यांतून कशी ग मोकळीक होणार माझी ?"

" आतां गप्प रहा हं जरा. पहिल्यानं या गोष्टीचा गवगवा होऊं न देण्याची आपल्याला खबरदारी घेतली पाहिजे."

आईचे ते शब्द नंदिनीच्या हृदयाला झोंबले. मनानें आपण पापकर्माची मुळीं-सुद्धां इच्छा धरली नसतांना आपल्यावर लादली गेलेली गोष्ट चार लोकांना कळूं न देण्याची आपल्याला खबरदारी घ्यायची आहे, आणि आपली खरीखुरी मुक्तता करून

घेण्याऐवजी त्याच एका गोष्टीकरितां आईसह सगळीं सांगतील त्या ढोंगाचा अवलंब केला पाहिजे, या गोष्टीचा तिला विषाद वाटला. पण त्या बरोबरच तिच्या मनांत दुसरा विचार आला की याच जगाची भ्रामक भीती बाळगल्यामुळें सूर्यकांतासारख्या पशूला आपल्यावर हा अत्याचार करतां आला. आणि मग तिला माहित असलेली किती तरी उदाहरणं तिच्या डोळ्यापुढें नाचूं लागलीं. तिच्या माहितीची एक श्रीमंताची मुलगी एक वर्षापूर्वी तिच्या सारख्याच आपत्तींत सांपडली. पण केवळ पैशाच्या जोरावर सगळ्या गोष्टीची निरवानिरव होऊं शकली, आणि आज तीच मुलगी नीतीमत्तेच्या मोठमोठ्या गप्पा मारायला कमी करत नव्हती. तिच्या कॉलेजच्या रस्त्यावर प्रसिद्धीला आलेली एक नवीन डॉक्टरीणही साक्षीपुराव्यासह चार चटोर लोकांच्या तावडीत सांपडली होती. पण पैशाच्या जोरावरच ती निष्कलंक ठरून, आज प्रतिष्ठित म्हणून मिरवत होती. आणि आजूबाजूच्या किती तरी पुरुषांची किळसवाणी उदाहरणं तर तिच्या कानावर आलेली होती. पण निसर्गाचीच कृपा असल्याने समाजाने त्यांच्या नीतीमत्तेविषयीं केव्हांच संशय घेतला नव्हता. याच्या उलट याच ढोंगी समाजानं कैक कुमारिकांच्या पावित्र्यावर घाला घालून शेवटीं त्यांना या दुनियेचा निरोप घेण्यालाही भाग पाडलं...

एकच प्रश्न विचारून सगळ्या कोड्याचा निकाल लावावा, असें यशोदाबाईंच्या वारंवार मनांत येई, पण तो विचारतांच नंदिनीच्या भावना तर दुखावणार नाहीत ना, हा विचार डोकें वर काढूं लागला म्हणजे त्या आंतल्या आंतच घोटाळत. लहान मुलाला एखाद्या वेळीं औषध देण्याची तर जरूरी असते, पण औषधाच्या वेळी त्याची चाललेली रड पाहिली म्हणजे नको ते औषध देणं असं मातेला वाटल्यावांचून रहात नाहीं. यशोदाबाईच्या मनाची स्थिति अगदी त्याप्रमाणेंच झाली. लहानपणीं नंदिनी एखाद्याच वेळीं आजारी पडली तर तिची औषधाला कशी खळ होत असें हें त्यांना या वेळीं आठवलें. पण त्या बरोबरच तिच्या कल्याणाच्याच दृष्टीने विचार करायचा असला तर तिला तो प्रश्न विचारण्याखेरीज गत्यंतर नाही, असें मग स्वतांशींच ठरवून त्या म्हणाल्या, " कोणाचं काम हे ? "

होणारा परिणाम टळणार नसला तरी ज्या नांवाची आपल्याला आतां पूर्ण शिसारी आलेली आहे त्याचा उच्चार तरी कशाला करायचा असा विचार नंदिनीच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

रजनीनाथाखेरीज नंदिनीचा कोणत्याही पुरुषाशी लक्षांत येण्यासारखा प्रेमाचा संबंध आलेला नसल्यानें, नंदिनीच्या तोंडून त्याचेंच नांव आल्याखेरीज रहाणार नाही असेच यशोदाबाईंना वाटलें. आणि मग त्यांच्या मनांत दुसरा विचार आला कीं रजनीनाथ एवढ्या नीच वृत्तीचा असेल का ?...

कारण त्यांच्या मताप्रमाणे रजनीनाथाला दोष द्यायचा नसला तर तो नंदिनी शिवाय दुसऱ्या कोणाकडे जाणंच शक्य नाही. पण नंदिनीच्या चारित्र्याची शंका घेण्याची कल्पनाही त्यांच्या मातृहृदयाला सहन होण्यासारखी नसल्यानें त्यांनीं आपल्या मनांत रजनीनाथ खरोखरीच परत येणार नसल्यास त्यालाच दोषी ठरवायचें ठरविले.

त्या बरोबरच मध्यंतरीं आपण तिला छेडण्याचा प्रयत्न केला तेव्हां तिनें आपणच रजनीनाथाला नकार दिल्याचें कबूल केले होते, ही गोष्ट त्यांना या वेळी आठवली आणि मग मात्र या प्रकारांत खरोखर दोषी कोण हे ठरविणं त्यांना कठीण होऊन बसले. त्या निश्चल मुद्रेनं तिच्या तोडाकडे पहात राहिल्या.

पण त्या नतर त्यांनी आणखी कांहीं वेळ स्वतांशीच विचार करण्यापूर्वी किंवा नंदिनीच्या तोंडूनच कांही तरी खुलासा बाहेर पडण्यापूर्वीच दिनकरमामा रागीट चेहऱ्यानें त्या ठिकाणी आले, आणि कारणावांचून रागावण्याचा त्यांचा स्वभाव नसल्याने यावेळी ते आपल्याकडे कां आले असावेत हे नंदिनीने ताडले. मामांच्या येण्याचे कारण यशोदाबाईंनींही ओळखले असावें असे त्यांच्या चेहऱ्यावरून नंदिनीला वाटलें.

खोलींत आल्याबरोबर एक दोन मिनीटें मामा नंदिनीकडे रोखून पहात होते. त्यांच्या तोंडून रागानें बाहेर पडणाऱ्या एखाद्या शब्दापेक्षां त्यांची ती भेदक नजर नंदिनीला अधिक तापदायक वाटली. सूर्याचे उन्ह कितीही प्रखर असले तरी तें अंगावर असेपर्यंत विशेष तापदायक वाटत नाही. पण त्याच्याशीं केव्हांही होणारी नजरानजर नेहमीच असह्य होते.

" तुझी मजल इतकी जाईल असं मला आतांपर्यंत वाटलं नाही. माझ्या अब्रूचा विचार तुझ्या डोक्यांत मुळींसुद्धां आला नाहीं का ? "

त्या मनःस्थितींतही नंदिनीला मामांचा तो आरोप विलक्षणच वाटला. त्यांना खऱ्या परिस्थितीची मुळीच कल्पना नसल्यानें त्यांनीं आपल्यावर रागवावें यांत तिला

कांहीच वाटलें नसतें. पण त्यांचें रागावणे आपल्या अब्रूपेक्षां स्वतांच्याच अब्रू-करितां होतें हें ऐकून ती थक्कच झाली. अगदीं जिव्हाळ्याचा माणूसही प्रत्येक गोष्ट स्वार्थपरायणतेमुळेच तर करीत नाही ना अशी तिला या वेळी शंका आल्यावांचून राहिली नाही. वैतागानें काढलेल्या त्या एका उद्गारांतच मामांच्या स्वार्थाची सीमा रेखाटलेली आहे असे तिला वाटलें. त्यांच्या त्या उद्गाराचा तिच्या मनांत आलेला स्पष्ट अर्थ असाच होता, की आजपर्यंत आपण तिच्या शिक्षणाकरितां सोसलेली झीज लक्षांत घेतां तिने जगांत आपल्याला खाली पहायला लागेल अशा रीतीनें केव्हांही वागतां उपयोगी नाही...तिने या जगांत कसें वागावें हें ठरविण्याचा अधिकार आपलाच आहे...आपला जगांतील मार्ग आखतांना त्याला आतां स्वातंत्र्य उरलेले नाही...

दुसऱ्या कोणालाच कशाला? पण आपली आपल्यालाही मान खालीं घालायला लागूं नये म्हणून कोणत्याही महत्त्वाकांक्षी तरुण तरुणीची इच्छा असणारच?...पण मोठी माणसं कुठे याचा विचार करतात...आणि त्यामुळे मामांच्या त्या उद्गाराचा आपण लावलेला अर्थ बरोबरच आहे असा तिच्या मनानें तिला निकाल दिला.

पण मामांच्या प्रश्नाला उलट उत्तर देण्याची तिला हिंमत झाली नाही.

नंदिनीने कांहीच उत्तर न दिलेलें पाहून मामांचा राग अधिकच भडकला. कांहीं वेळ तिच्याकडे पहात राहिल्यानंतर ते तिला म्हणाले, "तो लफंगा नाहीसा कसा झाला याचं कोडं मला आतां उलगडूं लागलं आहे."

'मला वाटेल तें बोला, पण निष्कलंक रजनीनाथाला विनाकारण बोल लावूं नका!' असे मामांना सांगून टाकण्याचें नंदिनीच्या अगदी जिभेवर आले होतें; पण यावेळी ते आपल्या तोंडून एक शब्दही ऐकून घेण्याच्या स्थितीत नाहीत हें ओळखून ती गप्पच राहिली.

"तुझ्या तोंडून आतां शब्द निघेल तर शपथ! पण रजनीनाथ कुठें आहे हें मला यावेळी कळलंच पाहिजे!" केसांतून हाताचीं बोटें फिरवून ते म्हणाले.

"मला माहित नाही!"

जोराने बाहेर पडूं पाहणारा हुंदका आंवरून थरथरणाऱ्या ओंठानीं नंदिनीनें तेशब्द उच्चारले होते, पण मामांना त्यांत उद्दामपणाचा भास झाल्यावांचून

राहिला नाही. त्यांच्या भालप्रदेशावरील शिरा ताठ झाल्या, नाकपुड्यांची जोराची हालचाल झाली, आणि बोलायचा शब्दही तोंडून स्पष्ट निघेनासा झाला.

"मला असलीं उत्तरं ऐकायची संवय नाही! रजनीनाथ कुठेंही दडून बसला असला तरी तूं न सांगतांच त्याला शोधून काढीन, आणि त्याला या गोष्टीचा जबाब विचारीन हें लक्षांत ठेव!"

"मला खरंच त्यांचा पत्ता माहित नाही, आणि त्यांचा या गोष्टीशी नांवालासुद्धां संबंध नाही!" नंदिनी कसेंबसे म्हणाली.

"इतक्या निर्लज्जपणाची उत्तरं मला नको आहेत. त्याचा पत्ता सांगणार असलीस तर सांग, नाहीं तर चालती हो माझ्यापुढून."

सूर्याचा ताप असह्य झाला म्हणजे ढगांच्या पंक्तीच्या पंक्ती आकाशाबाहेर पडण्याचा प्रयत्न करतात, त्याप्रमाणेंच नंदिनीला मामांचा प्रत्येक शब्द सहन होणें अशक्य होऊन बसलें; आणि मग तिच्या मनांत विचार आला की या अपमानास्पद स्थितीत घरांत रहाण्यापेक्षां कुठेंहि दूर जाऊन राहिलेलं काय वाईट?...माणसाच्या अपराधाबद्दल माणसानेंच क्षमा नाही करायची तर कोणी?...मामांच्या हातून आजपर्यंतच्या आयुष्यांत एकही अपराध घडलाच नसेल का? चंद्रासारखा शीतल ग्रहही कलंकरहित राहूं शकला नाही तर माणसांची काय कथा?...मेनकेनं विश्वामित्राची काय स्थिति केली?...शंकरासारखा तपोमूर्तीही आपल्या ध्येयापासून च्युत झाला...

तिच्या हृदयांतील लज्जेची जागा क्रोधानें पटकावली, आणि तिने मग मामांना किंवा आपल्या आईला काय वाटेल याचा विचार न करतां उत्तर दिलें, "माझीही तुमच्यापुढें उभं राहायची इच्छा नाहीं. पण रजनीनाथाच्या पवित्र नांवाशी या गोष्टीचा विनाकारण संबंध जोडूं नका!"

नंदिनी केव्हांही दुरुत्तरं करणारी नसतांना तिनें या प्रकारचें संतापून उत्तर दिलेलें पाहून यशोदाबाई आश्चर्यचकित होऊन ती गेलेल्या वाटेकडे बघत राहिल्या, आणि मामा त्यांच्याकडे संतापानें पाहूं लागले.

"झाली तुझ्या आयुष्याची इतिकर्तव्यता? पाहिलंस भाचीनं माझे कसे पांग फेडले ते? तुझ्या नांवाचा झेंडा अटकेला पोंचला!"

मामांच्या त्या क्षोभावर यशोदाबाई कांहींच बोलल्या नाहीत. मामासारखा सरळ वृत्तीचा माणूस झालेल्या आघातानं संतापणं शक्य आहे, हें त्यांना जितकं पटत होतं, तितकंच त्यांनी या वेळी सूज्ञपणें वागून नंदिनीबद्दल सहानुभूति प्रगट करणं जरूरीचं होतं ही गोष्टही त्यांना दृष्टिआड करतां येत नव्हती. नंदिनीला अब्रूची किंमत नसेल या गोष्टीची ज्याप्रमाणें त्यांना खात्री पटली नसती, त्याप्रमाणेंच मामांनाही एवढी साधी गोष्ट कळत नसेल असें म्हणण्याचेंहीं त्यांना धाडस झालें नसते. नंदिनीच्या मनाची खरी परिस्थिति ज्याप्रमाणे त्यांना पूर्णपणे कळत होती त्याप्रमाणेंच समाजाच्या भीतीने गांगरलेल्या मामांच्या मनाची त्यांना पूर्ण कल्पना होत होती. पण सृष्टीला कल्पना नसतांनाच एकाएकी आकाश ढगांनी व्यापून टाकावं आणि मग सगळ्यांना स्वैरसंचार करायला पुरेशी जागा नाही असे वाटूनच की काय त्यांनी जोराने आकांडतांडव करूं लागावं, आणि त्यांतूनच विजेनें संधि साधून साऱ्या सृष्टीचा संहार करण्याचा आव आणावा त्यांतलाच प्रकार त्या वेळी झाला.

" नंदिनी त्याला कितीही लपवायचा प्रयत्न करो, पण माझी तर ठाम समजूत आहे की त्याच लफंग्याचं हे कर्म असावं. त्याशिवाय त्याला कोणालाही न कळवतां पळून जाण्याची जरूरीच नव्हती !." कांही वेळ जाऊं दिल्यावर मामा म्हणाले.

यशोदाबाईनी कांही वेळ विचार केला आणि मग त्या शांतपणें म्हणाल्या, " झाली ही गोष्ट कोण कशी चांगली म्हणून कबूल करील ? पण यावेळी असं आकांडतांडव करून काय होणार ? उगीच चार लोकांच्या कानी हकीकत जायची आणि सगळीकडे बभ्रा व्हायचा यांत आपली काय शोभा उरली ? "

आपल्या बोलण्याचा मामांच्या मनावर काय परिणाम होतो हें अजमावण्याकरितां त्यांनीं मामांच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. कांही वेळ कोणीही प्रत्युत्तर न केल्यामुळे आणि बहिणीला वैधव्यदशा प्राप्त झाल्यापासून मामांनी तिला कधीही दुखविली नसल्यानें, या वेळीही त्यांनी यशोदाबाईचे म्हणणें शांतपणाने ऐकून घेतलें, आणि संतापामुळे थकवा आल्यामुळेच की काय त्यांनी जवळच्या खुर्चीवर अंग टाकलें.

नंदिनीच्या मनाची स्थिती तर विजेचा कडकडाट, गारांचा पाऊस, आणि तुफानी वारा यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या सृष्टीप्रमाणें झाली होती. सूर्यकांताच्या नकारा-

मुळें आलेला संताप, रजनीनाथाच्या नाहींशा होण्यामुळें मनावर झालेला आघात, मामांनी आपलें न ऐकतांही त्याचा घेतलेला संशय, आणि त्याचबरोबर तरुण पिढीला स्वतंत्र अस्तित्वच नाही असे दर्शविणारी त्यांची वृत्ति आणि त्यामुळें झालेला क्षोभ या सगळ्यांचा तिच्या नाजूक मनावर इतका ताण पडला की तिला कांही वेळ सरळ उभें रहाणेंही अशक्य होऊन बसलें.

त्यांतच तिच्या मनांत वारंवार विचार येई कीं मामांची आपल्याला सहानुभूति नाही तर या घरांत रहा कशाला ? आपल्या अस्तित्वामुळे त्यांना समाजांकडून जाच होईल असं वाटत असलं तर त्यांच्यावर ती सक्ति तरी कां करावी ?... आणि आयुष्याचा इतका खेळखंडोबा झाल्यावर या पुढे आपण जीवाची तरी पर्वा कां करावी ? ...

खोलीच्या चारी भिंतीकडे नजर जातांच आपल्याला खाण्यासाठी उभा केलेला हा एक मोठा तुरुंगच आहे असें तिला वाटले, आणि इथून आपली सुटका शक्य तो लवकर करून घ्यावी अशी इच्छा तिच्या मनांत वावटळीसारखी वावरूं लागली.

तिनें मनाचा निश्चय केला, आणि मामा आई व मामी यापैकी कोणाचेंच आपल्याकडे लक्ष नाही असे पाहून मागल्या दारानें हलकेच पाऊल बाहेर टाकलें.

अकाली आलेल्या मेघमालेने त्याच वेळी सृष्टीवरील वातावरण कुंद करण्याच्या निश्चयानेंच कीं काय जोरानें वर्षाव सुरू केला.

---

## —१४—

अरविंदबाबूंच्या मुलीला पुष्करिणीतून काढल्यापासून रजनीनाथ त्यांनाच काय पण सदानंदाला पूर्वीपेक्षां प्रिय झाला होता. त्या एकाच प्रसंगानें बाबूजीच्या घरी त्याचें जाणे येणे वाढलेले पाहून कांही वेळा सदानंद आणि मृणालिनी यांना त्याची थट्टा करण्याचा मोह अनावर व्हायचा. एकदां तर त्या बाबतींत सदानंदाने कहरच केला. संध्याकाळी हायकोर्टाच्या बाजूला तिघेही फिरायला गेले असतांना रजनीनाथ एकाएकी एका बंगाली तरुणीच्या पावलाकडे पाहून म्हणाला, "या वेळेला मावळत्या सूर्यनारायणाबरोबर एखादी बंगाली मुलगी रस्त्यांतून हिंडतांना पाहिली म्हणजे माझ्या डोक्यांत निराळीच कल्पना येते."

" कोणती ? " हंसत हंसत सदानंदाने विचारलें.

रजनीनाथ आपल्याच कल्पनेंत गुंग असल्यानें सदानंदाचा मिस्किलपणा त्याच्या लक्षांत आला नाही. तो पुन्हां एकदां आपल्याच पुढून चाललेल्या त्या तरुणीकडे बघून म्हणाला, " तुझ्या नाही डोक्यांत येत ? तिने रेखून परिधान केलेलं काळं पातळ, पाठीवर मोकळा सोडलेला शेपटा आणि तिच्या पायाच्या नखावर विलसणारा तांबडा रंग या सगळ्या गोष्टी पाहून, मला तरी ती जगावर सांजवात लावायला चाललेल्या संध्येचीच प्रतिमा वाटते. "

" माझ्या हृदयाच्या बाबतीत थोडीशी चूक झाली आहे परमेश्वराची ! " सदानंद मिस्किलपणानें हंसून म्हणाला. " काव्याचं मिश्रण त्यांत पडायचं राहिलं आहे.

आणि त्यामुळें तूं आपली कल्पना सांगितल्यानंतरही अजून एक शंका राहिली आहे. ”

“ ती कोणती ? ”

“दुसरी कोणतीही नाही. पण ती सांजवात कोणाच्या हृदयांतली आहे कीं काय ?”

रजनीनाथालाही मग त्याची थट्टा करण्याचा मोह अनावर झाला. तो ताबडतोब हंसून म्हणाला, “ तुझ्या बाबतीत परमेश्वराने ती चूक केलेली नाही असं आतां मला तरी वाटतंय्. नाही तर त्याच तुझ्या हृदयाला वाटलं असतं कां, ती वात तुझ्याच हृदयांतली आहे आणि मग मृणालिनीला ती विझवायची कशी याचा कदाचित् जन्मभर विचार करायला लागला असता. ”

या वर सगळीच मनापासून हंसलीं.

पण मग घरी गेल्यावरही सदानंदाच्या डोक्यांतून तो विषय गेला नाहीं. रात्रीं झोंपण्याच्या पूर्वी सदानंदला सकाळच्या वर्तमानपत्राची जरूरी लागली म्हणून तो हलकेंच रजनीनाथाच्या खोलीत गेला. रजनीनाथ बहुतेक झोंपला असावा अशीच त्याची कल्पना होती. पण तो प्रत्यक्ष जाऊन पहातो तों तो कोणाचा तरी फोटो टेबलावर ठेवून त्याकडे पहात निसासे टाकत लिहीत बसला होता. या वेळी तो कोणाचा फोटो घेऊन बसला असावा याविषयी त्याच्या मनांत सहजच मग जिज्ञासा जागृत झाली. पण विनाकारण त्याला त्रास देऊं नये म्हणून तो आपल्याला पाहिजे असलेले वर्तमानपत्र घेऊन परत आला.

“ माझा या स्वारीविषयी एक तर्क धांवतो आहे.” तो मृणालला म्हणाला.

“ कसला ? ”

“ अरविंदबाबूंच्या पोरीनं त्याच्यावर मोहिनी अस्त्राचा प्रयोग केलेला दिसतो.”

“ कशावरून ? ”

“ आतांच जाऊन पाहशील तर स्वारी तिचा फोटो टेबलावर ठेवून कांहीं तरी लिहीत बसलेली दिसते.”

“ पण तो तिचाच कशावरून ? ”

“ मग दुसरा कोणाचा असणार ? ”

मृणाल यावर कांहीच न बोलतां हंसली. सदानंदही आपण कांही तरी मोठा मजेदार शोध लावला या कल्पनेनें हंसला.

त्याने आणखी कांही वेळ जाऊं दिला आणि मग तो म्हणाला, " माझ्या डोक्यांत एक कल्पना आली आहे."

" कसली ? "

" यांचा त्या दिवशीचा पराक्रम तिथल्या वर्तमानपत्रांना कळविण्याची. "

" कशाला ? "

" छान ! आपल्याकडल्या तरुणांनी बाहेर एखादी चांगली गोष्ट करावी आणि आपण त्यांच्याविषयी स्वदेशीयांना कांहीच बातमी न देतां स्वस्थ बसावं. चांगली कल्पना आहे तुझी. आपल्या माणसाची कीर्ती सगळ्या जगाला कळावी असं तुला वाटत नाही ? "

" ते खरं हो. पण अगोदर माझ्या ती कल्पना लक्षांतच आली नाही ! " मृणालिनी हंसून म्हणाली.

आपल्या विषयी कांही तरी बातमी वर्तमानपत्रांकडे गेली आहे याची त्याला कल्पनाही नसणार, आणि मग ज्या वेळी ती बातमी प्रसिद्ध होईल त्या वेळी त्याची काय गंमत होईल याची कल्पना करीत ती मनमुराद हंसू लागलीं.

तावडतोब बसून सदानंदानें वर्तमानपत्रांना पुरविण्याची हकिकत लिहून तयार केली, आणि मग त्याच्या डोक्यांत रजनीनाथाच्या टेबलावर पाहिलेला फोटोही बरोबर पाठवावा अशी दुसरी कल्पना आली. टेबलावरील फोटो नाहीसा झाल्याबद्दल रजनीनाथ कांही वेळ अस्वस्थ होईल पण तो वर्तमानपत्रांत छापून आल्यावर त्याला आनंदच होईल असे सदानंदाला वाटले, आणि मग कांही वेळ जाऊं दिल्यावर रजनीनाथ जागाच आहे की स्वस्थ झोपला आहे हें पाहण्याकरितां त्याच्या खोलीकडे त्यानें आपला मोर्चा वळविला.

रजनीनाथ झोंपलेला पाहून त्याने हलकेच दिवा लावून आजूबाजूला नजर टाकली. रजनीनाथानें कदाचित् ती वही आणि तो फोटो उचलून ठेवला असेल अशी त्याची कल्पना होती आणि ती कांही अगदींच चुकीचीही नव्हती. पण ज्या टेबलाच्या खणांत सारे साहित्य ठेवले होते तो बंद करायला तो विसरला होता. सदानंदानें रजनीनाथाला आपली चाहूल लागणार नाही अशा बेताने मग आपल्याला पाहिजे असलेली सामुग्री टेबलाबाहेर काढली. रजनीनाथ लिहीत असलेल्या वहीची

एक दोन पानें चाळण्याचा प्रयत्न केला तेव्हां ती त्याची रोजनिशीच आहे असें त्याच्या प्रत्ययास आलें. आपण त्याची रोजनिशी वाचणें योग्य होईल किंवा नाही याचा विचार करण्याच्याही स्थितीत तो नव्हता. उलट ती हातांत घेतल्यानंतर आपल्याला एका प्रसिद्ध पुरुषाविषयीं बरीच माहिती वाचावयाला मिळणार याचाच त्याला आनंद झाला. त्याच्या मनाला किंचित् शंका आली त्या वेळीं आपण त्याची कोणतीही गुप्त गोष्ट वाचण्यांत आली तरी ती बाहेर जाहीर केली नाही म्हणजे झालं, असा विचार करून तो आपल्या खोलीकडे परतला.

प्रथम फोटोकडे नजर जातांच आपली मघांशी गैरसमजूत झाली होती असें त्याच्या प्रत्ययास आलें. कारण तो फोटो बाबूजीच्या मुलीचा नव्हता.

"आपण कांहीं तरी तर्कट रचलं हें खरं !" कांही वेळानें सदानंद म्हणाला; "पण तो आपल्याबरोबर इथें आला तेव्हांपासून उदासीन कां होता हे तरी आपल्याला नक्की कळणार. याचाच त्याच्या मनःस्थितीशीं संबंध असावा असं मला वाटतं."

मृणालिनी कांहींच बोलली नाही. ती किती तरी वेळ त्या चित्राचे निरीक्षण करीत होती.

सदानंदानें रजनीनाथाच्या रोजनिशींतील पाने मधून मधून वाचायला सुरवात केली.

× × ×

नंदिनीवर माझं लहानपणापासून प्रेम आहे. ही भावना आमच्या हृदयांत कशी वाढत गेली हें सांगणं खरोखरच कठीण आहे. पण मोठेपणी आपली सुखदुःखं एकमेकांना मोकळेपणाने सांगावी असं आम्हाला किती तरी वेळां वाटलं आहे.

नंदिनीच्या सहवासांत सुख होतं असं माझ्या अनेकवेळां अनुभवाला आलं आहे. तिला भेटायचं कबूल करून एखाद दिवशी तिला भेटायला सवड झाली नाही तर जीव कासावीस होतो. तीही पुष्कळ वेळां आतुरतेनं माझी वाट पहात बसलेली मीं पाहिली आहे.

× × ×

आम्ही दोघं मिळून एक चित्रपट पहायला गेलो होतों. नायक व नायिका यांची ताटातूट झाल्याचा प्रसंग आम्हीं पाहिला त्यावेळीं तिला फार वाईट वाटलं. सगळा

दोष नायकाचाच होता. नायिका त्याच्याशीं अगदी एकनिष्ठेनें वागत होती. पण एकदां तो कोणत्या तरी कामानिमित्त बाहेर गांवी गेला. तो उतरला होता त्या घरासमोरच एक गुजराथी कुटुंब रहात होतं. त्यांतली एक मुलगी नायकाला पाहिल्यानंतर सारखी खिडकीत येऊत उभी राहायची. त्यालाही मग तिच्याकडे पहाण्याचा चाळा लागला. थोड्याच दिवसांत तो तिला विसरला.

त्यानें केलेला तिचा त्याग पाहून नंदिनीच्या हृदयाला धक्काच बसला असं म्हणायला कांहीच हरकत नाही. 'तुम्ही मला अशी टाकणार नाही ना,' असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले. त्या वेळेपर्यंत दोघांना एकमेकांविषयीं कसलं तरी आकर्षण वाटतं एवढंच माझ्या लक्षांत आलं होतं. पण तिने भावनावश होऊन मला तो प्रश्न विचारतांच माझ्या हृदयाला गुदगुल्या झाल्यावांचून राहिल्या नाहीत.

× × ×

आज स्टुडिओत मोठा विक्षिप्त प्रकार घडला. चित्रपटाचं दिग्दर्शन पुरं होतांच मी घरी येण्यास निघालों. आमची मुख्य नटी वनिता माझ्याजवळ येऊन उभी राहिली. माझ्या आसपास कोणीही नव्हतं. तिची त्या वेळची नजर मला विलक्षण वाटली.

" फिरायला येतां का आज ? "

तिनें माझ्याकडे बघत स्मित करून म्हटले.

तिच्या सूचनेंत मला वावगं असं कांहीच वाटलं नाही. पण आजच मला विचारण्याची तिला लहर कां आली असावी याचं मात्र मी स्वतःशीच कोडं सोडवीत होतों.

आतांपर्यंत मी तिच्याशी कामापुरतांच बोलत असल्यानें तिला एकटीला घेऊन फिरायला जाणं माझं जीवावर आलं. त्यांतच मी काम आटोपतांच येतों असं नंदिनीला कबूल केलं असल्यामुळें तर मला पेंच पडला होता. तिनें पहिल्यानेंच मला त्या प्रकारचीं विनंती केली असल्यामुळे भीड पडून तिचा शब्द मोडणं जीवावर आलं माझ्या.

× × × ×

नंदिनीला ती हकिकत कळली तेव्हां ती पोट धरून हंसल्यावांचून राहिली नाहीं.

" बायकांना तुम्ही इतके घाबरतां ? " तिनें टवाळी करीत प्रश्न केला.

पण वनितेने चालविलेला लघळपणा मी नंदिनीजवळ कसा वर्णन करणार.

त्या बाईला समोर पाहिली म्हणजे मला आतां भीतीच वाटते.

पुन्हां असल्या गोड विनंतीला भुलायचं नाही असा मी निश्चय केला आहे.

× × × ×

रजनीनाथानें आपल्या आयुष्यांतील प्रसंग अगदी मोकळेपणाने लिहिले असल्यानें सदानंदाला आपण एखादी कादंबरी तर वाचत नाही ना, असा भास झाल्यावांचून राहिला नाही. पण त्याला रजनीनाथाच्या दुःखाचे कारण समजून घेण्याची तीव्र इच्छा असल्याने त्याने मधली बरीच पाने सोडून दिलीं आणि शेवटल्या कांहीं पानांना हात घातला.

× × × ×

नंदिनीनें नकार दिल्याबद्दल मला वाईट वाटत नाही असं म्हणून कसं चालेल. जी इच्छा मी वर्षानुवर्ष हृदयाशी बाळगीत आलों आहे तिच्यावर पाणी पडतांच हृदयाला धक्का बसणं साहजिकच आहे. पण तिच्यावर केलेलें प्रेम सत्य आहे कीं नाही याची ही मोठी कसोटीच नाही का ? प्रेमांत भोगाची कल्पना आली की त्यांत मालिन्याचा अंश आहे असं खास समजावं.

नंदिनीनें मला नकार दिला तो सुखासुखी दिला असेल असं मला वाटत नाही. नाही तर तिच्या हृदयाला ज्या यातना झाल्या असं मला वाटलं त्या खास झाल्या नसत्या. पण एरवींचा हृदयाचा हा मोकळेपणा नाहीसा कां व्हावा हेच मला कळत नाही. स्त्री पुरुषाचं एकमेकांवर विशुद्ध प्रेम असतांना मोकळेपणाने न उघडण्याजोगा हृदयाचा एखादा गुप्त कोपरा असेल का ?...कांहींच कळत नाही.

कोणत्याही कारणामुळे आपण तूर्त तरी तिच्याजवळ नसावं असं तिला वाटतंयसं दिसतं. तिला त्यापासून सुख होणार असेल तर आपण शक्य तों लांब जाणं युक्तच नाही का...

× × × ×

नंदिनीच्या आयुष्यांतून नाहीसं होण्याची छानशी संधि आली आहे. त्या दिवशीं मोहानं तिला भेटायला म्हणून गेलो पण भेट झाली नाहीं. आतां कलकत्त्याला जाण्यापूर्वी एकदां तरी तिला डोळेभरून पहावं असं सारखं वाटतं; पण त्यामुळें

तिला त्रास होईल. टाळावाच हा मोह. यावेळी तिला भेटल्यास आपला पत्ता तिला मुद्दाम सांगितल्यासारखा होईल. तिच्या आयुष्यांतून आपण नाहींसं व्हायचं असलं तर आपण कुठे आहोंत हेंही तिला कळतां उपयोगी नाही.

पण माझी एक महत्वाकांक्षा पुरी होण्याच्या वेळीं ती माझ्याजवळ असायला पाहिजे होती, ही जाणीव प्रयत्न करूनही नाहीशी होत नाही.

× × × ×

तिला लिहीलेलं पत्र तसंच राहूं देण्यांत शहाणपणा आहे. ते रवाना झालं तर पुन्हां तिच्या आयुष्यांत आपला प्रवेश व्हायला वेळ लागणार नाही. ते पत्र तसंच ठेवून द्यावं. आपल्या मागेच ते तिच्या हाती पोचण्यात मौज आहे.

× × × ×

अरविंदबाबूंनी आपल्या मुलींची सगळी हकिकत मला सांगितली. तिच्या वल्लभाला तिच्याविषयीं कांही तरी वाईट संशय येऊन तिचा त्याने त्याग केला आहे. नंदिनीला माझा असाच कांही संशय तर आला नाहीं ना? ही शंका आल्यामुळें मनाला चैनच नाही.

केवळ संशयाखातर प्रेमिकांनी एकमेकांचा त्याग करावा का?

बाबूजींच्या मुलीच्या हातून खरोखरीच कांही अनाचरण घडलं असं घटकाभर खरं मानलं, तरी त्या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही. तिचं आपल्या वल्लभावर प्रेम नसतं तर तिनें स्पष्ट नकार दिला नसता कां? हृदयाला होणाऱ्या यातना असह्य झाल्या असतील तेव्हांच तिने आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला असावा.

नंदिनीच्या हातून असा अपराध घडला तर?...ही शंका घेणं शुद्ध अन्यायाचं आहे. पण असं कांही झालंच, आणि तरीही तिनें माझ्या वरील प्रेमाची ग्वाही दिली तर मी तिचा स्वीकार करीनच. कारण एका पुरुषावर प्रेम असतांना स्त्रीकडून अनाचार होणारच नाही. वेळ प्रसंग साधून कोणी सैतानच ते त्यांच्यावर लादत असेल. जगांतील स्त्री पुरुषांच्या मनांत केवळ वैषयिक वासनाच घोळत असेल अशी कल्पना करणंच मूर्खपणाचं आहे. आणि एखाद्याच्या प्रेमांत पडलेल्या स्त्रीच्या हातून असं कांही घडेल असं मानणं वेडेपणाचं आहे. माझी तर अशीच प्रामाणिक समजूत आहे कीं त्या गृहस्थाचं मन बाबूजींच्या मुलीवरून

उडालं असेल म्हणूनच त्यानं हे निमित्त साधलं. त्याचं प्रेम खरं असतं तर त्यानें त्या सुकुमार मुलीचा त्याग केला नसता. साध्या माणुसकीकरितां तरी त्याने एका पक्षानें तिच्यावर आणलेल्या प्रसंगांतून सहानुभूतीचा हात पुढे करून तिचा स्वीकार करायला पाहिजे होता.

× × × ×

नंदिनीवांचून जीवित शून्यवत् भासतं. कांही वेळ आत्महत्त्या करावी असंही वाटतं. पण आत्महत्त्या करणं हें मला दुबळेपणाचं लक्षण वाटतं. शिवाय कधीं काळी नंदिनीने मदतीसाठी हाक मारली तर ?...

× × × ×

नंदिनीने रजनीनाथाचा त्याग कां करावा हा प्रश्न सोडवायला सदानंद असमर्थ होता. पण त्या दोघांचं मीलन व्हावं अशी त्याच वेळी त्याला तळमळ लागली. आज रजनीनाथाने आत्महत्त्येचा बेत रहित केला असला तरी झालेली निराशा त्याला नेहमीच स्वस्थ बसूं देईल असे सदानंदाला वाटेना. नंदिनीच्या मार्गात खरोखरीच कांही अडचणी आल्या असतील तर तिला आज ना उद्यां रजनीनाथाच्या मदतीची जरूरी भासणारच; आणि अशा वेळी त्याच्या अस्तित्त्वाची तिला कल्पनाही नसावी ही गोष्ट दोघांच्याही दृष्टीने श्रेयस्कर नाही असा विचार करून त्याने रजनीनाथानें लिहून ठेवलेले पत्र रवाना करण्याचा निश्चय केला.

आपण करीत आहोत ही गोष्ट रजनीनाथाच्या हिताआड केव्हांही येणार नाहीं अशी जाणीव त्याच्या मनांत उत्पन्न झाल्यामुळें त्याला त्याबद्दल आनंदच होत होता.

ते पत्र रवाना केल्यामुळे रजनीनाथाचा पत्ता नंदिनीला ताबडतोब मिळूं शकेल असा विचार करून दुसऱ्या दिवशीच रजनीनाथाने आतांपर्यंत न पाठविलेलें पत्र आणि त्याच्या पराक्रमाची वर्तमानपत्रासाठी तयार केलेली हकिकत सदानंदानें गुपचूप रवाना केली.

---

# —१५—

त्या दिवशी दुपारीच सूर्यकांत मनोहरच्या घरी गेला. मनोहर अर्थात्‌च घरीं नव्हता. कुमुदिनी कांही तरी वाचत पडलेली होती. दाराला कडी नसल्यामुळे त्याने घरांत केव्हां प्रवेश केला याची तिला कल्पनाही झाली नाहीं. चाहूल लागतांच ती दचकून उठली, आणि एक स्त्री समोर निजलेली असतांना पुरुषाने त्या ठिकाणी प्रवेश करणें असभ्यपणाचे नाही कां, असेच जणू दर्शवीत तिनें त्याच्याकडे पाहिले.

" आज दुपारीच ? " त्याने ताबडतोब निघून जावे असें सुचवीत ती म्हणाली.

" माझं तुझ्याजवळच काम होतं ! " सूर्यकांत हंसत म्हणाला.

" पण तुम्ही सकाळी किंवा संध्याकाळी आला असता तरी चालण्यासारखं होतं. या वेळी कोणीच घरांत नसतांना तुम्हांला नी मला बोलण्यासारखं कांही असेल असं मला वाटत नाही."

" घरांत पाहुणा म्हणून आलेल्या माणसाशी बोलण्याची ही नवीनच पद्धत मी पहातों आहे ! " सूर्यकांत उपहासानें हंसून म्हणाला.

" शिष्टाचाराचे नियम मलाही कळतात सूर्यकांत ! पण आलेल्या माणसानें शिष्टाचार म्हणजे आंधळेपणानें घातलेली भीक अशी कल्पना करून घेऊं नये."

घरांत पाऊल टाकतांच आपल्याला या प्रकारचे बोलणें ऐकावें लागेल अशी येतांना सूर्यकांताला कल्पनाही नव्हती. सकाळींच त्याची आणि मनोहरची बाजारांत भेट

झाली होती, आणि त्यावेळी त्यानें मनोहरजवळ राजरोस पैशाची मागणी केली होती; आणि ते न दिल्यास त्याची अब्रू चव्हाट्यावर मांडण्याची धमकी दिली होती. मनोहरनें कुमुदिनी आली त्याच दिवशी सूर्यकांताचें स्वरूप तिला उघड करून सांगितलें होतें, आणि वाटेल तें झाले तरी त्याच्यासारख्या माणसानें घातलेल्या भीतीनें घाबरून न जातां त्याला हुसकावून लावण्याबद्दल कुमुदिनीनें त्याला सुचविलें होतें. सूर्यकांताला ही गोष्ट मुळींच माहित नव्हती आणि त्यामुळेंच तिच्या मनांत मनोहरविषयीं किल्मिष निर्माण करण्याचा त्यानें डाव रचलेला होता. नोकरी सुटल्यावर पोट भरण्याचा हा मार्ग चांगला आहे अशी त्याची खात्री झाली होती.

" आंत शिरतांना माझी चूक झाली हे मी कबूल करतों ! " सूर्यकांत जरा नमते घेऊन व तिचें आपल्याशी या प्रकारचें वागणें केवळ त्याच कारणामुळें असेल अशी कल्पना करून घेऊन म्हणाला, " वाटल्यास मी त्याबद्दल तुमची क्षमा मागतो; पण माझं काय म्हणणं आहे तें तर ऐकून घ्या."

" तुमच्याजवळ मला सांगण्यासारखं कांहीं असेल असं मला वाटत नाहीं ! " कुमुदिनी त्याच्या निर्लज्जपणें बसण्याच्या प्रयत्नानें चिडून म्हणाली.

आपण घरांत पाऊल टाकतांच तिनें दिलेल्या सलामीमुळें सूर्यकांत अगोदरच संतप्त झाला होता; त्यांतच तिच्या आर्तांच्या अपशब्दांची भर पडली. त्याला आपला राग आवरणे अशक्य होऊन बसलें. तरी पण आपल्याला काम साधायचे आहे तोंपर्यंत रागावून चालणार नाही, असा विचार करून तो म्हणाला, " तुम्हांला कल्पना नाहीं म्हणून तुम्ही असं बोलतां. पण तुमच्या संसारसुखावर मनोहरनें कोणत्या प्रकारचा अग्नि जळत ठेवला आहे याची तुम्हांला कल्पना आहे काय ? "

" माझा विचार करायला मी पूर्ण मोकळी आहे ! " हें उत्तर कुमुदिनीच्या अगदी ओठवर आलें होतें; पण त्याच वेळी आपल्याला सूचना देण्याकरितां कोणी तरी टक् टक् आवाज केलेला तिच्या कानीं आला, आणि तिनें ' कोण आहे ' म्हणून विचारतांच दिनकरमामा घाबरलेल्या चेहऱ्यानें आंत आले.

" सकाळपासून आमची नंदिनी आली आहे कां इथं ? " त्यांनी एकदां साशंक नजरेनें सूर्यकांत आणि कुमुदिनी यांच्याकडे पहात प्रश्न केला. सूर्यकांतासारख्या परक्या माणसाच्या देखत तो प्रश्न विचारावा किंवा नाहीं याची त्यांना शंका आली होती म्हणून ते अगोदर घोंटाळले.

" नंदिनी नाही आली इथं. कां ? " कुमुदिनीनें विचारलें.

" मग सकाळपासून ती कुठं गेली आहे कोणास ठाऊक ? " दिनकरमामा निराश होऊन म्हणाले.

" म्हणजे ? "

पण ती नाही असें कळतांच दिनकरमामा आणखी उभेही राहिले नाहीत.

" यानींही आतां ही चवकशी तुमच्याकडेच येऊन कां केली हें तुमच्या लक्षांत आलं असेलच ? जी गोष्ट जगालाही कळून चुकली आहे ती तुमच्या गांवीही नाही याचा अर्थच तुमचं अज्ञान ! " सूर्यकांत निश्चयाने म्हणाला.

" तुम्ही काय सांगणार आहांत याची मला पूर्ण कल्पना आहे. तुमच्या जवळून ते ऐकायची माझी इच्छा नाही. तुम्ही आतां निघून जाल तर मला आनंद होईल !" कुमुदिनी शक्य तों चवताळून म्हणाली.

" मला थोडेसे पैसे पाहिजेत; ते दिले कीं मी निघालोंच."

" कशाकरितां ? "

" तुमच्या यजमानांची आणि तुमच्या मैत्रीणीची हकिकत गुप्त ठेवण्याकरितां."

" पण गुप्तता राखावी असं मी तुम्हांला केव्हांच सांगितलं नाही."

" तुम्ही सांगितलं नसलं तरी आपल्यासारख्यांना अब्रूची किती किंमत असते, हें मी जाणतों ना ! "

" ती मीही जाणते. पण नंदिनीच्या किंवा मनोहरच्या अब्रूचे धागे तुमच्या हातीं यावेत असं मला वाटत नाही."

" बरं आहे मी जातो आतां ! याच वेळीं जाऊन मनोहर नंदिनीला घेऊन पळून गेलेला मीं पाहिला असं जगजाहीर करतों." सूर्यकांत जातां जातां म्हणाला.

* * * *

नंदिनी नाहींशी झाल्याची बातमी मनोहरला कचेरींतच कळली. तो त्यामुळें ताबडतोब घरी आला. सूर्यकांतानें येऊन कसा गोंधळ उडविला याचें कुमुदिनीनें वर्णन केलें. नंदिनी कुठे गेली असावी याची दोघांनाही कल्पना न आल्यामुळे तिचा शोध लावायला कोणत्या प्रकारें मदत करावी याचा त्यांना प्रश्न पडला. एका तरुण

मुलीच्या नांवाचा प्रश्न असल्यानें झालेल्या प्रकाराची पोलीसांना बातमी द्यावी किंवा नाहीं याबद्दल कोणाचाच निश्चय होईना.

मनोहरच्या मनाची स्थिति मोठी विलक्षण झाली. त्या दिवशी नंदिनी आपल्या खोलींत आली कशी हें कोडे त्याला अजून पर्यंत उलगडले नसले, तरी आपण त्या दिवशी खोलींत होतो त्यामुळेच नंदिनीवर आज नाहीशी होण्याचा प्रसंग आला आहे, ही त्याची ठाम रामजूत झाली. त्या दिवशी कुमुदिनीने तिची प्रकृती पाहून तिला त्याच गोष्टीचा त्रास होत असला पाहिजे असा अंदाज स्पष्ट केल्यापासून तर त्याला आपल्याला नंदिनीच्या परिस्थितिविषयी तर्क करतां आला नाही याबद्दल स्वतःचाच राग आला. आणि आपल्या अपरोक्ष सूर्यकांत घरीं येऊन गेल्याची हकिकत कळल्यावर तर त्यानेंच नंदिनीला अब्रूची भीती घालून गोत्यांत आणले नाही ना, अशी शंकाही त्याला आल्यावांचून राहिली नाही. नंदिनीला नाहींसें होण्याला प्रत्यक्ष कारण काय घडले असावे याची दिनकरमामांकडे जाऊन चवकशी करावी असे त्याच्या मनांत येऊन गेले. पण तिचा शोध लागेपर्यंत त्यांना त्रास देऊं नये असा विचार करून तो स्वस्थ बसला.

पण त्याला शांतता लाभली नाहीं.

नंदिनीने आत्महत्या केली असावी अशी एक शंका न कळत त्याच्या मनांत डोकावली, आणि मग ती बद्दल आपणच जबाबदार आहोंत ही जाणीव असह्य होऊन तो हवालदील झाला. आपल्या रक्तांतील प्रत्येक अणुरेणु नंदिनीच्या नाहीशा होण्याबद्दल तूंच जबाबदार आहेस असें बजावून सांगत असल्याचा त्याला भास झाला. आपण आपल्याच दुःखांत गर्क होऊन न बसतां त्याच वेळी नंदिनीला सगळ्या प्रकाराचा खुलासा विचारला असता तर तिने आपल्याजवळ हृदय मोकळें केले असते, आणि मग ती अडचणीत आहे असें आपल्या नजरेस आले असतें तर त्याविषयीही आपल्याला कांही विचार करतां आला असता. इतकेच नव्हे तर आपण मामांजवळ झालेल्या प्रकाराबद्दल कांही बोललों असतों तर त्यांच्याकडूनही पुढील मार्गाची आंखणी करतां आली असती...

बिघडलेल्या मनःस्थितीत त्याने मग त्या दिवशी आपल्या चिमण्याला जवळही घेतलें नाही, आणि तो कुमुदिनीशींही नेहमीप्रमाणें बोलला नाही. कुमुदिनीही नंदिनीबद्दलच विचार करीत असल्यानें तीही मनोहरशीं विशेष बोलत नव्हती.

ज्या ज्या ठिकाणी चवकशी करणें शक्य होते त्या त्या प्रत्येक ठिकाणी नंदिनी गेली नसल्याचे संध्याकाळपर्यंत कळले.

संध्याकाळच्या वेळीं मनोहर दिनकरमामांकडे जाण्यास निघाला. रस्त्यांतच तो आपल्या विचारांत गुंग असतांना एका वर्तमानपत्र विकणाऱ्या मुलाकडे त्याची नजर गेली, आणि त्यानें त्याच्या हातांतील 'ज्ञानप्रकाश'चे पोस्टर वाचलें.

**एका तरुणीची आत्महत्या.**

**बंगाल्यांत महाराष्ट्रीय तरुणाचा पराक्रम.**

अंधारांत चाललेल्या माणसाला एकाएकीं कुठून तरी प्रकाश दिसावा, आणि मग आपल्याला आतां वाट बिनचूक सांपडणार असा त्याला आत्मविश्वास यावा त्या प्रकारचीच मनोहरच्या मनाची स्थिती झाली. पहिली बातमी नंदिनीविषयींच असली पाहिजे याबद्दल त्याला संशय उरला नाहीं. तीमुळे त्याच्या हृदयाला धक्काही जबर बसला; पण त्याबरोबरच हृदयांत नंदिनी कुठे गेली असावी याबद्दल निर्माण झालेलें वादळ नाहींसे झाल्यावद्दल त्याला दुःखपूर्ण समाधानही वाटलें. त्यानें ताबडतोब ज्ञानप्रकाशचा अंक खेरदी केला. बातमी पुढीलप्रमाणें होती.

> आठ दिवसांपूर्वी कलकत्त्याला रात्रीच्या वेळीं युरोपियन क्लबाच्याजवळ असलेल्या पुष्करिणीमध्यें एक बंगाली तरुणी झोंक जाऊन पडली होती त्या वेळीं येथील 'स्नेहलता सिनेटोन'मध्ये मुंबईहून नुकतेच आलेले महाराष्ट्रीय दिग्दर्शक रजनीनाथ देशमुख यांनी वेळींच प्रसंगावधान राखून पुष्करिणीत उडी टाकली, आणि त्या तरुणीला त्यांनी वर काढले.
>
> सदरहू तरुणीनें प्रणयभंगामुळेच आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असावा अशी आमच्या वातमीदाराची कल्पना आहे.

परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यानें एखादा प्रश्न हटकून येणार अशी कल्पना करावी, पण त्याऐवजीं दुसराच त्याला सोडवण्यासारखा प्रश्न यावा म्हणजे त्याची जशी मनःस्थिति होत असेल त्याप्रमाणेच मनोहरची अवस्था झाली. जगांतून नाहींशा झालेल्या कां होईना पण नंदिनीचा आपल्याला पत्ता लागेल या अपेक्षेने त्यानें 'ज्ञानप्रकाश'चा अंक विकत घेतला आणि त्यांतून इतक्या दिवसापासून नाहींशा

झालेल्या रजनीनाथाची बातमी मिळाली. तरी पण त्याला आनंद झाल्यावांचून राहिला नाही. नंदिनी नाहींशी होण्याच्या वेळीच आपल्याला रजनीनाथाचा अनपेक्षित-पणेंच पत्ता लागावा या विचित्र योगायोगाचें त्याला आश्चर्य वाटलें, आणि न जाणों नंदिनीला त्याचा पत्ता लागला असला तर ती कदाचित् त्याच्याकडेही गेली असावी अशी त्याला शंका आली. ती शंका येतांच त्याने प्रथम तार ऑफिसचा रस्ता धरला आणि, नंदिनी नाहीशी झाली आहे; तिथे असल्यास ताबडतोब कळवावें किंवा आली नसल्यास शोध करावा, या अर्थाची त्याने तार केली.

पण मागाहून त्याच्या लक्षांत आले की नंदिनी आज सकाळपासूनच नाहीशी झाली असल्याने तिला अजून कलकत्त्याला जायला भरपूर वेळच मिळालेला नाही. तरी पण रजनीनाथाला आपण ती बातमी दिली हें चांगलेच झालें असा स्वतःशीच विचार करून तो मामांकडे वळला.

ठिकठिकाणीं चवकशी करून येऊन मामा नुकतेच स्वस्थ बसले होते.

त्या वेळी कोणीही बोलण्याच्या स्थितींत नसल्यानें प्रत्येकजण शांत होता. नंदिनी चवकशी करूनही सांपडत नाही तेव्हां ती कुठे गेली असावी याचा कोणालाच अंदाज नव्हता.

कांही वेळाने मनोहर कांहीं तरी बोललं पाहिजे म्हणून म्हणाला, "रजनीनाथाला मी तार केली आहे. नुकताच त्याचा पत्ता लागला आहे मला ज्ञानप्रकाशवरून!"

"त्याचंही सकाळीच कलकत्त्याहून पत्र आलं आहे," मामा म्हणाले, "मीं अगोदर त्यालाच दोषी ठरवला होता. पण आजच्या त्याच्या पत्रावरून तो पूर्ण निर्दोषी आहे असं माझं मत झालं आहे. तिनंच त्याला नकार दिलेला दिसतो."

"म्हणजे?" नंदिनीच्या नकाराची कांहीच हकिकत माहित नसल्यामुळें मनोहरनें आश्चर्यानें विचारलें.

सगळी हकिकत सांगावी किंवा सांगू नये याबद्दल मामांचा ताबडतोब निश्चय होईना. पण मनोहर आपला मित्र आहे...त्याचा वेळीं प्रसंगी आपल्याला उपयोगच होईल असा विचार करून मामांनी त्याला सगळीं हकिकत सांगितली.

नंदिनीला या स्थितीत आणण्याबद्दल तूंच जबाबदार आहेस, असें त्याचें हृदय त्याला पुन्हां एकदां ओरडून सांगू लागलें.

आपण नंदिनीच्या मनाची नाजूक परिस्थिति लक्षांत न घेतां तिला टाकून बोलले याबद्दल मामांना आतां वाईट वाटत होते.

"मी त्यावेळी शांतपणें वागलों असतों तर तिच्यावर ही वेळ आली नसती."

"तुमच्यापेक्षांही मी या प्रकरणांत दोषी आहे मामा." मनोहर मनाचा निश्चय करून म्हणाला.

त्याच्या तोंडून अचानक ते उद्गार निघालेले पाहून मामा स्तिमित झाल्यावांचून राहिले नाहीत. पण मनोहरच्या उद्गारांचा त्यांनी निराळाच अर्थ घेतला. ते एक वेळ साशंक नजरेनें त्याच्याकडे पाहूं लागले. कुमुदिनीसारखी सुशिक्षित आणि रूप-संपन्न पत्नी असतांना त्याचा इतका अधःपात झाला तरी कसा हेच त्यांना कळेना. पण पुढील हकिकत ऐकल्यानंतर आपण पुन्हां एक वेळ उतावीळपणें त्याला दोष देत होतो हे त्यांच्या लक्षांत आले.

नंदिनी मनोहरच्या खोलीत सांपडली कशी हे कोडे त्यांनाही सोडवितां आलें नाही. आणि त्याबरोबरच त्या हकिकतीचा तिच्या हल्लींच्या स्थितीशी कसा संबंध येतो या बद्दलही त्यांना काहीच कल्पना आली नाही; पण मनोहरने सूर्यकांत आपल्याकडून धमकीच्या जोरावर पैसे उकळण्याचा प्रयत्न कसा करीत होता, याचे वर्णन करतांच त्यानेच नंदिनीला गोत्यांत आणली असावी असा त्यांनी तर्क केला. पण तरीही त्यांचे समाधान होत नव्हते. सूर्यकांतासारख्या माणसाला नंदिनीनें इतके कां घाबरावे हे त्यांना समजत नव्हते.

× × × ×

रात्रीच्या वेळी डोक्याला शांत वाटावें म्हणून मनोहर समुद्राच्या बाजूला फिरायला गेला.

त्यावेळी जवळ तो एकटाच असल्यानें सागरानें वायूलहरींशी चालविलेले हितगुज ऐकून त्याला बरे वाटलें. आपली सुखदुःखं ती एकमेकांना किती मोकळ्या मनाने सांगत आहेत ?........मानवांच्या संसारांत मात्र या मोकळेपणाची उणीव पदोपदीं भासते आणि मग त्याचे घोर परिणाम भोगावेच लागतात. सागर किंवा वायू कोणी कोणाचा हेवादावा करीत नाही त्यामुळे त्यांचं जीवन किती सुखाचं चाललेलं आहे ?...

सागर आणि वायूलहरी यांच्या खेळाकडे असलेले तारकांचें लक्ष त्यानें पाहि तारकांनीं हा खेळ आनंदानें बघत आज किती तरी युगं वरच्या वरती काढ आणि आम्ही मात्र या गुजगोष्टीकडे कधी ढुंकूनही पहात नाही...

वायूच्या अगणित लहरीबरोबरच मनोहरच्या हृदयांत निरनिराळ्याच आनंद उन्माद उसळत होता. पण त्या बरोबरच त्याला नंदिनीच्या नाहीशा होण्या आठवण झाली, आणि मग तो स्वतांशीच म्हणाला, 'सृष्टीचं सारं सौंदर्य दिसायल गोंडस असेल का...या सागरानें किती तरी जीवांचे बळी घेतले असत त्याबद्दल वायूने त्याची किती तरी वेळा निर्भत्सना केली असेल, आणि आपल सारख्या कैक लोकांनी तें दोघांचं हितगुज आहे अशी आपली चुकीची सम करून घेतली असेल !'...

वारंवार त्याच्या नजरेसमोर नंदिनीची मूर्ती उभी राही, आणि मग तो म सगळ्या प्रकरणाचा मी खुलासा न केल्यामुळेच तिच्यावर ही पाळी आली.

तो शून्य हृदयाने समोरील दृश्याकडे पाहूं लागला. तोंच काळोखांतून के तरी पाण्याच्या बाजूला जात असावे असा त्याला भास झाला. ती नंदिनी नसेल ना अशी शंका त्याच्या हृदयांत डोकावली, आणि त्यानें त्या दिशेनें तीरासा धांव घेतली.

" नंदिनी थांब ! नंदिनी थांब ! " त्याच्या तोंडूनबे सावधपणे आरोळ्या निघाल आपण पोंचण्यापूर्वीच तिने उडी घेऊं नये अशी त्याची इच्छा होती.

पण तो जाऊन पोंचण्यापूर्वीच पाण्यांत कोणी तरी उडी मारल्याचा प जोरानें उसळून आवाज झाला. मनोहरनेही मागोमाग उडी मारली.

पाणी सपासप कापीत त्यानें नंदिनीला गांठलें.

ती मूर्च्छित झाली होती.

---

## —१६—

मनोहरने तावडतोब मामांना आपल्या घरी बोलावून घेतले. ज्या एका चमत्कारिक घटनेची सुरवात आपल्या घरी झाली तिचा शेवटही दैवयोगानें आपल्या इथेच होत आहे या गोष्टीचा त्याला आनंदच झाला.

त्याने ताबडतोब नंदिनी सांपडल्याची रजनीनाथाला तार केली आणि त्यांतच त्याच्या येण्याची जरूरी आहे असेही कळविले.

झालेल्या मनस्तापामुळें की काय नंतर नंदिनीला बेसुमार ताप भरला. तापांत तिची एकसारखी बडबड चालली होती की ' मामा मी खरंच अपराधी नाही हो ! शीलाची किमत मलाही कळते. अब्रूचा प्रश्न नसता तर मी परिस्थितीत मुळांच सांपडले नसते हो '...

मामाही मग तिला म्हणत ' बेटा माझी चूक झाली बरं ! आतां मी तुझ्यावर केव्हांच रागावणार नाही हो ! "

तार गेल्यापासून तिसऱ्या दिवशीच रजनीनाथ येऊन पोंचला. नंदिनीची ती स्थिति पाहून त्यालाही मग आपले अश्रु आवरणें कठीण होऊन बसले.

तिची नाजूक परिस्थिती पाहून त्याला दोन तीन दिवसानंतर भेटण्याविषयीं डॉक्टरांनीं सुचविलें.

त्यानें नंदिनीची भेट घेण्यापूर्वी त्याला तिच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना द्यावी असें मनोहरला वाटले. समोर असलेल्या परिस्थितीत त्याने नंदिनीचा स्वीकार करावा अशी कोणालाही त्याच्यावर सक्ति करतां आली नसती. आणि त्याची स्वीकार

करण्याची इच्छा नसल्यास दोघांची भेट न होणेंच उत्तम असें त्याला वाटले. कारण त्यांची भेट होऊन मग त्याने तिचा स्वीकार करण्याचें नाकारलें तर पुन्हां तिच्या हृदयाला धक्का बसेल, आणि त्याचा परिणाम प्रकृतीवर झाल्यावांचून राहणार नाहीं अशी प्रत्येकाची खात्री होती.

रजनीनाथाला नंदिनीची सगळी हकीकत सांगायची म्हटली म्हणजे पहिलाच दुवा प्रत्येकाला कळणे आवश्यक होतें, आणि नेमकी तीच माहिती कोणालाही सांगतां येण्यासारखी नव्हती.

पण ती काळजी दिनकरमामांनीं दूर केली.

एके दिवशी दुपारीच ते नंदिनीचे कांहीं कागद चाळत असतां त्यांना तिने रजनीनाथाला लिहिलेले आणि मालक न मिळाल्यामुळें परत आलेले पत्र मिळालें. कदाचित् आपल्याला या पत्रांत पाहिजे असलेली हकिकत मिळेल असें वाटून मामांनी तें पत्र समग्र वाचून काढले. मनोहरलाही त्याला पाहिजे असलेला दुवा मिळाल्याचा आनंद होईल असे वाटून त्यांनी ते पत्र प्रथम त्यालाच वाचायला दिले.

आपल्यावरील कलंक नाहीसा झाल्याचा त्याला त्या क्षणी जो आनंद झाला तो विलक्षणच.

"मी तुमचा केव्हांही संशय घेतला नव्हता!" कुमुदिनी त्याला हंसत म्हणाली.

"घेतला नव्हता हे खरं! पण जी गोष्ट आपल्याला साद्यंत कळलेली नाहीं ती केव्हांही भूतासारखी मागे लागल्यावांचून राहणार नाही, अशी माझी खात्री असल्यानें, मलाच ती हकिकत कळण्याची ओढ लागली होती."

संधि साधून मनोहरनें रजनीनाथाला ते पत्र वाचायला दिले. त्यामुळे अनायासेंच त्याला सगळी हकीकत सांगण्याला प्रसंग कोणावरही आला नाही.

रजनीनाथ ते एकांतांत नेऊन वाचीत बसला. तरी पण त्याच्या मुद्रेवरील भाव अवलोकन करण्याचा मोह मनोहरला अनावर झाला.

ज्या तन्मयतेने नदी आपले हृदय सागराजवळ मोकळे करते त्याच तन्मयतेनें नंदिनीनें लिहीलेले तें पत्र वाचतांना रजनीनाथाला भान उरलं नाहीं. त्याचें हृदय प्रत्येक क्षणाला जड होत होते. किती तरी वेळ त्याच्या डोळ्यांतून अश्रु पावसाच्या वेगानें खालीं गळत होते. त्याची ती स्थिती पाहून लांबून त्याच्याकडे बघणाऱ्या कुमुदिनी आणि मनोहरला आपले अश्रु आवरणें अशक्य होऊन बसलें.

"किती वेड्या असतात स्त्रिया!" तो पत्र वाचून होतांच मनोहरला म्हणाला;

" मोकळ्या मनानें तिनें त्याच वेळीं मला सगळ्या हकिकती सांगितल्या असत्या तर इतका त्रास भोगण्याची तिच्यावर पाळी आली नसती."

" अशा वेळी माणसाचं मन दुबळं होणं सहाजिकच आहे ! तिला झालेला त्रास पाहिल्यानंतर मामांच्या हृदयाला जो पीळ पडतो आहे तो तरी पूर्वी पडला असतां की नाही याची शंकाच आहे. "

" माझ्या बाबतीत तरी मी असं म्हणेन की तिनं मला पुरतं ओळखलंच नाही."

" झाली गोष्ट होऊन गेली ! " कांही वेळाने मनोहर म्हणाला; " आतां पुढें काय करायचं ? "

" तुमच्या म्हणण्याचा आशय मी समजलो." रजनीनाथ विचार करून म्हणाला. " पण हें लक्षांत ठेवा की नंदिनीच्या हातून स्वेच्छेने कांही वाईट कृत्य घडलं असतं आणि मागाहून तिला त्याबद्दल वाईट वाटून ती पुन्हां माझ्याकडे आली असती तरी मी तिचा स्वीकारच केला असता. मग आतां तर काय ? तिनें लोकांनी मला त्रास देऊं नये म्हणून माझा त्याग केला. "

रजनीनाथाला अधिक बोलवले नाही. त्याने कळवळून काढलेले ते उद्गार ऐकून मनोहरालाही गहिंवरून आल्यावांचून राहिलें नाही.

आणि मामांच्या कानावर ज्या वेळी ही हकिकत गेली तेव्हा त्यांना तर रजनीनाथाची क्षमा मागितल्यावांचून राहवले नाही.

" तुम्ही माझ्या विषयीं गैरसमज करून घेतला त्यांत तुमचा कांही दोष नाही मामा !" रजनीनाथ त्यांना म्हणाला; " उलट मीच कलकत्त्याला जाण्यापूर्वी तिला सगळा खुलासा विचारला असता तर इतकी पाळीच आली नसती."

नंदिनीचा ताप उतरल्यावर तिने रजनीनाथाची चवकशी केली.

" आतांच मी त्यांना तुझ्यासमोर आणून उभं केलं, तर तूं काय देशील मला ?" कुमुदिनीनें विचारले.

" पुन्हां एकदां तुझी चेष्टा करण्याचा प्रयत्न करीन ! " नंदिनी हंसून म्हणाली.

" मग नाही. या पुढे तूं एखाद्या आजीबाईसारखी वागणार असशील तर रजनीनाथला तुझ्यासमोर आणते. "

नंदिनी यावर कांहींच न बोलतां तिच्याकडे बघत राहिली. आपण एकदां रजनीनाथाला नकार दिल्यानंतर तो पुन्हां कधी आपल्याला भेटायला येईल अशी तिला कल्पनाही करवत नव्हती.

तोच कुमुदिनी तिला म्हणाली, "तूं कधी संध्याकाळचा देखावा पाहिलास का ?"

" हो पुष्कळ वेळां !"

" त्यावेळी काय दिसतं ? "

" सबंध दिवसाच्या तापांतून सुटलेली पृथ्वी ! "

" आणि रजनीनाथाच्या भेटीमुळे तिच्या गालावर उमटलेला गुलाब !" कुमुदिनी तिचे वाक्य पुरे करीत म्हणाली.

" पण हा गुलाब ताप सहन केल्यावांचून खुलून दिसत नाहीं ! "

" अगदी बरोबर ! तुझी एक परीक्षा पार पडली. पास झाली आहेस तूं ! बक्षीस म्हणून मी तुझ्यापुढे रजनीनाथाला आणून उभा करते ! पण एक अट आहे माझी. "

" ती कोणती ? "

" संध्यारंगाची खुलावट तुझ्याही गालावर झाली पाहिजे ! "

कुमुदिनीने मग आणखी वेळ घालविला नाही. तिने हलक्या हातानी नंदिनीच्या बिछान्याजवळ असलेल्या खिडकीचा पडदा बाजूला केला आणि मावळत्या सूर्याचे कोवळे किरण तिला पहावयास सांगितले; आणि ती पुष्कळ दिवसांनी दिसलेल्या त्या संध्यारंगाकडे पहात असतांनाच कुमुदिनी बाहेर गेली, आणि दारावरील पडदा बाजूला सारीत तिने रजनीनाथाला आंत येण्याविषयी खुणविले.

रजनीनाथ आंत जातांच कुमुदनें पडदा ओढून घेतला आणि बाहेर दिनकरमामा, यशोदाबाई, आणि मनोहर सायंकाळच्या ' ज्ञानप्रकाश 'चा ताजा अंक वाचित होती त्यांत डोके खुपसून वाचूं लागली...

**विनयभंगाच्या आरोपावरून एका तरुणाला अटक.**

सूर्यकांत नांवाच्या एका तरुणाला एका कुमारिकेचा विनयभंग केल्यावरून आज दुपारी अटक करण्यांत आली आहे.

एका व्यापाऱ्याला फसविल्याबद्दलही त्याच्यावर आरोप ठेवण्यांत आला आहे असें समजते.

त्याच वेळी वायूची एक मजेदार झुळुक येऊन वर्तमानपत्र उडवीत नंदिनीच्या खोलींत शिरली.